शिक्षणातील प्रश्नांकडून उत्तरांकडे जाण्याचा एक मासिक प्रयत्न

शिक्षणात मूलगामी परिवर्तनाची वाट शोधणारा एक मासिक प्रकल्प

शिक्षणाकडे सर्व दिशांनी पाहणारा एक मासिक दृष्टिक्षेप

ग्राममंगल

# शिक्षणवेध



जन्मल्यापासूनच मूल
आपल्या हालचालींद्वारे, विविध कर्मेंद्रिये
आणि ज्ञानेंद्रिये यांचा उपयोग करून, आपले आपणच शिकत असते;
आपल्या अंतर्गत प्रेरणेने, अत्यंत आनंदाने आणि स्वयंप्रयत्नाने जग
आकळून घेत असते आणि या प्रक्रियेतून शिकत असते, असे
आकलनवादी मानसशास्त्राने दाखवून दिले आहे.

ग्राममंगल

# शिक्षणवेध

शिक्षणातील परिवर्तनासाठी

**वर्ष : पाचवे । अंक सातवा**

**फेब्रुवारी २०१५**

■ संपादक
रमेश पानसे

■ कार्यकारी संपादक
डॉ. वैखरी वैद्य

■ व्यवस्थापकीय संपादक
प्रसाद मणेरीकर

■ संचालक
अदिती नातू

■ कार्यकारी संचालक
अजित मंडलिक

■ संपादक मंडळ
डॉ. द. ना. धनागरे । डॉ. हेमचंद्र प्रधान
विवेक सावंत । आशिष पेंडसे

■ सल्लागार मंडळ
डॉ. राम ताकवले । डॉ. जब्बार पटेल
कुमार केतकर । प्रमोद लेले । दीपक घैसास ।
डॉ. चंद्रहास देशपांडे । अच्युत गोडबोले

■ मुखपृष्ठ
राजू देशपांडे

■ आतील चित्रे
अपर्णा कुलकर्णी

■ सजावट व मांडणी
राजश्री जाधव

■ मुद्रितशोधन
चित्रा नातू

**संपादकीय व कार्यालयीन पत्रव्यवहार :** 'सृष्टी' अपार्टमेंट, फ्लॅट नं.१०६,
सिंहगड रोड, पुणे-३०. संवाद -०२०-२४२५२१५१

**पुणे कार्यालय :** गांधीभवन परिसर, अंधशाळेशेजारी, कोथरूड, पुणे ४११०३८.
संवाद : ०२०२५३८६६८७ Email : shikshanvedh@grammangal.org,

**मुंबई कार्यालय :** अजित मंडलिक, २२, यमुना, शास्त्री हॉल, जे. डी. मार्ग,
मुंबई ७. संवाद : ०९८६९०४९८४९

हे मासिक मुद्रक-प्रकाशक अजित मंडलिक यांनी ग्राममंगल संस्थेसाठी इम्प्रेशन, २२, यमुना,
शास्त्री हॉल, जे. डी. मार्ग, मुंबई ७ येथे छापून त्याच ठिकाणाहून प्रसिद्ध केले.

# अनुक्रम


संपादकीय / ६
आपलं संशोधन खुरटं का ?/ प्रा. मनोहर राईलकर / १०
आनंद आणि शिक्षण / प्रा. रमेश पानसे / २२
विद्यार्थी अभावी प्राथमिक शिक्षकाची वाट बिकट / श्रीरंग काटेकर / २९
महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रिया : काही प्रश्न / वैशाली बाफना / ३२
कविता / तुकाराम खिलारे, फारूक काझी / ५०
मुक्तलेखन : एक अनुभव / फारूक काझी / ५२
चौकटीत न मावणारा 'लोकमान्य' / डॉ. वैखरी वैद्य / ५५
प्रकल्पातून उलगडले 'मैत्री'चे अंतरंग / प्रसाद सावंत / ५७
मुलांना 'मोठ्ठे' करण्याची घाई का? / भाग्यश्री चौथाई / ५९
वृत्तविश्व / ६२
ग्राममंगलवार्ता / ६४
एक रिकामी चौकट / गंपूदादा / ६५







# महाराष्ट्राच्या भाषाविषयक धोरणासाठी

**महाराष्ट्र** शासनाने नियुक्त केलेल्या भाषा सल्लागार समितीने तयार केलेला, महाराष्ट्र राज्याचे पुढील पंचवीस वर्षांसाठीच्या (आणि अर्थातच, नंतरही चालू राहील अशा) मराठी भाषाविषयक धोरणाचा मसुदा, शासनाने लोकांच्या अवलोकनासाठी आणि विचारासाठी उपलब्ध केला आहे. जाणत्या आणि जागत्या मराठी माणसांनी, मोठया संख्येने या अहवालाचे वाचन करून आपल्या प्रतिक्रिया व आपल्या सूचना आवर्जून द्यायला हव्यात. त्यांच्या अनुषंगाने अहवालाची फेररचना व्हावी लागेल आणि मग एका छोटया समितीने तयार केलेल्या या अहवालाला, जाणत्या मराठी समाजाने दिलेल्या अहवालाचे रूप येईल.

अहवालाचे प्रास्ताविक सोडले, तर अहवालाचे मुख्य चार भाग पडतात. एक, मराठी भाषेची सद्य:स्थिती; दोन, मराठी भाषाविषयक धोरणाची उद्दिष्टे; तीन, शिफारशी आणि चार, शिफारशींच्या अंमलबजावणीचा कालबद्ध कार्यक्रम व अंमलबजावणी- संबंधी काही त्रोटक शिफारशी.

महाराष्ट्र शासनाने २२ जून २०१० रोजी भाषा सल्लागार समितीचे पुनर्गठन केले आणि त्यांना कामाविषयीचा आदेशही देण्यात आला. या आदेशपत्रकात म्हणजे कामांच्या यादीत, महाराष्ट्र राज्याचे पुढील २५ वर्षांसाठीचे मराठी भाषेसंबंधीचे धोरण निश्चित करण्याचेही काम होते. हे काम सल्लागार समितीने, या समितीचीच पुनर्रचना ११ ऑक्टोबर २०१३ झाल्यानंतर आपल्या हाती घेतले. सल्लागार समितीच्या झालेल्या पाच सभा व त्यातील मसुदा समितीच्या झालेल्या नऊ सभा यांमधील विचारविनिमयातून हा अहवाल तयार झाला आहे. शिवाय, महाराष्ट्रातील सहा शहरांमध्ये सहविचार सभा घेऊन, सुमारे ३५० ते ४०० अभ्यासक, वाचक, कार्यकर्ते, पत्रकार आणि नागरिकांच्या मतांचा

विचार समितीने केला असल्याचे अहवालाच्या प्रास्ताविकात नमूद करण्यात आले आहे.

मराठी भाषेच्या सद्यःस्थितीचा थेट १९५२ पासूनचा व १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती आणि ११ जानेवारी १९६५ रोजी मराठी भाषेला मिळालेला राजभाषेचा (खरे तर राज्यभाषेचा) दर्जा यानंतरच्या काळातील ऐतिहासिक आढावा येथे घेतला गेला आहे. या काळात शासनाने निर्माण केलेल्या मराठी भाषा संबंधित संस्थांचा व त्यांच्या कार्यांचा अल्पसा उल्लेख या आढाव्यात घेण्यात आला आहे. या सद्यःस्थितीबाबत समितीचा सर्वसाधारण निष्कर्ष असा आहे की, .... मराठी भाषेच्या अभिवृद्धीच्या दृष्टीने करण्याजोगे बरेच कार्य अजून व्हावयाचे राहिले आहे ..... जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांत मराठी भाषेचा वापर ज्या प्रमाणात व्हावयास पाहिजे, त्याप्रमाणात होताना दिसत नाही. शिवाय, ...... सर्व शासकीय व्यवहार मराठी भाषेत सुरू (चालू) राहावेत असा धोरणात्मक निर्णय तात्त्विक पातळीवर झाला असला, तरी प्रत्यक्ष व्यवहारामध्ये मात्र या निर्णयाची प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणी वेगवेगळ्या कारणांनी होत नाही....... सल्लागार समितीच्या या अहवालात ही कारणे सांगितलेली नाहीत. किंबहुना, यावर उपाययोजना करण्यासाठी, ‘भाषा सल्लागार समिती’ची स्थापना केली असल्याचे या अहवालात म्हटले आहे. म्हणजे, केवळ शासकीय निर्णयांची प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी सल्ला घेण्याची व त्यासाठी समिती निर्माण करण्याची गरज शासनाला वाटली की काय?

शिक्षण, न्यायव्यवस्था, प्रशासन, वित्तसंस्था, उद्योगजगत, प्रसारमाध्यमे, बोली, प्रमाणीकरण आणि इतर व्यवहार या क्षेत्रांमधील सद्यःस्थितीचा आढावा समितीने अहवालात क्रमावारीने व थोडक्यात घेतला आहे. कुणालाही पटेल असाच आणि सामान्यतः मराठी भाषेविषयी चिंता वाटेल असाच हा आढावा आहे.

शिक्षणाच्या क्षेत्रातील मराठी भाषेच्या वापराच्या संदर्भातील काही महत्त्वाच्या आणि सार्वत्रिक स्वरूपाच्या प्रश्नांचा उल्लेख येथे आहे. मराठी हा एक विषय म्हणून आणि माध्यम म्हणून कमी होत आहे. उच्च शिक्षणात आणि त्यातही विज्ञान, तंत्रज्ञान व व्यवसाय शिक्षणात आजही केवळ इंग्रजी माध्यम आहे; मराठी विषय घेऊन उच्च शिक्षण घेणाऱ्यांची रोजगार प्राप्तीत परवड होत आहे; कृषी विद्यापीठे व वैद्यकीय, कायदा इत्यादी शिक्षणात मराठीचा कुठलाही अभ्यासक्रम नसतो; एवढेच नव्हे तर, जगातील ज्ञान मराठी माणसापर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था, भाषांतराची व्यवस्था अस्तित्वात नाही; इत्यादी प्रश्नांचा उल्लेख येथे आहे. समितीच्या दृष्टिकोनांतून शैक्षणिक प्रश्न इथे मांडले गेले आहेत, परंतु शिक्षण क्षेत्राच्या, म्हणजे त्यांत काम करणाऱ्यांच्या दृष्टिकोनातून त्यांना हरघडी जाणवणारे भाषिक प्रश्न इथे आले नाहीत. उदा., अजूनही महाराष्ट्रातील काही समाजघटक, त्यांच्या भाषिक गरिबीमुळे शिक्षणातील संधींपासून व प्रगतीपासून दूर राहतात, त्यांची भाषिक गरिबी कशी घालवावी? किंवा अनेक गावांतून, मोठया गावांतून असणारी सांस्कृतिक संधींची वंचितता व त्यांचा भाषा प्रगतीशी असणारा संबंध ह्या किंवा अशा काही मूलभूत गोष्टींची दखल न घेताच, हा अहवाल भाषा विकासाची वाटचाल करू पाहत आहे.

अशीच परिस्थिती वित्तसंस्था, उद्योग इत्यादी अन्य क्षेत्रांविषयी असणार. समितीने स्वतंत्रपणे प्रत्येक क्षेत्र घेऊन, त्यांमधील मुरलेल्या कर्मचाऱ्यांची व तज्ज्ञांची मते जाणून घेऊन त्यांच्याकडून सद्यःस्थिती समजावून घेतली असती; पण असे काही केल्याचा उल्लेख येथे नाही. राज्याचे भाषिक धोरण ठरविताना अधिक खोलवरची सद्यःस्थितीची पाहणी झाली असती, तर आजवर ज्ञात नसलेली आणि प्रगतीस उपयुक्त ठरणाऱ्या कारणांची व उपाययोजनांची मांडणी होऊ शकली असती. परंतु, असे करण्याऐवजी केवळ काही शहरांतून (ग्रामीण भाग, आदिवासी भाग वगळून) सभा घेऊन मत आजमावणी केली, हे पुरेसे खासच नाही.

महाराष्ट्रातील विविध बोलींचा पाच-दहा ओळींत येथे उल्लेख आहे. त्या बोली वापरणाऱ्यांना प्राथमिक शिक्षणात काही अडचणी येतात, असे हा अहवाल (केवळ सहा-सात ओळीत या विषयाची बोळवण केली आहे.) म्हणतो; पण खोलात जाऊन, शोध घेऊन नेमक्या सूचना करीतच नाही. समितीची खंत अशी आहे की, ..... या सर्व बोलींची नोंद, संकलन, संशोधन व सखोल अभ्यास अद्यापि झालेला नाही. (मग विविध विद्यापीठांतील मराठीचे विभाग काय करतात?) वास्तविक असा अभ्यास राज्य मराठी विकास संस्था करीतच आहे की! बोली भाषा आणि प्रमाण मराठी भाषा यांमधील पूल कसा बांधायचा, याविषयीचा धोरणात्मक निर्देश मात्र या अहवालात नाही.

मराठी भाषाविषयक धोरणाची उद्दिष्टे असा एक स्वतंत्र विभाग, अहवालात सद्यःस्थिती या विभागानंतर येतो. या विभागात एकेका ओळीत ही धोरणाची उद्दिष्टे दिली आहेत. हा विभाग खूपच भोंगळ पद्धतीने मांडला आहे. शीर्षकापासूनच हा गोंधळ सुरू होतो. या समितीला शासनाचे भाषाविषयक धोरण काय असावे, याची मांडणी करायची आहे. मुख्य उद्दिष्ट आहे ते मराठी भाषेच्या शिक्षणातील, व्यवहारांतील इत्यादी भाषिक विस्ताराचे व समृद्धीचे. याच्या अंतर्गत अनेक उद्दिष्टे स्वतंत्रपणे मांडता येतील. परंतु समितीने येथे धोरणे, उद्दिष्टे यांचीच गल्लत केली आहे. उद्दिष्ट म्हणजे आपल्याला जे साध्य करायचे आहे ते, आणि त्यासाठीचे (प्रामुख्याने सरकारने ठरविलेले) साधनभूत निर्णय म्हणजे धोरण होय. परंतु, या विभागात धोरणे व उद्दिष्टे एकत्रच दिली आहेत. त्यातही हे दोन्हीही नाही, तर निम्म्यांपेक्षा जास्त उपक्रमच दिले आहेत. यातच एक कलम असे येते की, मराठी भाषेसमोरील आव्हाने कोणती आहेत, याचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना करणे. वास्तविक याच कामासाठी ह्या समितीची नियुक्ती झाली आहे; संपूर्ण अहवालच या दिशेने असायचा आहे, त्यामुळे हे कलम उगीचच येथे आले आहे.

समितीने आपल्या अहवालात, विभागवार शिफारशी दिल्या आहेत. 'मराठी शाळांना अग्रक्रमाने व मोठ्या प्रमाणात मान्यता देण्याचे धोरण त्वरित अंमलात आणले जावे', असे म्हणताना, सद्यःस्थितीत सध्याच्या महाराष्ट्र शासनाच्या 'मराठी शाळांना परवानगी न देण्याच्या' आणि 'इंग्रजी माध्यमाच्या शाळांना अग्रक्रमाने व मोठ्या संख्येने मान्यता देण्याच्या' धोरणाचा उल्लेखच नाही. समिती सदस्यांना मराठी शाळांविषयी शासकीय अधिकारी किती दुष्टपणे वागताहेत, याची बहुधा माहितीच नसावी. एरवी अशी मोघम सूचना करून समिती थांबली नसती.

मराठी शाळा, मराठी माध्यम हे खरे तर कळीचे मुद्दे आहेत. शाळा टिकल्या, बहरल्या, असंख्य मुले तेथे जाऊन दर्जेदार शिक्षण घेऊ शकली; तर पुढे मराठी अध्यापन, संशोधन, वाङ्मयाचा आस्वाद, मराठीचा व्यवहारात वापर यांना उजाळा मिळणार आहे. मराठी शाळा जगल्या, तर मराठी नीटपणे जगणार आहे; परंतु पायाभूत घटनेची दखल या अंगाने अहवालात घेतली गेली नाही.

पायाभूत शिक्षण (बालशिक्षण, प्राथमिक शिक्षण) महत्त्वाचे मानले जाण्याऐवजी, अहवालात मुख्य शैक्षणिक शिफारस आहे ती 'मराठी भाषा विद्यापीठ' पाचशे एकर जागेवर स्थापन करण्याची. वास्तविक असे विद्यापीठ निदान मराठी भाषा विकासासाठी असण्याची गरज नाही. त्या संकल्पित विद्यापीठाने जे जे करावे असे म्हटले आहे, ते ते करण्यासाठी सध्याची विद्यापीठेही सक्षम होऊ शकतील. त्यासाठी विद्यापीठांच्या धोरणांत, मराठी विभागांचे स्थान आणि त्यांचा अनेकांगांनी विस्तार व विकास याविषयीच्या शिफारशी अहवालात असायला हव्या होत्या. काहीतरी आकर्षक, नव्या विद्यापीठाची नवी योजना मांडायची हे केवळ समितीत बहुतेक लोक (मराठीचे) प्राध्यापक आणि वाङ्मय सेवक असल्यामुळे त्यांना अशी कल्पना महत्त्वाची वाटली असावी. समितीत वाङ्मयाबाहेरच्या क्षेत्रांतील किती लोक आहेत? त्यावर हा अहवाल किती प्रातिनिधिक आहे हे ठरणार आहे.

अमराठी शाळांतील मराठी विषयाची सद्यःस्थिती समितीला शिफारस करण्यापूर्वी नेमकेपणाने अवगत करून घ्यावीशी का वाटली नाही? अमराठी माध्यमाच्या शाळांमधून मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी

विविध उपक्रम राबविणे अनिवार्य केले जावे, या उपक्रमांचे वार्षिक अहवाल मराठी भाषेत देणे बंधनकारक असावे, अशी मोघम शिफारस करून समिती मोकळी झाली आहे. वास्तविक स्थिती अशी आहे की, अमराठी शाळांतून पहिलीपासून मराठी विषय शिकविलाच जात नाही. पाचवीपासून जेथे शिकविला जातो, तेथे मराठी भाषिक किंवा मराठी चांगले येणारा शिक्षकच नाही; असे मला माझ्या एका पाहणीत आढळले आहे.

मराठी माध्यमाच्या शाळांची गुणवत्ता वाढावी म्हणून 'अ', 'ब', 'क' असा दर्जा ठरविण्याची यंत्रणा निर्माण केली जावी, व हे काम येत्या तीन वर्षांत पूर्ण करण्यात यावे.... अशी समितीची शिफारस आहे. वास्तविक प्रतवारी केल्याने शाळांची गुणवत्ता कशी वाढेल? अशी प्रतवारी जिल्हा परिषदांच्या शाळांची शासनाकडून केली जाते, त्याअर्थी त्याची काही यंत्रणाही उभी आहे. समितीला हे कसे माहीत नाही?

मला शिक्षणक्षेत्रातील माहिती आहे, म्हणून त्याविषयीचा येथे विचार केला. इतर क्षेत्रांतील पायाभूत भाषिक प्रश्नांविषयी त्या त्या क्षेत्रांतील लोकांनी सूचना द्यायला हव्यात.

भाषा विकासाचा धोरणांच्या अंगांनी विचार करायचा झाल्यास, तो निदान चार दिशांनी व्हावा लागेल.

१. भाषेचा समाजजीवनातील सार्वत्रिक वापराचा विचार- यामध्ये भाषा विस्ताराचा विचार महाराष्ट्रापुरता आणि महाराष्ट्राबाहेर असा दुहेरी करता येईल. इतरही छोटे-मोठे पैलू विविध क्षेत्रांच्या संदर्भात यात येतील.

२. शिक्षणातील भाषा वापर व त्याचा विस्तार- याच्या अंतर्गत अनेक प्रश्न येतात. उदाहरणार्थ, भाषेचे पायाभूत शिक्षण, भाषानुभव, भाषेतून शिक्षण, माध्यमाचा प्रश्न इत्यादी.

३. भाषाभिव्यक्तीचा विकास यात प्रामुख्याने ललित व वैचारिक वाङ्मय, कोशवाङ्मय, संशोधन इ., तसेच विविध कला व त्यांतील भाषिक प्रश्न व त्यांच्या भाषाविकासक क्षमता यांचा विचार होऊ शकेल.

४. चौथे क्षेत्र आहे ते शासकीय भाषा वापराच्या संदर्भातील. त्याचबरोबर धोरणे, कायदा, भाषा दुरुस्ती यंत्रणा अशा अनेक गोष्टी. मराठी भाषेचे प्रश्न काय किंवा भाषेची प्रगती काय, दोन्हीही या दिशांशी संबंधित आहेत.

मला वाटते, अशा प्रकारे नव्याने अभ्यास करून मराठी भाषेच्या बाबतींतील धोरणाला अधिक चांगला आकार देता येईल.

**संपादक**

# वर्गणीदारांसाठी निवेदन

**आपण 'शिक्षणवेध' या आमच्या अंकाचे वर्गणीदार आहात, याचा आम्हास आनंद आहे. मात्र अंक वेळेवर मिळण्याबाबत आपल्या काही तक्रारी वा नाराजी असेल तर आपण आमच्या ऑफिसशी पत्रव्यवहार करू शकता किंवा फोनवरही संपर्क साधू शकता. वेळ - १०.०० ते २.००**

**आपली तक्रार लवकरात लवकर दूर करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.**

**पत्ता : ग्राममंगल शिक्षणवेध, 'सृष्टी' अपार्टमेंट, फ्लॅट नं. १०६ सरितावैभव सोसायटी समोर, सिंहगड रोड, पुणे-३० स्थिर संवाद : ०२० २४२५२१५१, चल संवाद - ९४२३५८०१४५**

शोध आणि वेध

प्रा. मनोहर राईलकर

# आपलं संशोधन खुरटं का?

आपलं संशोधन खुरटं असण्याबद्दल काही दिवसांपूर्वी वृत्तपत्रांतून बरीच चर्चा चालू होती. पण भाषामाध्यमाचा एक महत्त्वाचा मुद्दा तेव्हा तरी कुणीही गांभीर्यानं घेतलेला आढळला नाही आणि आता शिक्षणवेधच्या दिवाळी अंकातल्या कोणत्याच लेखकाला हा विचार महत्त्वाचा वाटला आहे, असं आढळलं नाही, त्यामागचंही कारण कळत नाही. ज्ञानदानाकरता आणि घेण्याकरता मराठी सर्वस्वी अक्षम आहे, ह्याबद्दल विद्वानांना पराकोटीचा आत्मविश्वास आहे की काय कुणास ठाऊक!

दुसरा एक मुद्दा चर्चेत होता. मुलांना शाळेत नेण्या-आणण्याकरता असलेल्या बसला अपघात झाला, तर उत्तरदायित्व कुणाचं? आणि माझ्या दृष्टीनं त्या सर्वांपेक्षा महत्त्वाचा मुद्दा, पालकांची बालकांवरील दंडेली!

सामान्यतः बालकांचं वय-वर्षं पाच ते पंधरा हे अत्यंत आकलनक्षम किंवा ग्रहणक्षम, संस्कारक्षम, संवेदनाक्षम आणि मुख्यतः निर्मितिक्षम किंवा सर्जनशील असतं. इतर विषयांचं माहीत नाही, पण गणितात तरी अत्यंत मूलभूत संशोधन बालवयातच केल्याची कितीतरी उदाहरणं मला माहीत आहेत. एवारिस्त गाल्वा (फ्रांस), नील्स आबेल (नायजेरिया), कार्ल गाऊस (जर्मनी), योहान बोल्याए (हंगेरी), इव्हान लोबॅशेव्स्की (रशिया) अशी उदाहरणं नमुन्यादाखल देतो. गंमत म्हणजे, ह्यांत एकही इंग्रजी गणिती नाही. मध्ययुगीन काळात तर गणितात काम केलेले इंग्रज संशोधक अभावानंच आढळतात! ज्यांनी काही संशोधन केलं, ते त्यांनी तेव्हाच्या प्रथेनुसार फ्रेंच वा लातीनमध्ये प्रसिद्ध केलं. याचंही महत्त्वाचं कारण म्हणजे लहान वयातसुद्धा वाचता येतील अशी पुस्तकं इतर भाषांत

# आपलं संशोधन खुरटं का?

उपलब्ध होती, पण तशी इंग्रजीत नव्हती. आज आपली अवस्था वेगळी आहे का?

दुसरी बाब, संशोधनाच्या दृष्टीनं बालक विकसित होण्याकरता, त्याच्या विकासात बालपणातील जो काळ महत्त्वाचा असतो, त्याकडे बारकाईनं लक्ष द्यायला हवं, असं आपल्याला वाटतं का? हा एक खरा महत्त्वाचा विचार असूनही त्याच्याकडे आपलं दुर्लक्ष आहे, निदान आवश्यक तितक्या गंभीरपणे लक्ष नाही, असं म्हणू.

तिसरा विषय, आजच्या शिक्षणपद्धतीमुळे, पालकांनी बालकांच्या मागे लावलेल्या काही अनावश्यक लकडयांमुळे, मुलांच्या खेळण्याच्या कालावधीवर पडत असलेला घाला. बहुधा, आपापलं बालपण आठवत नसल्यामुळेही असं होत असेल. खेळ म्हणजे मेंदूच्या विकासाचं एक महत्त्वाचं साधन असतं, ह्या बाबीचा पालकांना जवळ-जवळ विसरच पडल्यासारखं झालं असावं किंवा मुळात त्यांचं घोर अज्ञानही असेल. तथाकथित शिक्षणाशी संबंधित अशा अधिकाऱ्यांना तरी त्याची जाणीव आहे की नाही कुणास ठाऊक?

चौथा विषय, घर आणि शाळा यांतील अंतर. हाही गंभीरपणे विचारात घ्यायला हवा. त्यामुळे शाळेत जाण्या-येण्यातच बालकांचा अमूल्य वेळ वाया जातो आणि बालकांच्या खेळाच्या कालावधीवर आक्रमण होतं. याचंही उत्तरदायित्व पालकांवरच आहे, कारण भ्रामक कल्पनांमुळे जवळची शाळा निवडण्याचं टाळून तथाकथित चांगल्या शाळेची निवड तेच करतात. (याबद्दल नंतरही काही लिहिणार आहेच.)

पाचवा विषय, पालकांचं इंग्रजी माध्यमाचं आकर्षण बालकांवर लादलं जातं. बारा वर्षांच्या मुलाकडे कोणत्याही विषयावरील पुस्तक स्वतः वाचता येईल, इतकी मातृभाषेतील शब्दसंपत्ती (सुमारे तीस सहस्र शब्द) जमते, असं तज्ज्ञांचं (डॉ. रघुवीर) म्हणणं आहे, पण त्यामुळे ज्या वयात बालकांची बुद्धी तीव्र असते; त्या वयात त्यांना वाचायला विविध वैज्ञानिक,

तांत्रिक, कलाकौशल्यं या विषयांवरची पुस्तकं स्वभाषेत उपलब्धच नाहीत.

सहावा विषय, बालकांच्या मनोविकासात असलेलं कलांचं स्थान. याची पालकांना वा शिक्षणाशी संबंधित व्यक्तींना कितपत जाण आहे? कला शिकण्याकरता किंवा एखाद्या खेळात प्रावीण्य मिळवण्याकरता संध्याकाळच्या मोकळ्या वेळात त्यांना पालकांचा, शाळांचा पाठिंबा मिळतो की, त्यांचा तो वेळही गृहपाठ किंवा गणिताच्या, इंग्रजीच्या खासगी वर्गाला जाण्याकरता, इंग्रजीतलं विक्षिप्त स्पेलिंग पाठ करण्याकरता, सामान्य पाठ्यविषयसुद्धा इंग्रजीतूनच शिकण्याकरता, इत्यादी कारणांकरता नासवला जातो?

सातवा विषय, औपचारिक शिक्षणारंभाचं वय. गाडी लवकर निघाली की मुक्कामाच्या ठिकाणीही आपण लवकर पोहोचतो. तसंच शिक्षणाचं आहे (नव्हे असणारच); अशी पालकांची घट्ट, पण बालकांच्या विकासाच्या दृष्टीनं हीही पराकोटीची घातक समजूत आहे.

आठवा विषय, तथाकथित बालसंगोपन-गृह, खेळघरं आणि बालवाड्या ह्यांत बालकांना अकाली अडकवण्यानं बालकांना लाभ होतो की हानी पोचते, ह्याविषयीचं ठार अज्ञान. बालवयात अत्यावश्यक अशा आईबाबांच्या सहवासानं जसा बालकांचा मनोविकास होतो, तसा होऊ न देता; बालकांना अशा ठिकाणी अडकवण्यानं होत नाही, असं रेनॉल्ड मूर यांचं स्पष्ट मत आहे. (Reynold Moore, The Dangers of Early Schooling हा संशोधन-प्रबंध, Moore and Moore, The School can wait, हे पुस्तक) त्यांनी ह्या व संबंधित विषयांवरील जवळपास ऐंशी संशोधन प्रबंधांचा अभ्यास करून प्रस्तुत संशोधन प्रबंध लिहिला आहे.

बालकांच्या बालपणातील मानसिक विकासाकरता, स्वास्थ्याकरता, आईवडिलांच्या सहवासाचं महत्त्व पराकोटीचं असतं. याकरता, दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील इंग्लंडमधील एक उदाहरण सांगतो. त्या काळात हिटलरकडून विविध शहरांवर, विशेषतः लंडनवर बाँबहल्ले होत असत, हे आपणाला माहीत असेल. काही बालकं सुरक्षित ठिकाणी, पण आपापल्या आईवडिलांपासून दूर असत; तर काही मुलं असुरक्षित स्थानी, पण आईवडिलांजवळ असत. त्या काळात जी मुलं लहान होती, ती प्रौढ झाल्यांतर त्यांची मानसिक दृष्टीनं पाहणी करण्यात आली. नवल म्हणजे, जी मुलं प्रत्यक्ष हल्ल्यांच्या ठिकाणी, पण आईवडिलांजवळ होती ती मुलं सुरक्षित स्थानी पण आईवडिलांपासून दूर होती, त्या मुलांपेक्षाही मानसिकदृष्ट्या स्थिर असल्याचं लक्षात आलं.



बालकं म्हणजे राष्ट्राची संपत्ती, हे जर आपल्याला मान्य असेल; तर वरील सर्व बाबींचा विचार बालकांच्या योग्य विकासाच्या दृष्टीनं करायलाच हवा आणि पालकांच्या दंडेलीला आळा घालायलाच हवा. खरं तर, ह्या प्रत्येक बाबीवर एकेक लेख लिहून संबंधितांचे डोळे उघडता येतील, इतकी माहिती आज उपलब्ध आहे. म्हणून मुख्य विषयाकरता आवश्यक अशा त्यांतल्या काही मुद्द्यांचाच परामर्श घेणार आहे.

वर वर पाहता उपरोक्त विषयांत काही समान धागा कसा असेल, असं

वाटेल; पण हे आणि ह्यासारखे कित्येक विषय एकाच बीजातून निर्माण झाले आहेत. कोणतं? आपल्या मुलामुलीनं कोणत्या शाळेत जावं? कोणत्या वयात जावं? इत्यादींबद्दल पालकांना असलेलं स्वातंत्र्य. आणि आपल्या देशातलं संशोधन खुरटं म्हणजे आपल्या बालकांचंच ना? (Child is the father of man.) ह्याकरता कमी अधिक प्रमाणांत वरील साऱ्या बाबी कारणीभूत आहेत, पण प्रत्यक्षात काय होत असावं? तर आपल्याच लाडक्या आणि घट्ट, पण निराधार कल्पनांतून मनात येणारे निर्णय आपण बालकांवर लादत असतो. 'आपण' ह्या शब्दानं बालकांच्या शिक्षणाशी संबंध येणारे सर्वच. त्यांतल्या त्यात पालक (आईवडील) सर्वाधिक. कारण, मुलं त्यांनी जन्माला घातली असल्यामुळं त्यांचाच अधिकार हे अलिखित तत्त्व बनलं आहे. आणि त्या सर्वांच्या निर्णयामागं जे सूत्र असतं, ते Helen Heffernan यांच्या म्हणण्याप्रमाणं एकच असतं. १९६८मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'Early Childhood Education Rediscovered, A Vital Curriculum for Today's Young Child' ह्या आपल्या प्रबंधात त्या ह्या प्रकारांना, 'प्रौढांच्या लहरींकरता बालकांना पिळणं' म्हणतात. (Warping children to satisfy adult demands.)

माझं हे म्हणणं वाचकांना धक्कादायक वाटेल, याची मला कल्पना आहे. पण आपापल्या बालकांचा छळ करण्याचे जे प्रकार पालक आज अवलंबत आहेत, त्यांपैकी मुलांनी कोणत्या वयात आणि कोणत्या शाळेत जावं, ह्याचा अधिकार पालकांना आहे, हा सर्वांत महत्त्वाचा प्रकार होय. आणखीही पुष्कळ आहेत. अती लहान वयात आईपासून तोडून शाळेत (खेळघरं, बालसंगोपनगृहं) घालणं; बालकांनी अधिकाधिक अभ्यास केला पाहिजे, असं ठरवणं; पुस्तकी ज्ञानाच्या पलीकडे ज्ञानाच्या कक्षा पोचत नाहीत, अशा ठाम समजुतीमुळं बालकांना ज्ञानाच्या इतर (संगीत, चित्रकला) प्रकारांपासून बळानं दूर ठेवणं; स्पर्धेत प्रथम क्रमांक न मिळाल्यास मारझोड करणं; इत्यादी. त्यांचा शाळा निवडण्याशी संबंध नसल्यामुळं दुसरा गट करू. पण, त्यांचाही संशोधनाच्या खुरटेपणाशी थेट संबंध नाही, असं बाह्यतः वाटलं तरी अप्रत्यक्षपणे आहेच.

आपण पहिल्या गटातल्या एकेका बाबीचा परामर्श घेऊ.

इंग्लंडमध्येही कित्येक वर्षं शिक्षणाचं माध्यम फ्रेंच, परकीयच होतं. कारण इंग्रजी भाषा बोजड, भरड, गावंढळ, दरिद्री, निरुपयोगी, संदिग्ध (rude, gross, barbarous, base, vile. vnmannerly, vneloquent.) इत्यादी विशेषणं लावून, इंग्रजच स्वभाषेबद्दल बोलत (Richard Foster Jones चं The Triumph of the English Language पान ७. स्पेलिंग मूळचंच.) त्या काळी संशोधनही इंग्रजीत प्रसिद्ध होत नसे. फ्रेंच किंवा लॅटीनमध्ये.

पण, पालकांच्या इंग्रजी भाषेबद्दलच्या स्वकल्पित मोठेपणाच्या दडपणामुळं ते आपापल्या बालकांवर इंग्रजी भाषेची आणि त्यापेक्षाही, इंग्रजी माध्यमाची सक्ती करत असल्यानं, ज्या क्षमता बालवयात भरात असतात, त्या वर वर्णन केलेल्या कोणत्याही क्षमतांच्या विकासाला आणि त्या उपयोगात आणण्याला वाव देत नाहीत आणि त्या सर्व क्षमतांचं पार चिपाड करून टाकतात. परकीय माध्यमामुळं कसं नुकसान होतं, ह्याबद्दल जाणकारांनी तळमळून केलेल्या सूचनांकडे आपणच दुर्लक्ष केलं आणि आता आपल्याकडून मूलभूत आणि गुणवत्तापूर्ण संशोधन होत नाही, म्हणून गळे काढायलाही आपणच पुढं आहोत; ही एक शोकांतिकाच नव्हे का?

इंग्रजी भाषेनं इकडून तिकडून शब्दांची भरताड आपल्या भाषेत केल्यामुळे उच्चार आणि लेखन ह्यांच्यांत कसलाच धरबंध राहिला नाही. परिणामी, इतर काही परदेशी भाषांच्या तुलनेत इंग्रजी आणि इंग्रजी माध्यमातून सर्वच विषय शिकताना बालकांचा छळ होत असला, तरी इंग्रजीनं डोळे दिपवून घेतलेल्या पालकांना तो दिसत नाही. उलट, इतर समाजाला येत नसणारी एक महान भाषा आपल्याला येते असल्या भ्रामक अंधकारात पालक स्वतः बुडतात आणि

बालकांनाही जन्माचं बुडवतात.

मग, इंग्रजी मोठी कशामुळं झाली? हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. पुष्कळांना वाटतं की, इंग्रजीनं परभषांतील शब्द उचलण्याचा धडाका लावला. मग आपणही तसं करायला काय अडचण आहे? असं अनेक विद्वान आपल्याला ठासून सांगतही असतात. पहिली बाब, इंग्रजी दरिद्रीच होती. साधे न्यायालय, न्याय-व्यवहाराचे सर्वच शब्द, लोकसभा, वृत्तपत्रविद्या यांच्याकरता तिच्यात शब्द नव्हते. पण, मराठीतले हे शब्द किती पारदर्शक आहेत! पण अशा साध्या कल्पनांकरतासुद्धा आज इंग्रजीत उपयोगात असलेले सर्व शब्द फ्रेंच आहेत. परिणामी इंग्रजीला परकीय शब्द घेण्यावाचून काही गत्यंतरच नव्हतं. पण, त्या कृतीमुळं इंग्रजी मोठी झाली नाही. उलट, इंग्रजीत लेखन-वाचनात पराकोटीची अराजकता माजली. Jones म्हणतो, ...the confused spelling of the language has caused strangers to exclaim in disgust that it "was so rud and barbaros that it was not too be learned by wryting or prynting. (Jones 155. स्पेलिंग मूळचंच.) English शब्दांचं स्पेलिंगही निश्चित नव्हतं. Englysh, Englyshe, Englisshe, आणि Inglish सुद्धा. (धक्का बसला ना?)

मग काय केल्यामुळं इंग्रजी मोठी झाली? त्या मार्गांचं अनुकरण करायला आपण तयार नाही, ते का? कैक वर्षांपासून, अन्य भाषांतील वाङ्मयाचा अनुवाद करण्याचा सपाटा लावून, इंग्रजी विद्वानांनी जगातलं वाङ्मय इंग्रजीत आणून ओतण्याचं कार्य चालवलं होतं आणि आहे. आणि अशा मार्गानं तिला त्यांनी मोठेपणा मिळवून दिला. आश्चर्य म्हणजे, त्यांचं हे कार्य आजही थांबलेलं नाही. मला माहीत असलेलं एक उदाहरण देतो. N. Bourbaki नावाचा एक फ्रेंच सेनानी होता. त्याच्या स्मरणार्थ त्याच नावाची एक संस्था काढण्यात आली. त्या संस्थेने गणिताचा सखोल अभ्यास करणाऱ्यांकरता १९६३ साली काही (२३) पुस्तकं काढली. मला कळल्यावर आमच्या ग्रंथालयात मी ती सर्व पुस्तकं घेतल, पण दोनच वर्षांत त्या सर्वांची इंग्रजी भाषांतरं प्रसिद्ध झाली!

आपण तसल्या केवळ योजनाच आखल्या. एक पाऊलसुद्धा पुढं टाकलंच नाही. उदाहरणार्थ, कोठारी आयोग (१९६६) प्रकाशित झाल्यानंतर ग्रंथ निर्मितीची चळवळ जोमानं हाती घेऊन तडीस नेण्याची अत्यंत आवश्यकता होती. आयोगानं दूरदृष्टीनं एक सूचना केलीही होती आणि धोक्याचीही सूचना दिली होती. वाचा.

माध्यमाच्या प्रश्नाचं महत्त्व ध्यानात घेता आम्ही असं सुचवतो की विद्यापीठ अनुदान आयोग आणि विद्यापीठं मिळून प्रत्येक विद्यापीठाकरता किंवा विद्यापीठ-गटाकरता सुयोग्य कार्यक्रम आखावा. आणि हा बदल जितक्या लवकर आणि कोणत्याही परिस्थितीत साधारणतः दहा वर्षांच्या आत प्रत्यक्षात आणावा. कारण काळाबरोबर प्रश्न अधिक गुंतागुंतीचा आणि कठीण होईल.... आता कशाची आवश्यकता असेल तर ती निःसंदिग्धपणे, अगदी स्पष्ट स्वरूपात धोरण ठरवण्याची, धाडसी आणि कल्पक कृतींतून ते तडीस नेण्याचीच. प्रवाहपतित राहणं धोक्याचं असल्यानं ते टाळावं. मागणी नाही म्हणून निर्मिती नाही आणि निर्मिती नाही म्हणून मागणी नाही, ह्या दुष्टचक्रात सापडू नये. (कोठारी आयोग पान. १४)

महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर आणि आता अलीकडे चारपाच वर्षांपूर्वीचं राष्ट्रीय अनुवाद अभियान (NTM[2]). दोन्ही योजनांच्या शोकांतिकांशी मी बऱ्यापैकी परिचित आहे. थोडक्यात सांगतो.

(एक) १९७०-७१ साली मंडळाची एक जाहिरात माझ्या वाचनात आली. तिचा आशय असा : गणितावर कुणीही कोणतंही पुस्तक लिहावं. त्या जाहिरातीचा आशय असा फारच भोंगळ होता. मंडळाच्या गणित समितीचे निमंत्रक डॉ. भा.स.फडणीस यांची माझी मैत्री होती. मी त्यांना पत्र लिहिलं की अशानं काम होईल, असं मला वाटत नाही. आणि समजा, काही झालंच तरी त्यात सुसूत्रता नसल्यानं ते विस्कळीत होईल आणि निरुपयोगी ठरून वाया जाईल. त्यापेक्षा, विविध पातळ्यांवरील




आपल्याला अपेक्षित असलेल्या पुस्तकांच्या शीर्षकांची आपण बृहत् यादी करावी. प्रत्येक शीर्षकाखाली इष्ट घटकांची माहिती द्यावी. शेवटी संदर्भाकरता इंग्रजीतील पुस्तकांची नावं द्यावीत. मगच त्याला व्यापक प्रसिद्धी द्यावी. यातून काही निष्पन्न होईल, याची मला आशा नव्हतीच. नवल म्हणजे समितीनं मलाच गणित-समितीवर स्वीकृत करून घेतलं आणि यादीचं कामही माझ्याकडेच सोपवलं!

ह्या संधीचा लाभ घ्यायचाच, असं ठरवून मी आणि माझ्या चार सहकाऱ्यांनी मिळून एक भली मोठी यादी केली. किती ते आठवत नाही. तरी चारपाचशेंची यादी असेल. आणि यादीतील अमुक पाच पुस्तकं आम्ही पाच जण लिहायला सिद्ध आहोत, असंही कळवलं. नवल म्हणजे मंडळानं त्या यादीलाही मान्यता दिली आणि आम्ही जी पुस्तकं लिहायचं म्हणून सुचवलं, त्यांनाही दिली. आम्ही पुस्तकं लिहिलीसुद्धा. ही बाब माझ्या स्मरणाप्रमाणे १९७५-७६ सालची असावी. पण सुमारे चाळीस वर्षांत आजपर्यंत आमच्या त्या पाच पुस्तकांपैकी एकही पुस्तक मंडळानं प्रसिद्ध केलं नाही. आमची हस्तलिखितं आमच्याकडेच पडून आहेत.

त्यानंतर केव्हातरी मंडळाकडून एका वेगळ्याच पुस्तकाच्या अनुवादाचं काम करण्याबद्दल माझ्याकडे विचारणा झाली. मी तो करून दिलाही. तो अनुवाद १९८१ मध्ये प्रसिद्धही झाला. पुढं काय? काहीच नाही. ते पुस्तक दुकानांतून कधी विकलं गेलं की नाही, कुणास ठाऊक. लेखक म्हणून मला मिळालेल्या प्रतींतील एक प्रत आमच्या महाविद्यालयात मी दिली तेवढीच खपली म्हणायचं! प्रकाशक पुण्यातलेच (काँटिनेंटल). नंतर असं कळलं की पुस्तकाला उठावच नसल्यानं त्यांनी आपल्या प्रथेनुसार ती सगळी रद्दीत विकून टाकली! एकूण काय? अशी आमच्या मेहनतीची, ज्ञानाची रद्दी झाली आणि एकूण मराठीकरणाची वाट लागली! तरीही आपलं संशोधन खुरटं का? असा प्रश्न आपण

निर्लज्जपणे विचारतोच आहोत! मात्र त्या पुस्तकानं नंतर आणखीही थोडासा इतिहास घडवला. तोही असाच रोचक (?) वाटेल.

(दोन) काही वर्षांपूर्वी केंद्र सरकारनं National Translation Mission (NTM²) नावानं एक नवीन योजना आणली. त्यांच्या प्रस्तावनेतील The reality however is that English still remains inaccessible to even the literate majority in India हे वाक्य महत्त्वाचं आहे. म्हणून जगातल्या सर्व भाषांतली सर्व विषयांवरची पुस्तकं सर्व भारतीय भाषांत अनुवादित करायची, अशी योजना. महाजालावरून मला कळल्यावर मी गणिताची यादी पाहिली. त्यात एकूण चाळीसच पुस्तकं दिसली! गणितावर इंग्रजीत चाळीसच पुस्तकं आहेत, असं नवीनच ज्ञान मला झालं! आणखी एक गंमत म्हणजे यादीतलं पहिलंच पुस्तक वर निर्देशिलेलं, मी अनुवाद केलेलं आणि उठाव नसल्यानं रद्दीत गेलेलं. मग माझ्या एका जुन्या सहकाऱ्यांना विनंती केली आणि त्यांनी आणखी २२०० च्यावर अनुवादयोग्य पुस्तकांची यादी करून मला दिली. २०१० साली नोव्हेंबरात अनुवाद करणाऱ्यांकरता मार्गदर्शनार्थ, डेक्कन कॉलेजात एक कार्यशाळा झाली. तेव्हा तिथं आलेल्या NTM च्या प्रतिनिधीला हा सर्व इतिहास मी लेखी कळवला आणि २२०० पुस्तकांची यादीही दिली. आणखी लिहिलं, तुमचा निर्णय झाला की पुस्तकं कोणत्या क्रमानं प्रसिद्ध करावीत हेही आम्ही सांगू. पण, चार वर्षांचा काळ होत आला तरी आजवर मला कुठल्याही प्रकारची पोचही मिळालेली नाही. किमान पन्नास वेळा तरी स्मरण देऊनही सरकारी गेंड्याच्या कातडीची सुरकुती थरथरलीही नाही.

नंतर, तीन वर्षांपूर्वी नोव्हेंबर २०११ मध्ये NTM²च्या पुण्यातल्या प्रतिनिधींना घेऊन माझे एक मित्र माझ्या घरी आले. त्यांना माझ्या मित्रांनी हा इतिहास सांगितला. मी तुम्हाला पुस्तकांच्या यादीची पोच देण्याची व्यवस्था करतो, असं प्रतिनिधी मला ठामपणानं (?) म्हणाले. पण, आजपर्यंतही पोच नाही ती नाहीच.



मी अनुवाद केलेल्या त्या पुस्तकाची नवी आवृत्ती निघाल्यानं तिचाच अनुवाद करायला हवा असंही मी सांगितलं. त्यांनी माझ्या पुस्तकाची प्रत मागितली. मी त्यांना सांगितलं, आता माझ्याकडे एकच प्रत आहे, ती मी देणार नाही. तेव्हा त्यांनी पुस्तकाची झेरॉक्स करण्याचं काम माझ्या मित्रांना सांगितलं. झेरॉक्स करून बेंगळूरूला कुरियरनं पाठवा. तुमचा सर्व खर्च आम्ही (?) देऊ, असं भरघोस आश्वासनही दिलं. पण, मित्रांना आलेला रु. ३०० खर्चही, घटनेला तीन वर्षं झाली तरी, सरकारी खाक्याप्रमाणे आजपर्यंत मिळाला नाहीच.

ह्यातली खरी गोम म्हणजे, जोवर आपापल्या भाषांत अध्यापन चालू होत नाही, तोवर पुस्तकांचा विचार कसा होईल? मला गांधीजींचं (Young India 1-9-1921) वाक्य आठवतं. ....I would not wait for the preparation of the books. They will follow the change. म्हणजे गांधीजींना अनुसरून पुस्तकांची निर्मिती NTMनंच थांब(व)ली असणार! कारण अध्यापन मातृभाषेत व्हावं, असं अजून ठरलंय कुठं, नाही का?

ह्या पुस्तकाच्या इतिहासाचं आणखी एक पान. पुण्यातले प्रतिनिधी माझ्या घरी आले, तेव्हा मी काही विचार मांडले. मी त्यांना म्हणालो, तुम्ही अनुवादाचं काम चालू ठेवाच. कारण, ते आवश्यक आहेच. पण इथल्या लेखकांवर अविश्वास दाखवण्याचं कारण नाही. त्यांनाही पुस्तकं लिहायला सांगा. परदेशी पुस्तकं ज्यांनी लिहिली ती तिथल्या मुलांच्या, समाजाच्या आवश्यकतांनुसार आणि परिस्थितीच्या अपेक्षांनुसार लिहिली असल्यानं आपल्याला त्यांचा संदर्भाकरताच उपयोग होईल, पाठ्यपुस्तक म्हणून नव्हे. त्यावर त्यांनी प्रतिक्रिया दिली नाही. पण, ते मला म्हणाले, मी आता तुम्हाला सोडणार नाही. मात्र गेल्या तीन वर्षांत ते मला पुन्हा भेटलेसुद्धा नाहीत. मला त्यांनी मुळात धरलंच नसल्यानं मला सोडण्याच्या प्रश्नातून त्यांनी स्वतःचीही आधीच सुटका करून घेतली असावी, नाही का? असं सारं असूनही आपल्याला वाटतं, संशोधन खुरटं का?

इंग्रजी भाषेच्या संदर्भात चीननं नुकताच केलेला एक महत्त्वाचा निर्णय आपल्याला पुनर्विचार करण्यास लावेल (लावावा). इंग्रजीच्या तथाकथित महानतेनं (आपल्याप्रमाणेच?) दीपून जाऊन चीननंही शिक्षणात इंग्रजी माध्यमाचा अंतर्भाव केला होता, पण त्यांचा भ्रमनिरास लवकर (आपल्यापेक्षा) झालेला दिसतो. आणि इंग्रजीची हकालपट्टी करायचं त्यांनी ठरवलं (लोकसत्ता दि. २३-१०-२०१३). त्यांचं म्हणणं, मुलांना ही भाषा शिकण्यास जड जाते, हे एक आनुभविक (तरीही आपल्याला न कळलेलं) तथ्य आणि कालांतरानं ती आपल्याच भाषांवर मात करून त्यांनाच हुसकून लावू शकेल, हीही (आपल्याला न कळलेली) भीती. ही त्यांची भीती सार्थ असावी. कारण, एखादी व्यक्ती कितीही टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाले असो, तिनं मराठी माध्यम घेतलं असेल तर तिची निवड भारतातच होत नाही. (उदाहरण पुढच्याच परिच्छेदात) आणि आजही मराठीत स्वाक्षरी करणाऱ्यांना अंगठेबहाद्दरांच्या कळपात घालायला मोठ्या कंपन्या उत्सुक आहेतच! कारण, मराठीत केलेली सही आपलीच आहे, हे दुसऱ्या कुणी तरी इंग्रजीत सही करून प्रमाणित करावं लागतं!

तेव्हाच्या फ्रेंच-दास इंग्रजांप्रमाणे आपण (अजूनसुद्धा) इंग्रजी-दास (दासानुदास) आहोत. मराठी व अन्य भाषांची हकालपट्टी तर झालीच आहे. एकच उदाहरण देतो. एका मुलीला ९० टक्क्यांपेक्षाही अधिक गुण मिळाले, तरी ती मराठी माध्यमातून शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाली, ह्या एकमेव अपराधाकरता तिची निवड भारतीय दास कंपन्यांनी केली नाही! महाराष्ट्रात मराठीची ही हकालपट्टीच नव्हे का? गंमत म्हणजे, महाराष्ट्रातल्याच एका अमेरिकन कंपनीने तिची निवड केली! तिला नवल वाटल्याने तिने अधिकाऱ्यांना विचारलं. तेव्हा एक अधिकारी म्हणाले, अहो, तुमचे गुण चांगले आहेत. इंग्रजी काय तुम्ही सहज शिकाल हळूहळू.

आपला भ्रमनिरास होणं तर सोडाच. खेडोपाडीही अधिकाधिक पालक आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमात जायला लावून इंग्रजी (छळ)ग्रस्तांची संख्या वाढवत आहेत. परिणामतः, मूलभूत संशोधनात

कामगिरी करू शकणाऱ्यांची संख्या आटतच चालली आहे. खरं तर, तिच्या निर्मितीलाच आपण नख लावून मारून टाकत आहोत. वर आपल्या भाषांना हुसकून लावलं जात आहे, त्याची आपल्याला जाणीवही नाही. कुणा थोड्यांना असली तरी खंत नाही. आपल्या वेडात वरपासून खालपर्यंत भरच पडत असल्याचं स्पष्ट आहे. आपल्या मुलांना कोणत्या शाळेत घालायचं हा अधिकार पालकांना का नसावा, हे एव्हाना स्पष्ट झालं असावं, असं समजतो.

परकीय माध्यमामुळे मुलांच्या बुद्धिवर काय परिणाम होतात, ते आधी पाहू. कारण, त्याचा संशोधनाच्या गुणवत्तेशी थेट संबंध आहे. हरिजनच्या ९-७-१९३८ च्या अंकात गांधीजींनी जे म्हटलं आहे, ते एक प्रकारे बालपणी होत असलेल्या छळवादाबद्दल सर्व बालकांचं प्रातिनिधिक मत समजता येईल. वाचा.

***वयाच्या १२ वर्षांपर्यंत माझं सर्व शिक्षण माझ्या मातृभाषेतून, गुजरातीतून झालं. तोपर्यंत मी थोडं अंकगणित, इतिहास आणि भूगोल शिकलो. मग मी प्रशालेत प्रवेश केला. पहिली तीन वर्षं मातृभाषा हेच माध्यम होतं, पण मुलांच्या डोक्यांत इंग्रजी घुसवणं हाच शिक्षकांचा उद्देश असे; त्यामुळं आमच्या वेळातला अर्ध्यापेक्षा अधिक वेळ इंग्रजी शिकण्यात आणि त्यातील विक्षिप्त स्पेलिंग आणि उच्चार शिकण्यात जाई. जसं लिहायचं तसंच वाचायचं नसे. स्पेलिंग पाठ करणं म्हणजे एक विलक्षण प्रसंग असे. आमचा खरा छळ चालू झाला, तो चौथ्या वर्षापासून. सगळं काही इंग्रजीतून शिकायचं - भूमिती, बीजगणित, रसायन, खगोलशास्त्र, इतिहास, भूगोल. इंग्रजीची सुलतानशाही इतकी होती की, संस्कृत आणि पर्शियनसुद्धा इंग्रजीतूनच शिकायचं; गुजरातीतून नव्हे. जर एखादा मुलगा सर्वांना समजणाऱ्या गुजरातीतून बोलला, तर त्याला शिक्षा होई.*** (आज ह्याचं प्रमाण वाढलंय का?)

गांधीजींचा छळ वयाच्या पंधराव्या वर्षी चालू झाला. पण आपले पालक तर बालकांचा छळ बालवाड्या, खेळघरं आणि आता तर नर्सरीपासूनच होऊ देत असतात, त्याचं काय? म्हणजे, बालपणातील सगळ्याच क्षमतांच्या पार चिंध्याच करून टाकतात. वर पाहावं तर दिवसेंदिवस सगळेच पालक मेंढरांसारखे एकाच्या मागे दुसरे आणि शहरी पालकांच्या मागे खेड्यांतले पालकही धावताना आढळतात. बरं हे कुठं थांबतंय का? नाव नको, प्राथमिक पातळीवर, माध्यमिक पातळीवर महाविद्यालयात आणि विद्यापीठातील शिक्षणात वाढत्या प्रमाणावर होताना दिसतं. उच्च पातळीवरील शिक्षण देण्याइतकी मराठी भाषेची कुवतच नाही, अशी आपणा शिक्षित मंडळींची ठाम अंधश्रद्धाच आहे आणि म.टा.च्या संपादकांनी तर तसा ठाम निष्कर्षच प्रसिद्ध केला आहे. तशी ती का झाली, कोणाच्या अपप्रचारामुळे हासुद्धा कटाक्षानं शोध घेण्यासारखा राष्ट्रीय अस्मितेचा मुद्दा आहे. हेही इंग्रजीचं मराठीवरील आक्रमणच ना? मराठी कधी काळी ज्ञानभाषा होऊ शकेल की नाही, ह्याबद्दल द. मा. मिरासदारांनीही नुकतीच चिंता व्यक्त केली आहे. (सकाळ-सप्तरंग दि. १३-४-२०१४, पान-१९)

आता इंग्रजी शाळांमुळे इतर कोणते दुष्परिणाम होतात, त्यांच्याकडेही लक्ष वेधायला हवंच. वास्तविक इंग्लंडमध्येही बुटांमुळे मुलांच्या पायांच्या वाढीला कसा अडथळा होतो, त्यावर पुष्कळ संशोधन झालं आहे. त्याच्या आधाराने शिक्षणवेधच्या मे २०१४ मध्येच मी एक लेख लिहिला, पण त्यांचा काहीही परिणाम मला तरी दिसत नाही. कारण इंग्रजीनं काहीही केलं, तरी तेच उचित असणार हीही आपल्या समाजाची अंधश्रद्धा आहे. तोच प्रकार टायचा. आपला उष्ण प्रदेश आहे. मुलांना टाय बांधून किती तास (लांब राहणाऱ्या मुलांना आठ-नऊ तास) अडकून पडावं लागतं, ह्याचा काही विचार पालकांच्या मनाला शिवतच नसावा. इंग्रजीतून शिकायचं म्हणजे हा छळवाद मुलांनी, (स्वतः नव्हे बरं) सोसलाच पाहिजे, असं पालकांना वाटत असावं. अशा शारीरिक त्रासांमुळं बालकांचं लक्ष शिकण्यात किती लागत असेल? (ही बाब दुसऱ्या गटातली आहे,

हे मला मान्य आहे. पण हेफरननबाईंचं म्हणणं सत्य आहेच ना?)

परकीय माध्यमामुळे बालकांचं काय नुकसान होतं, ह्याविषयी गांधीजींनी यंग इंडियात ९३ वर्षांपूर्वी (१-९-१९२१) लिहिलेल्या लेखातील उताराच (अनुवाद) मी देतो.

परकीय माध्यमामुळं आपल्या बालकांच्या मेंदूला थकवा येतो, त्यामुळं त्यांच्या मज्जासंस्थेवर अनाठायी ताण येऊन ती फक्त घोकंपट्टी आणि पोपटपंची करू लागली आहेत. परिणामी, मूलभूत आणि स्वतंत्र संशोधनाकरता ती अपात्र बनली आहेत. त्यांच्या ज्ञानाचा कुटुंबाला अथवा समाजाला उपयोग होत नाही. नवल म्हणजे, कोठारी आयोगानंही नेमकं हेच म्हटलं आहे. (नंतर दिलं आहे.)

कोलकाता विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात बोलताना रवींद्रनाथांनी जे भाषण दिलं, ते डॉ. कोठारी आयोगाला महत्त्वाचं वाटल्यामुळे त्यांनी ते मुद्दाम उद्धृत केलं आहे. काय म्हणतात रवींद्रनाथ? वाचा,

शिक्षणाची भाषा आणि बालकाची भाषा यांच्यांत फारकत केलेला जगात भारताशिवाय दुसरा देश नाही. पाश्चात्त्य ज्ञानाकडे वळल्याला जपानला पुरती शंभर वर्षंही झाली नाहीत..... पण शिक्षणाकरता स्वदेशीवरच निर्भर राहायचं, असा त्यांचा निर्धार होता. कारण, असले शिक्षण त्यांना निवडक नागरिकांपुरतं आणि शोभेसाठी म्हणून नको होतं, तर सर्वच नागरिकांना समर्थ आणि सुसंस्कृत करण्यासाठी हवं होतं..... परिणामी पाश्चात्त्यांच्या शोषणप्रवृत्तीला सामोरं जाणं आणि जगात स्वतःसाठी मानाचं स्थान उभारणं त्यांना शक्य झालं. म्हणून फारच थोड्यांच्या आवाक्यात येऊ शकेल, असं परकी भाषामाध्यम चालू ठेवण्याचा मूढपणा (folly) तर त्यांनी मुळीच केला नाही. (कोठारी आयोग पृ. १३)

रवींद्रनाथांच्या भाषणातील मी ठळक केलेले मुद्दे आणि आपण करीत असलेल्या कृती ह्यांचा एकत्र विचार केला की जे काय ध्यानात येतं, ते सुज्ञ वाचकांना मी सांगण्याची आवश्यकता आहे?

आता लोकमान्य टिळकांचा अनुभव ऐकू या.

दि. २७-१२-१९०८ ला लो. टिळकांनी सोलापूर येथे केलेल्या भाषणात सांगितलं (लो. टिळकांचे निबंध, पा. ६२), इंग्रजी भाषा फार द्वाड आहे. ती लवकर येत नाही. ती सोपी नाही. राज्यकर्त्यांची म्हणून शिकावी लागते. आमच्यावर ते निव्वळ ओझे आहे. आम्हाला मराठी शिक्षण मिळत नसल्यामुळे फार नुकसान होत आहे. आपणांस दोन दोन तास इंग्रजीतून बोलण्याची काय आवश्यकता आहे? ...... आम्ही हे इंग्रजी भाषेचे ज्ञान शिकण्यात अनेक वर्षं फुकट घालवली.......मला मिळालेले ज्ञान मराठी भाषेत मिळाले असते, तर हे सर्व ५२ वर्षांचे ज्ञान पंचविसाव्या किंवा तिसाव्या वर्षी मला मिळाले असते. राष्ट्रात परक्या भाषेत शिक्षण देणे, म्हणजे त्याला खच्ची करण्यासारखे आहे. याकरिता देशी भाषेत शिक्षण दिले पाहिजे.

आपल्या आयुष्यातील ३५ वर्षं वाया गेली, असं लो. टिळकांनाही वाटत होतं. परकीय माध्यमाचे कसे दुष्परिणाम होतात, त्याबद्दल गांधीजींचं मत तुम्ही वाचलंतच. ती त्यांची वैयक्तिक मतं म्हणून सोडून देऊ. पण, कोठारी आयोगानं दिलेली आणि आपण कचऱ्यात फेकलेली ही धोक्याची सूचना-

***परकीय भाषेतून शिकण्यामुळे विषयावर प्रभुत्व मिळवण्याऐवजी विद्यार्थी घोकंपट्टी करतात. शिवाय शाळांत आणि महाविद्यालयांत एकच भाषामाध्यम असण्यामुळेच शिक्षणाला भक्कम आधार मिळू शकतो आणि ज्या अर्थी शालेय पातळीवर प्रादेशिक भाषामाध्यमाचा अवलंब करण्याचा सुज्ञपणा (?) आपण दाखवला आहे; त्या अर्थी वाढत्या प्रमाणात महाविद्यालयीन पातळीवरही तेच धोरण अवलंबणं सुसंगत होईल. प्रादेशिक भाषेतून घेतलेल्या शिक्षणामुळे त्यांच्या ज्ञानाचा आणि विचारशक्तीचा दर्जा निश्चितच उंच राहील आणि ज्ञानाच्या कक्षा विस्तारित करण्यासाठी संशोधनात्मक कार्याला ते फार मोठी प्रेरणा***

*देऊ शकतील. (कोठारी आयोग पृ. १३)*

पण ते सोडून आपण उलट्या दिशेनं प्रवास करू लागलो आहोत, म्हणजे सुज्ञपणा दाखवत आहोत काय? मौलिक संशोधनाकरता आपल्या बालकांना अपात्र बनवण्याचा प्रयत्न करायचा तर मग दर्जेदार तर सोडाच, पण नवीन संशोधनाला फार मोठी तर सोडाच, थोडी तरी प्रेरणा कशी मिळेल? मग आपलं संशोधन खुरटं असल्याची खंत तरी कशाला बाळगावी? एखाद्या रोपाची मुळंच कापल्यावर त्याचा वृक्ष कसा होईल?

त्यातही शालान्त परीक्षेपर्यंत मराठी माध्यमाची निवड केल्यावर, पुढचं शिक्षण इंग्रजीतून घेण्याचं बंधन सर्वांनाच का असावं? प्रादेशिक भाषामाध्यमाचीही सोय करण्याचं बंधन विद्यापीठांवर का नाही? ज्यांना मातृभाषेचा उपयोग पटला आहे, मान्य आहे; त्यांच्या पाल्यांवर इंग्रजी माध्यमाची सक्ती का? म्हणजे शाळेबद्दल पालकांना स्वातंत्र्य असलं, तरी महाविद्यालयीन शिक्षणात ते मुळीच नाही! हा वेडगळपणा नव्हे का?

पहिल्या मुद्याचा ऊहापोह विस्तारानं करून झाल्यावर आता दुसरा मुद्दा पाहू. आपल्या मुलाला कोणत्या शाळेत घालायचं हा अधिकार पालकांना का देऊ नये, याची आणखी काही कारणं सांगतो.

१९६३-६६ आणि १९७२-७८ अशी एकूण नऊ वर्षं आप्पा बळवंत चौकातल्या नू.म.वि. मराठी शाळेचा मी प्रमुख होतो. आज जसं इंग्रजी शाळांचं वेड पालकांना लागलं आहे, तसं तेव्हा आमच्यासारख्या (आमची, नवीन मराठी, बालशिक्षण मंदिर इत्यादी) शाळांचं होतं. त्यामुळं पाषाण, सहकारनगर, येरवडा इतक्या लांबलांबच्या स्थानी राहणाऱ्या मुलांच्या पालकांनाही(च) आमच्या शाळा हव्या असत. त्यासाठी सूक्तासूक्त मार्गांनी पालक आमच्यावर दडपणं आणीत. काही सरकारी सेवक अनुदान थांबण्याची प्रच्छन्न धमकी देऊन आपला कार्यभाग साधू पाहात. काही पालक बालकाचं वयसुद्धा वाढवून खोटं लावीत. मात्र कित्येक बालकांचे आई आणि वडील दोघेही नोकरी-व्यवसाय करणारे. परिणामी, शाळा ४-४० वाजता सुटली, तरी कित्येकदा ७ वाजेपर्यंतसुद्धा न्यायला कुणी आलं नाही, म्हणून बालकं ताटकळून रडकुंडीस येत असत. याची कसलीच खंत पालकांना नसावी, याचं मला सखेदाश्चर्य वाटे. आपल्यासारख्या मोठ्या माणसांनासुद्धा, केव्हा एकदा घरी पोहोचतो असं होत नाही का? मग दहा वर्षांहून लहान मुलांचं काय होत असेल, हे पालकांना कसं कळत नाही? म्हणून, खरं तर, शाळेची निवड करण्याचा अधिकार पालकांना नसावा, हा विचार तेव्हापासूनच माझ्या मनात घर करून बसला.

१९७५ च्या सुमारची गोष्ट. म्हणजे जवळ-जवळ चाळीस वर्षांपूर्वीची गोष्ट. शिवाजीराव साळुंखे नावाच्या एका प्रयोगशील शिक्षणाधिकाऱ्यांचा माझा घनिष्ठ परिचय झाला होता. बालकांची ही अवस्था पाहून ते मला म्हणाले, राईलकरसाहेब, ह्याला उपाय नाही का हो? मी म्हणालो, उपाय नसायला काय झालं? पण तुम्हाला परवडणार नाही. तरीही मी सांगावं, असा आग्रह त्यांनी धरला; तेव्हा मी म्हणालो, ऐका, एक, पालकांचा ओढा खासगी संस्थांकडे आहे ना, तर तूर्त तुम्ही (अ) सर्व शाळा आम्हाला वाटून द्या. खरं तर खासगी-सरकारी हा भेदच काढून टाका. (आ) सर्व शुल्करहित करा. आणि (इ) सर्व खर्च करा.

दुसरं, पुणं आता विस्तारतंय. तर आताच काही विशिष्ट लोकसंख्येकरता, समजा पन्नास सहस्रांकरता एक प्राथमिक शाळा, असं धोरण ठरवून तेवढी जागा शाळेकरता राखून ठेवा आणि जागोजाग शाळा काढा.

तिसरं, शाळांवर एक बंधन, जवळच्या बालकाला प्रवेश दिलाच पाहिजे.

चौथं, पालकांवर बंधन, आपल्या पाल्याला जवळच्याच शाळेत घातलं पाहिजे.

प्रारंभी मी मांडलेले प्रश्न अशा नियमांमुळं मुळातच उद्‌भवले नसते. आणि (१) शाळा जवळच असल्यामुळे कशाला बस आणि कशाला रिक्षा? (२) परिणामी अपघाताला कारणच उरलं नसतं. (अपघाताचं खापर फोडण्याकरता डोकी शोधायचं काम राहिलं नसतं. त्यावरून चाललेल्या संघर्षालाही

जागा राहिली नसती!) (३) कोणतंही बालक चालत पाच मिनिटांत आपापल्या शाळेत जाऊ शकलं असतं. (४) त्यामुळे त्याला वेळच्या वेळी (निदान, तीन तीन तासांनी) खाण्याकरता वेळ उपलब्ध झाला असता. (५) खेळण्याकरताही वेळ उपलब्ध झाला असता. (६) इतर छंद जोपासण्याकरता वेळ उपलब्ध झाला असता. (७) आणि पालकांच्या स्वनिर्मित कल्पनांकरता लांबच्या शाळेत घातल्यामुळे केवळ शाळेत जाण्या-येण्याकरता घडणारं ताटकळणं संपलं असतं. (८) ताटकळण्याचे जे कल्पनातीत दुष्परिणाम बालकांच्या मनोविकासावर होत असतात, ते टळले असते. (९) आणि मागास गटातल्या २५ टक्क्यांच्या प्रवेशाची योजनाही आपोआपच कार्यान्वित झाली असती. (१०) प्रवेशाकरता घेतल्या जाणाऱ्या देणग्या, त्यातून घडणारा संभाव्य भ्रष्टाचारही टळला असता. (११) प्रवेशाकरता घेतल्या जाणाऱ्या मुलाखती बंद पडल्या असत्या. (१२) या ना त्या कारणांकरता म्हणून पालकांना लुबाडण्याऱ्या शाळांच्या चाललेल्या चावटपणाला आळा बसला असता. आणखीही काही लाभ असतील, तेही साध्य झाले असते. पण, कुणाचं पोट दुखलं ते माहीत नाही. घडलं नाही, ही वस्तुस्थिती आहे.

आता जरा बालकांच्या आयुष्यात खेळण्याचं महत्त्व काय आणि किती असतं, याबद्दल संशोधक काय म्हणतात, ते पाहू. आणि मग संशोधन खुरटं का? असं विचारण्याचा तुम्हाला काय अधिकार? असा प्रश्न मीच तुम्हाला विचारीन.

सध्या निवृत्त असलेले डॉ. डेविड एल्किंड मसाच्युसेट्समधील मेडफोर्ड येथील टफ्ट (Tuft) विद्यापीठात बालविकास विषयाचे सन्मान्य प्राध्यापक आहेत. The Hurried Child, All grown up and no place to go, Miseducation आणि नुकतंच प्रसिद्ध झालेलं The Power of Play ही त्यांची पुस्तकं आहेत. ते नेहमी बालविकासाच्या प्रश्नांसंबंधी www.Justaskbaby.com. या ब्लॉगवर लिहीत असतात. मुलांच्या मेंदूच्या विकासात खेळांचं स्थान अनन्य असल्याचं त्यांचं प्रतिपादन आहे. खरं तर, हाच एका संपूर्ण लेखाचा विषय आहे. पण, तूर्त तो विषय नसल्यानं आत्ता काही लिहीत नाही. गुणवत्तापूर्ण संशोधनाकरता मेंदूचाही तसाच विकास व्हायला नको का? आता एकच प्रश्न. पालकांच्या इच्छेप्रमाणं बालकांना लांबच्या शाळेत घातलं आणि तिथं जाण्या-येण्याकरताच बालकाचे दिवसातले पाचसहा तास जाणार असतील, तर त्यांनी खेळायचं केव्हा? आणि त्यांच्या मेंदूचा विकास व्हायचा कसा? आणि ती संशोधनक्षम व्हायची कशी? पुण्यातले डॉ. राजीव शारंगपाणी क्रीडावैद्यकातील एक तज्ज्ञ आपल्याला माहीत असतील. त्यांनाही मी डॉ. एल्किंडांच्या ह्या प्रतिपादनाबद्दल विचारलं, तेव्हा त्यांनीही, शंकाच नको, असं म्हणून ठाम दुजोरा दिला.

आमच्या परिचयात एक मुलगा आहे. त्याचे प्रतिदिन पाच-सहा तास शाळेत जाण्या-येण्यासाठीच व्यतीत होतात. तो घरी सहा वाजल्यानंतर येतो. नंतर काय करतोस असं विचारलं, तर म्हणाला, मी इंग्रजीच्या क्लासला जातो. क्लासला जाणाऱ्या मुलांची सांख्यिकी मजजवळ नाही. पण विचारलं तर, चित्रकला, वाद्यवादन, गायन अशा वर्गाला जात असणारी कुणी मुलं मला विशेष आढळली नाहीत. अशा कला-शिक्षणाचाही मेंदूच्या विकासाला हातभार लागतो. साधी गोष्ट. समजा कुणी व्हायोलीन वाजवायला शिकला आणि शिकलेलं गाणं जरी त्यानं वाजवून दाखवलं; तरी तेसुद्धा त्याच्यापुरतं एक प्रकारचं सर्जनच असतं. कारण ती कलाकृती त्यानं स्वतः निर्माण केलेली असते. पण, पुस्तकी विद्येनं डोकी फिरलेल्यातले किती पालक बालकांना अशा वर्गाला पाठवीत असतील, कोण जाणे? यावरही संशोधन व्हायला हवं आहे.

थोडक्यात, आपल्या बालकांचे पंख आपण बालपणीच कापून टाकतो आणि तरीही त्यांनी प्रौढ वयात भरारी घ्यावी अशी अपेक्षा करतो! तसा अधिकार तुम्हाला आहे का? संशोधनात भारत मागास का असं विचारायचा अधिकार तुम्हाला आहे का? आपलं संशोधन खुरटं का असं विचारायचा, अधिकार आहे? छे!

**

बालशिक्षण

प्रा. रमेश पानसे

# आनंद आणि शिक्षण

जन्माला आल्यापासून माणसाला जगण्याची, जगत राहण्याची दुर्दम्य आकांक्षा असते; नैसर्गिक प्रेरणा असते. पण एवढेच नाही, हे जगणे समाधानाचे असावे, सुखाचे असावे, आनंदाचेही असावे, अशी जबरदस्त प्रेरणा निसर्गाने माणसाला बहाल केली आहे. त्यामुळे, नुसते जगणे नाही तर सुखासमाधानाने जगणे ही माणसाची मूलभूत गरज असते. आजचा नाही तर गेल्या पंचवीस कोटी वर्षांपासून, माणूस हा माणूस म्हणून या पृथ्वीतलावर अवतरल्यापासून, माणसाला सुखाने जगण्याची इच्छा असल्याचे उत्क्रांतीकाळात दिसून आले आहे. माणसाचा मेंदू या दिशेने घडत गेला आहे. जगण्याच्या उपजत प्रेरणेने तो सुरक्षिततेसाठी धडपडत आहे आणि त्याचबरोबर तो सुखाच्या शोधातही मग्न आहे.

मानवी मेंदू आपली सुरक्षिततेची गरज, आपल्या अंतर्गत असलेल्या दोन स्वतंत्र व्यवस्थांच्या साहाय्याने भागवत असतो. एक आहे सुखाची भावना, तर दुसरी आहे दुःखाची भावना. एक सुखकारक म्हणून हवीशी वाटणारी, तर दुसरी शोककारक म्हणून नकोशी वाटणारी. एकीला मेंदू स्वीकारत असतो, तर दुसरीला तो नाकारत असतो. घडून येणाऱ्या आनंदकारक घटनांनी सुखाची भावना निर्माण होते; तर भीती, ताण, धोके इत्यादींनी दुःखाची भावना निर्माण होत असते.



मेंदूला आणखी एक काम करावे लागते. ते म्हणजे दुःखकारक गोष्टी टाळण्याचा प्रयत्न करणे आणि सुखकारक गोष्टी आपल्याशा करीत जाणे. म्हणजेच, मेंदूला याबाबत काही विचारपूर्वक निर्णय घ्यावे लागतात. हे निर्णय घेण्याचे काम, मेंदूतील बौद्धिक भाग करीत असतो. विचार करणे, निर्णय घेणे, निवाडा करणे, नियोजन करणे अशी अनेक कामे मेंदूचा बौद्धिक भाग करीत असतो. म्हणजे, आता, जगणे, सुरक्षित राहणे, दुःख टाळणे, सुख शोधणे या साऱ्यांसाठी बुद्धीचा वापर मेंदू करीत असतो. अशा कामांसाठी बौद्धिक मेंदू हा मनुष्यप्राण्याला प्राप्त झालेले एक बळकट साधन आहे.




मेंदूमध्ये दुःखाच्या जाणीवेचे केंद्र, तसेच सुखाच्या जाणीवेचे केंद्र या व्यवस्था निसर्गतः अस्तित्वात असल्या; तरी कशामुळे त्यांची जाणीव व्हावी, हे मेंदूने ठरविलेले नसते. मानवी जीवन व्यवहारातील गोष्टींवरून, सामाजिक संकेतांवरून दुःख कशाचे करावे, सुख कशात मानावे हे ठरत असते. भीती वाटली, ताण आले की, त्याचे परिणाम मेंदूवर होतात. परंतु कशाची भीती वाटावी, कशाचे ताण यावेत; ह्या वैयक्तिक अनुभवांनी आणि सामाजिक संकेतांनी ग्राह्य धरलेल्या गोष्टी असतात. व्यक्ती ह्या गोष्टी समाजाकडून शिकून घेतात. विस्तवाने भाजते हे ज्ञान प्रत्यक्ष अनुभवाने किंवा समाजाकडून घेतले जाते. मेंदूत त्याची दुःखाची केवळ जाणीव होते. या ज्ञानाने मेंदूही शहाणा होतो. विस्तव दिसला की, त्याला धोक्याचे आकलन होऊन तो आपला हात आखडता घ्यायला लावतो. दुःखकारक वेदनेपासून आधीच स्वतःला आवरतो; स्वतःवर नियंत्रण ठेवतो. काही गोष्टी केवळ वैयक्तिक अनुभवांतूनच आनंददायक किंवा भीतीदायक ठरतात. एखाद्याला पोहणे, पाण्याच्या धबधब्याखाली उभे राहणे आनंददायक वाटेल तर तेच दुसऱ्या एखाद्याला भीतीदायक वाटेल. एकजण त्याच्याकडे धाव घेईल, तर दुसरा त्याच्यापासून पळ काढील.

शालेय वयातील विद्यार्थी आणि शालेयपूर्व वयातील मूल यांच्या दैनंदिन शिक्षण व्यवहारांचा मागोवा घेतला, तर ठळकपणे, दोन शिक्षणप्रक्रिया एकाच वेळी चालू असतात. या प्रक्रिया काही वेळा परस्परांना पोषक ठरतात, तर अनेकदा त्या परस्परांना छेद देतात. यांतील एक असते ती, शिकण्याची नैसर्गिकरीत्या चालणारी प्रक्रिया. हिला आपण शिकण्याची निसर्गानुसारी प्रक्रिया असे म्हणू या. दुसरी प्रक्रिया असते ती समाजातील प्रौढांनी ठरविलेली, प्रौढांनी शिकवून मुलांनी शिकायची प्रक्रिया हिला आपण शिकण्याची समाजानुसारी प्रक्रिया असे म्हणू शकू. निसर्गानुसारी असणारी शिकण्याची प्रक्रिया ही निसर्गतःच आनंदमय असते. याचे कारण असे की, शिकणे, सातत्याने शिकत जाणे, ही जन्मापासून मुलांची विकासात्मक गरज असते; आणि यासाठी सतत नव्या गोष्टी शिकण्याची आव्हाने, मुले आपणहून अंगावर घेत असतात. माझ्या शेजारी राहणारी दीड-पावणेदोन वर्षांची स्वरा रोज माझ्याकडे खेळायला येते. (ती, हा माझ्या अभ्यासाचाच विषय आहे!) गेले काही दिवस ती आपणहून पलंगावर चढण्याचा प्रयत्न करीत होती. माझ्या घरी आल्या-आल्या हा उद्योग सुरू होई. केव्हातरी हा तिचा प्रयत्न यशस्वी झाला. त्या विजयाचा तिच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहण्यासारखा होता. त्यानंतर दोन-चार दिवस तिला पलंगावर चढण्याचा ध्यासच लागला होता; त्याचवेळी पलंगावरून उतरणे,



ही वेगळी गोष्ट शिकण्याचा प्रयत्न सुरू झाला. हे जेव्हा जमले, तेव्हा स्वराचा पलंगावर चढण्या-उतरण्याचा उद्योग काही काळ सातत्याने चालूच राहिला. थोड्याच काळात या गोष्टीतले स्वराचे स्वारस्य संपले; आणि ती आता खुर्चीवर चढण्याचा प्रयत्न करू लागली. खुर्ची ही पलंगापेक्षा थोडी उंच, तसेच पलंगापेक्षा कितीतरी अरुंद होती. अख्खे पाय पसरून, पलंगासारखे त्यावर चढता येत नव्हते; पाय खूप दुमडून घ्यावे लागत. अंगही झोकून देता येत नव्हते. तरीही स्वराने हे आव्हान आपणहून घेतले. यथावकाश हेही जमले. आपल्या विकासात्मक गरजांसाठी शिकताना, मुले चार पायऱ्यांनी पुढे जातात. प्रथमतः एखादी गोष्ट येण्यासाठी प्रयत्न करणे, ती आल्यावर कुशलतेसाठी सराव करणे, नीट जमल्यावर ती गोष्ट सोडून देणे आणि नंतर नवी (कठीण) गोष्ट शिकण्यासाठी नवे आव्हान घेणे. स्वराची याच वयातली, भाषा आत्मसात करण्याची शिक्षणप्रक्रिया मी अनुभवतो आहे. तिला सारखे काहीतरी म्हणायचे असते, व्यक्त करायचे असते; पण आपल्या भाषेतील शब्द अजून तिच्या मुखातून तिला काढता येत नाहीत. मनात 'अर्थ' आहे, स्वर आहेत, इतरांचे अवलोकन करून साध्य झालेली बोलण्याची धाटणी आहे. अर्थपूर्ण हातवारे आहेत, चेहऱ्यावर तसेच अर्थपूर्ण भाव आहेत, परंतु नुसत्या आवाजात ती व्यक्त होते आहे आणि मी तिला (जमेल तो) प्रतिसाद माझ्या

भाषेत देत आहे. अशा आमच्या गप्पा रंगताहेत. हे सारे चालत असताना स्वराचा आनंद मी त्रयस्थपणे अनुभवतोय.

केवळ स्वराच नव्हे, सर्वच मुले आपल्या वाढत्या वयाच्या विकासाच्या गरजा आपल्या आपणच शिकून आनंदाने भागवतात. मग त्या दोरीवरच्या उड्या असोत, सायकल चालवणे असो, मोबाईल हाताळणे असो, कोडे सोडवणे असो, पोहणे असो, दुसरी भाषा शिकणे असो किंवा अन्य अनेक गोष्टी असोत मुले आनंदानेच शिकतात. ज्ञाननिर्मिती करतात, कुशलता प्राप्त करतात आणि नवनवी आव्हाने पेलत जातात.

शिकण्याची समाजानुसारी प्रक्रिया ही नैसर्गिक प्रक्रियेशी जोडली गेलेली नसेल, तर ती शिकणाऱ्यास, विद्यार्थ्यास आधी स्वीकारावी लागते; कारण ती दुसऱ्या कोणीतरी शिकवून शिकण्याची प्रक्रिया असते. मग ते खरे वा बरे बोलणे असो, स्पर्धेसाठी तयारी करणे असो, शाळेत विषय शिकणे असो वा दिलेला गृहपाठ करणे असो; आपल्याला न येणाऱ्या इंग्रजी भाषेच्या माध्यमातून शिकणे असो वा परीक्षांसाठी घोकणे असो; यांतील प्रत्येक गोष्ट, बहुधा, कळत-नकळतपणे मुले अनिच्छेने स्वीकारत असतात. त्यात त्यांचा अंतःस्फूर्तीचा भाग क्वचितच असतो. त्यामुळे, अशा प्रकारच्या शिकण्याचे ताण विद्यार्थ्यांवर येतात. ताणपूर्ण शिकण्याचे त्यांच्या बौद्धिक, मानसिक व शारीरिक आरोग्यावर अनिष्ट परिणाम होतात. हे परिणाम लहान वयात अधिक तीव्रतेने होतात.

अलीकडेच, 'राष्ट्रीय बालआरोग्य कार्यक्रमा'च्या अंतर्गत, अंगणवाड्यांतून जाणाऱ्या, म्हणजे सहा वर्षांच्या आतील मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. याचे निष्कर्ष धक्कादायक आहेत. महाराष्ट्र राज्यातील तपासणी केलेल्या विद्यार्थ्यांमधील १९ हजार विद्यार्थ्यांना विविध तऱ्हेचे आजार आढळले; त्यात ३६२७ विद्यार्थ्यांमध्ये हृदयदोष आढळला असून, त्यांमधील गंभीर स्वरूपाचे हृदयरोग असणाऱ्या विद्यार्थ्यांवर शस्त्रक्रियाही करण्यात आल्या आहेत. या विविध आजारांची कारणे अनेक असतील, पण त्यांत, अनारोग्यकारक शैक्षणिक ताण; हेही एक महत्त्वाचे कारण ठरण्याची शक्यता दाट आहे. वास्तविक शालेय औपचारिक शिक्षण सहा वर्षांनंतर सुरू करण्याचा कायदा असूनही, केवळ पालकांच्या हट्टांमुळे आणि संस्था-चालकांच्या अज्ञानामुळे वयाच्या थेट दुसऱ्या वर्षापासून मुले अशा शिक्षणाला बांधून ठेवली जात असल्याचे दृश्य सार्वत्रिक आहे.

खालपासून वरपर्यंत सर्व स्तरांवरची शिक्षणरचना बंदिस्त स्वरूपाची झाली आहे. नियमांनी घट्ट बांधलेली, शिस्त-शिक्षा-स्पर्धा यांचा अतिरेक झालेली, अभ्यासक्रम, क्रमिक पुस्तके, वेळापत्रक व त्यांची परीक्षांशी असलेली बांधिलकी यांनी शिक्षणाची मानच आवळली जात आहे. स्वतः शिकणारा विद्यार्थीच इथे दुय्यम झाला आहे. त्याची आवड, निवड, कल, क्षमता, भावना या साऱ्या गोष्टींना स्वतंत्रपणे वाव दिला जात नाही. विद्यार्थ्यांची व्यक्तिगत नैसर्गिकता आणि त्याचे वर्गातील शिकणे यांत फार मोठी विसंगती निर्माण होत आहे. त्यामुळे ही शिकण्याची प्रक्रिया बहुतांशी विद्यार्थ्यांना बहुतेक वेळा समाधानाची नव्हे; तर वेदनाकारक ठरत आहे.

आपल्याला काय आवडते आणि दीर्घकालाच्या दृष्टीने काय हिताचे आहे, यात फरक करण्याचे, निवड करण्याचे तारतम्य लहान वयात मुलांना नसते. त्यांचा बौद्धिक मेंदू, असा विचार करून निर्णय घेण्यास सक्षम नसतो. साहजिकच, मुलांच्या शिक्षणाशी संबंधित प्रौढांनी, म्हणजे, मुख्यतः पालकांनी आणि शिक्षकांनी एका वेगळ्या दिशेने विचार करायची गरज आहे. घरी किंवा शाळेत मुलांच्या हिताचे जे आहे ते त्यांना कसे आवडेल, आणि जे अहिताचे आहे ते त्यांना कसे नावडेल यासाठी काही वैचारिक नियोजन आणि त्याप्रमाणे व्यवहारातील वागणी ठरवायला हवीत!

'आपण जेव्हा शिकतो' तेव्हा त्याच्या, मुख्य तीन आकलनविषयक प्रक्रिया मेंदूमध्ये घडून येतात. पहिलीला आपण 'निवड प्रक्रिया' म्हणून संबोधू या. ज्ञानेंद्रियांकरवी मेंदूमध्ये प्रवेश करणाऱ्या माहितीतील प्रस्तुत वाटणाऱ्या माहितीची 'निवड' केली जाते. ही



प्रस्तुत ठरणारी माहितीच केवळ मनाच्या पातळीवर आकलक संरचनेत संघटित होते. ही ‘संघटन प्रक्रिया’ होय. त्यानंतर, दीर्घकालिक स्मृतिकोशात अगोदरच साठलेल्या पूर्वज्ञानास उत्तेजित करून, त्याच्याशी या नव्या संघटित ‘माहितीची सांगड’ घातली जाते. ही प्रत्यक्षात माहितीचा अर्थ लावण्याची पायरी असते. हे अर्थ लावणे, म्हणजेच आपले शिकणे असते. यामध्ये या तीनही मानस पातळीवरील आकलन प्रक्रिया समाविष्ट आहेत.

नेटक्या आणि निरंतर आकलनासाठी, मिळालेली माहिती समाधान देणारी आहे किंवा नाही याची तपासणी मध्यमेंदूत असणारी बदामाच्या आकाराची ॲमिग्डला नावाची ग्रंथी करीत असते. ती एखाद्या चाळणीसारखे काम करीत असते. माहिती समाधानकारक असेल, तरच ती बौद्धिक मेंदूकडे रवाना केली जाते; आपले शिकण्याचे, आकलन करून घेण्याचे काम प्रभावी होते.

आपल्याला समाधान प्राप्त करून देणाऱ्या, आनंद निर्मिती करणाऱ्या अशा काही व्यवस्था मेंदूमध्ये आहेत व त्या तीन तऱ्हेने कार्य करतात. प्रथमतः चाळणीने चाळून घेऊन, आलेल्या संवेदना समाधानाकडे झुकणाऱ्या आहेत की नाही हे ठरविणे; तशा त्या असल्यास, त्यासाठी आवश्यक ते वर्तन घडवून आणणे, आणि तीन, प्रत्यक्ष समाधानाचा अनुभव घेणे. आपण आपल्या बाह्य वर्तनात जेव्हा निसर्गानुसारी पद्धतींचा अवलंब करतो, तेव्हा या प्रक्रिया घडून येतात. उदाहरणार्थ, मुले जेव्हा मुक्त शारीरिक हालचाली करीत असतात, खेळत असतात, उगीचच इकडून तिकडे धावत असतात, नाचत असतात, हुंदडत असतात; तेव्हा त्यावेळच्या शारीरिक क्रिया ह्या आनंदमय असतात.

अशा क्रिया आनंदमय असतात. त्या भावस्थिती समाधानाची ठेवतात, याची मेंदूपातळीवर काही ‘रासायनिक’ कारणे आहेत. डोपमाईन नावाचे

रासायनिक द्रव्य हे आनंदनिर्मितीच्या सर्व क्रियांशी संबंधित असते. हे मेंदूच्या सर्वात खालच्या थरात, म्हणजे मेंदूच्या देठामध्ये तयार होते व मेंदूच्या सर्वात वरच्या थरात, म्हणजे नवबाह्यकात पसरते; तेव्हा आपली भावस्थिती आनंदाची बनते. ह्या डोपमाईनचे आणखी एक वैशिष्ट्य असे की ते, नवबाह्यकाच्या पुढील अर्ध्या भागातच पसरते; आणि हाच नेमका मेंदूचा बौद्धिक भाग आहे. समस्यानिवारण, नियोजन, विचार, चालू स्मृतींचा वापर, निर्णय अशा साऱ्या बौद्धिक क्रियांचा तो कारक आहे. डोपमाईन येथे पसरते, तेव्हा या सर्व क्रिया आनंदाच्या होतात. शिकण्याच्या प्रक्रियेत जेव्हा आपण बौद्धिक आकलन करून घेत असतो, त्या वेळी पसरणारे डोपमाईन तेथील पेशीजोडणीच्या स्थानांवर म्हणजे विदरांवर परिणाम करते आणि आपली बौद्धिक कृती आनंदमय होते. त्यामुळे आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, सहजपणे होणारे, ताणविरहित पध्दतींनी होणारे शिकण्याचे बौद्धिक काम हे समाधान देणारेच असते. जेव्हा एखाद्या विशिष्ट उद्दिष्टाच्या पूर्ततेच्या दिशेने जाणारी वैचारिक, बौद्धिक कृती (वा शारीरिक कृती) असते, तेव्हा ती आनंदी करणारी असते.

नैसर्गिकरीत्या शिक्षणात किंवा प्रत्यक्षात शिकण्याच्या प्रक्रियेत असणारी आनंदमयता कशी टिकवून ठेवावी, जमल्यास कशी वाढवावी, जेणेकरून विद्यार्थ्यांना प्रभावीरीत्या शिकण्याची संधी कशी प्राप्त होईल; हे आपल्या पुढचे, आजच्या घडीचे आव्हान देणारे प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडविण्याची एक दिशा मात्र स्पष्ट आहे. प्रत्यक्ष शिक्षण व्यवहारातील दु:खकारक गोष्टींची मात्रा कमी कमी करणे वा सुखकारक बाबींची मात्रा वाढवणे.

आजचे अगदी बालवाडीपासून पुढे सर्वच स्तरांवरचे शिक्षण हे ताणपूर्ण झाले आहे; त्याचा विद्यार्थ्यांच्या केवळ शिकण्यावरच नव्हे; तर त्यांच्या वागणुकीवरही अनिष्ट परिणाम होत आहे. त्यांची मानसिक स्थिती शाळेपासून, 'शाळेतील अभ्यास' नामक गोष्टीपासून पळ काढण्याची होते, हे आपल्या ओळखीचे आहे. मुले काही वेळा टोकाची हिंसात्मक बनतात, हेही काही उदाहरणांवरून दिसून आले आहे. सर्वच विद्यार्थी काही अशा टोकाला जात नाहीत हे खरे; पण ज्याअर्थी ..... विचार करण्याची गरज आहे.

ज्याअर्थी शाळांमधून बेशिस्तीचे वातावरण सर्वसाधारणपणे आढळून येते, त्याअर्थी विद्यार्थ्यांच्या मनावर कोणते ना कोणते न पेलणारे ताण घर करून आहेत, असे मानण्यास जागा आहे. मुले स्वभावतःच स्वयंशिस्तीची असतात. शाळेत वातावरण प्रसन्न असेल, हालाचालींच्या परस्परांतील बोलण्याच्या मुक्ततेचे असेल, शिक्षक-विद्यार्थी संबंधात गोडीगुलाबी असेल आणि अभ्यास करायला मजा येत असेल तर मुलांना शिस्त लावावी लागत नाही. ती स्वयंशिस्तीने शाळेत वावरतात, वागतात. परंतु बहुतेक शाळांमधून असे वातावरण नाही, म्हणून मुले अनेकदा सैरभैर होतात.

मुलांची मने दूषित करणारे दोन प्रकारचे ताण अनेक मुले सोसत असतात. प्रामुख्याने शाळा निर्माण करीत असलेले बौद्धिक ताण आणि प्रामुख्याने विद्यार्थ्यांची घरे निर्माण करीत असलेले भावनिक ताण हे ते दोन तऱ्हेचे ताण होत. शाळा ह्या 'अभ्यास' या प्रकरणाचा इतका बाऊ करतात; की मुलांनी त्या आपल्या ऐन उमेदीच्या, घडत्या वयात दुसरे काही करूच नये. शाळेत 'अभ्यास', घरी गृहपाठाचा अभ्यास, शिकवणीच्या वर्गांमधून पुन्हा अभ्यास! अभ्यास पुन्हा अभ्यास नि पुन्हा अभ्यास, अशा कंटाळवाण्या दिनचर्येत शाळा मुलांना अडकवतात. कंटाळ्याचा ताण हा मुलांसाठी विलक्षण घातक ताण असतो. वरवर पाहता तो मुलांच्या बौद्धिक कामांमध्ये अडथळा निर्माण करतो; तर खोलवर शोधल्यास हा ताण कामाच्या नावडीची, अभ्यास टाळण्याची, जिज्ञासा मारण्याची आणि कंटाळ्याची वृत्ती निर्माण करण्याची शक्यता असते. यातून विद्यार्थ्यांची बौद्धिक शक्तीच कमजोर होते. त्यामुळे मग शिक्षणात अपयशाचे, भीतीचे व गैरसोयीचे नवे प्रश्न निर्माण होतात. वेळोवेळी

सातत्याने पुढे अवतरणाऱ्या परीक्षा, चाचण्या; त्यात चांगले गुण न मिळण्याची भीती आणि मुख्यत्वेकरून परीक्षांसाठी अटीतटीने केलेले प्रश्नोत्तरांचे पाठांतर या बाबी फार मोठे बौद्धिक ओझे विद्यार्थ्यांच्या मेंदूवर लादतात. अशा आणि इतर अनेक प्रकारच्या बौद्धिक दडपणाखाली जेव्हा मुलांना सातत्याने वावरावे लागते, तेव्हा ती अगतिक होतात. त्यांच्या भावना तीव्र बनतात. एकीकडे अशा बौद्धिक दडपणाने भावना तीव्र होतात, तर दुसरीकडे घराघरांमधून मुलांच्या सातत्याने भावनिक दबावाखाली वावरण्यामुळे त्यांचे बौद्धिक काम कमजोर होते. घरच्यांच्या अपेक्षा, इच्छा, आकांक्षा मुलांवर सातत्याने भावनिक दडपण आणतात. याची सुरुवात तर मुलांच्या अगदी न कळत्या वयापासून होत असते. परवा, माझ्या तीन वर्षे वयाच्या नातीच्या बालशाळेत आजी-आजोबा संमेलनाला गेलो होते. तेथे कार्यक्रमात आजी किंवा आजोबांनी आपला नातू ( वय २ वर्षे) कसा मोठेपणी डॉक्टर किंवा मोठा पोलीस अधिकारी होणार आहे याविषयी सांगितले. मात्र भाषा होती ती 'आम्ही त्याला असे असे करणार आहोत!' अशी. मूल जन्माला आले की, अत्यानंदाने आपल्या मुलाला सर्वगुणसंपन्न मानून आपण त्यांना 'कोणातरी' करण्याचा अहंकार बाळगायचा हे अनेक कुटुंबातून प्रकर्षाने दिसून येते. आणि मग आपल्या अपेक्षा नि वाढत्या वयातील मुलांचे त्यांच्या अंगभूत कलाने वाढणे यामध्ये संघर्ष येऊ लागतो. हे इच्छा-अपेक्षांचे भावनिक ताण मुलांचे स्वतःचे भावविश्व उद्ध्वस्त करून टाकते नि मग मुले सैरभैर होतात.

शाळांतील बौद्धिक ताण, त्यातून होणारी भावनिक घसरण त्यामध्ये घरच्या भावनिक ताणांची पडणारी भर व त्यामुळे होणारी बौद्धिक घसरण हे एक दुष्टचक्र विद्यार्थांचे जीवन दूषित करताहेत, याचा शिक्षक-पालक वर्गांनी जाणतेपणाने विचार करण्याची गरज आहे.

आजवर आपण शालेय शिक्षणाची एक चौकट ठरवून ठेवली होती आणि सर्वच विद्यार्थ्यांना त्या चौकटीतच बसविण्याची खटपट करीत राहिलो. जी मुले या चौकटीत चपखल बसली, त्यांच्यावर 'हुशार' असा शिक्का मारला, जी मुले खूप खटपटीने चौकटीत काहीशी शिरू शकली, त्यांना आपण उत्तीर्ण केले. मात्र जी या चौकटीत बसू शकली नाहीत, त्यांना शिक्षण व्यवस्थेने नाकारले; अनुत्तीर्ण केले. शाळेबाहेरही ढकलले. आता आपण ठरविलेल्या शिक्षण चौकटीत विद्यार्थ्यांना अडकवू पाहत नाही; तर शिक्षण मुक्त करून प्रत्येक विद्यार्थ्यांच्या चौकटीत ते कसे चपखल बसेल ते पाहत आहोत. सूर्य प्रत्येक ग्रहाला प्रकाश देतो. प्रत्येक ग्रह मात्र स्वतःच्या वेगाने, स्वतःच्या कलाने तो घेत असतो.

**


| पुणे कार्यालय : ग्राममंगल, गांधीभवन परिसर, अंधशाळेशेजारी, कोथरूड, पुणे ४११ ०३८. संवाद : ०२० २५३८६६८७ | वार्षिक वर्गणी रुपये ४००/-<br>त्रैवार्षिक वर्गणी रुपये १०००/-<br>किंवा ग्राममंगल संस्थेला १०,००० रुपये वा अधिक देणगी द्या.<br>'८० जी' कलमाखाली आयकरातून सूट मिळवा आणि<br>दरमहा 'शिक्षणवेध'चा अंकही मिळवा.<br>वर्गणी/रोख/चेक/ड्राफ्टने 'ग्राममंगल' या नावाने पाठवू शकता.<br>मुंबई-पुणे बाहेरील चेकसाठी रुपये ३०/- वटणावळ आवश्यक. |
|---|---|

विशेष लेख

श्रीरंग काटेकर

# प्राथमिक शिक्षकाची वाट बिकट

**प्राथमिक** शिक्षण प्रत्येक घटकास प्राप्त झाले पाहिजे, ही शासनाची भूमिका आहे. अनेक शासनमान्य शाळा व खासगी शैक्षणिक संस्था यासाठी प्रयत्नशील आहेत. प्राथमिक शिक्षण सर्वांसाठीचा नारा देत अनेक शैक्षणिक संस्था वेगवेगळया उपक्रमांद्वारे, तसेच शासन स्तरावर व खासगी स्तरावर मोठया प्रमाणात जनजागृती केली जात आहे. शिक्षणातून समृद्धी व विकसनशील भारताचे स्वप्न साकारण्यासाठी प्राथमिक शिक्षणास महत्त्व प्राप्त झाले आहे. यामुळे ग्रामीण व शहरी भागांत अनेक शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत. या शैक्षणिक संस्थांमधून विद्यार्थ्यांना ज्ञानदान प्राप्त होत आहे. अनेक शैक्षणिक संस्थानी दर्जात्मक शिक्षणाची कास धरून, विद्यार्थी केंद्रभूत शिक्षणपद्धतीचा अवलंब केला आहे, अशा संस्थेमध्ये विद्यार्थीसंख्या अधिक आहे. या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी मोठमोठया रांगा लागत आहेत. तर अनेक शैक्षणिक संस्थांत विद्यार्थी पटसंख्येअभावी बिकट अवस्था झाली आहे. येथील शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या दारोदारी जाऊन पालकांस पाल्याच्या प्रवेशासाठी याचना करावी लागते. अशी स्थिती प्राथमिक शिक्षणातील दर्जाहीन शिक्षण संस्थांची झाली आहे हे वास्तव आहे.

## *आकडे ....... खरेच बोलतात*

*पुरोगामी विचाराची बांधिलकी स्वीकारणाऱ्या महाराष्ट्राची शिक्षण व्यवस्थांची बिकट स्थिती झाली आहे. राज्यात एकही विद्यार्थीपट नसलेल्या शाळेची संख्या २८ आहे, तर एक विद्यार्थीपट असलेल्या शाळेची संख्या ५४, तर दोन विद्यार्थी पट असलेल्या शाळेची संख्या १३४ आहे. हे बोलके आकडे पाहाता पाचपेक्षा कमी विद्यार्थीपट असलेल्या शाळेची एकूण संख्या १०५९ इतकी आहे. इतकी भयानक स्थिती महाराष्ट्र राज्याच्या प्राथमिक शिक्षणाची झाली आहे. या बोलक्या आकड्यांचा बोध घेतल्यास विद्यार्थ्यांना सुविधा व दर्जात्मक शिक्षणाचा अभाव, हेच प्रमुख कारण या शाळेचे दिसून येते.*

अनुदानीत आणि विनाअनुदानीत अनेक संस्था विद्यार्थी पटसंख्येअभावी अडचणीत आल्या आहेत.

शासनाच्या धोरणानुसार विद्यार्थीसंख्येवर आधारित शिक्षक नेमणुकीचे धोरण आणि वर्गातील पटसंख्यांच्या बेरीज-बजावाकीवर शिक्षकांचे भवितव्य अवलंबून आहे. प्राथमिक शिक्षण ते माध्यमिक शिक्षणस्तरावर शैक्षणिक क्षेत्रातील हे वास्तव आहे.

पटसंख्येअभावी बंद होणाऱ्या शिक्षण संस्थांमधील शिक्षकांची स्थिती भयानक आहे. शिक्षणसेवक म्हणून कार्यकाळ पूर्ण करताना बऱ्याच यंत्रणेतून हात ओले करून, जेव्हा अर्थिक स्थितीने शिक्षक स्थिरावतात, तोच वर्गातील पटसंख्येची टांगटी तलवार त्यांच्यावर कायमच राहते. तेव्हा शिक्षकांनी शिक्षण काळातील घेतलेल्या ज्ञानाची नोकरीच्या ठिकाणीच खरी कसोटी लागते. शिक्षकाची जर गुणवत्ता असेल, तर विद्यार्थी वर्गात बहरतो; पण शिक्षकच ओळखीने अथवा वशिलेबाजीने पद मिळवतो, तेथे मात्र विद्यार्थी वर्ग रिकामा राहतो. असे वेळोवेळी पाहणी पथकाने सिद्ध केले आहे.

विद्यार्थी पटसंख्येअभावी शिक्षण संस्थेची अवस्था दयनीय झाली आहे. शिक्षकांचे मोठमोठे पगार आणि वर्गातील विद्यार्थी संख्या याचा ताळमेळ बघता शासनाने अनेक शिक्षण संस्थांच्या मान्यता रद्द केल्या आहेत. शिक्षणक्षेत्रातील या दयनीय परिस्थितीला जबाबदार कोण? याचेही आत्मचिंतन होणे आवश्यक आहे. शिक्षणाचे बाजारीकरण याबरोबरच दर्जात्मक शिक्षणाचा अभाव यांमुळे शिक्षणक्षेत्रात ही परिस्थिती झाली आहे. पुस्तकी ज्ञानातील तज्ज्ञ शिक्षकांनी स्वत:च्या शैक्षणिक काळात फक्त परीक्षार्थी विद्यार्थी बनून, केवळ परीक्षेत मिळालेले गुण महत्त्वाचे समजून, घेतलेले ज्ञान आणि त्याच वाटेवरून नव्या पिढीतील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या ज्ञानामुळे नव्या पिढीतील विद्यार्थ्यांना या ज्ञानात रुची वाटत नाही. आधुनिक काळानुसार विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान, विज्ञान व कौशल्यावर आधारित ज्ञानाची ओढ आहे. या ज्ञानाचे शिक्षण देणारा शिक्षकच या विद्यार्थ्यांशी समरस होऊ शकतो ही वस्तुस्थिती आहे. अशा शिक्षकाच्या वर्गात अधिक पटसंख्येनी विद्यार्थी असतात.

दर्जात्मक शिक्षणाची कास धरा आणि विद्यार्थी मिळवा. हा नव्या पिढीचा नवा नारा आहे. शिक्षण

सर्वांसाठी, पण शिक्षक दर्जेदार व गुणवत्ताधारक हवा; तरच विद्यार्थीसंख्या वाढेल, अन्यथा स्वत:ची नोकरी टिकवण्यासाठी पळा पळा.... आणि नोकरी टिकवा, ही वेळ तुमच्यावर आहे.

दर्जात्मक शिक्षणाच्या अभावामुळे प्राथमिक शिक्षण देणाऱ्या अनेक संस्थांना विद्यार्थी शोधा आणि नोकरी टिकवा, अशी वेळ आली आहे. एकवीसावे शतक हे आधुनिकतेचे, ज्ञानसमृद्धीचे आणि प्रगती व विकासाचे असे असेल, तरी सद्य:स्थितीत प्राथमिक शिक्षण व्यवस्थेमधील दर्जा हा घसरणीला लागलेचे दिसत आहे.

काळानुसार बदलणारी शिक्षणपद्धती आणि ज्ञान देणारे शिक्षक यांच्या ज्ञानात फार मोठा फरक जाणवत आहे. आधुनिक युगातील नव्या पिढीने ज्ञान आणि पारंपरिक शिक्षणातून शिक्षकांनी घेतलेले ज्ञान यांमध्ये मोठी तफावत आढळत असून, नव्या पिढीला ज्ञान देताना या शिक्षकांची मोठी तारांबळ होत आहे. आधुनिक शिक्षणातून समृद्ध जीवनप्रणाली घडविण्यासाठी शैक्षणिक धोरणामध्ये मोठ्या प्रमाणात बदल केला आहे. या बदलांची माहिती प्रशिक्षणाद्वारे शासन स्तरावरू शिक्षकांसाठी कार्यशाळेच्या माध्यमातून घेतली जात आहे. अनेक प्रशिक्षण व कार्यशाळेतून नव्या शैक्षणिक धोरणाचा व शिक्षणपद्धतीचा कसा वापर विद्यार्थ्यांसाठी करायचा याचे प्रशिक्षणही शिक्षकांना देण्यात येत आहे. परंतु काळाच्या प्रवासात ज्या शिक्षणसंस्था स्वत:ला अपडेड ठेवतात. त्याच शिक्षणसंस्था खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांना ज्ञानाने घडवितात.

शैक्षणिक क्षेत्रातील सद्य:परिस्थितीचा आढावा घेतल्यास अथवा पाहणी केल्यास शैक्षणिक क्षेत्रात दर्जात्मक व गुणात्मक शिक्षण हे विद्यार्थ्यांना प्राप्त होणे, काळाची गरज आहे. यासाठीच्या उपाययोजना व ठोस कृती योजनेसाठी शासनस्तरावरील यंत्रना जागृत होणे आवश्यक आहे.

शिक्षण प्रणालीमधील सुधारणांवरच नव्या पिढीचे उज्ज्वल भवितव्य अवलंबून आहे. शहरी आणि ग्रामीण भागात मोठया प्रमाणात शैक्षणिक संस्था आहेत. परंतू सध्या या शैक्षणिक संस्थाना विद्यार्थीपट व विद्यार्थी प्राप्तीसाठी सर्वच स्तरावर झगडावे लागत आहे. शिक्षकांना सुट्टीच्या कालावधीमध्ये नव्या वर्षातील प्रवेश पूर्ण क्षमतेने पूर्ण करण्यासाठी विद्यार्थी घटक शोधावा लागत आहे. अर्थात, विद्यार्थी घटक शोधण्यापेक्षा, याच शिक्षकांनी शैक्षणिक काळात पूर्ण क्षमतेने जर विद्यार्थ्यांना ज्ञान व कौशल्याने घडविले, तर हाच विद्यार्थी घटक हा त्या संस्थेचा अथवा त्या शिक्षकामधील एक घटक होऊन जाईल, हे तितकेच खरे आहे.

शिक्षण पद्धतीमधील शिक्षक हा अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. ग्रामीण व दुर्गम भागात आजही शिक्षकास समाजमान्यतेचे प्रतिक समजले जाते. असे असताना आज शिक्षकांना प्रत्येक गाावात व भागात जाऊन विद्यार्थी शोधून आणून आपल्या संस्थे प्रवेशासाठी झगडावे लागत आहे.

अर्थात शिक्षण प्रणाली काळानुसार बदलत आहे. त्या पद्धतीचे शिक्षण, ज्ञान हे नव्या पिढीला देण्यास अकार्यक्षम ठरल्याने अनेक संस्थांमध्ये विद्यार्थी पट हा कमी होत आहे. हे जरी खरे असले, तरी शिक्षक स्वत:च्या नोकऱ्या टिकविण्यासाठी विद्यार्थ्यांना मात्र आमिष दाखवून स्वत:चे उखळ पांढरे करून घेत आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

खऱ्या अर्थाने समाजजीवन समृद्ध घडवायचे असेल तर भविष्यकाळात जी संस्था अथवा शिक्षक दर्जात्मक शिक्षणाची कास धरेल, तेच काळाच्या कसोटीला टिकतील, हे मात्र खरे.

(लेखक समाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत)

**

अहवाल

प्रतिनिधी

# महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रिया : काही प्रश्न

केंद्रीय प्रवेश पद्धती जेव्हापासून सुरू झाली, तेव्हापासूनचे शासकीय निर्णय संकलित केले असता तसेच काही महाविद्यालय व शासनाकडून माहिती अधिकारात माहिती मागविली असता या प्रवेश प्रक्रियेतील एक एक धक्कादायक गैरप्रकार पुढे येऊ लागले. एकूणच प्रवेश प्रक्रिया या विषयाबाबत लोकांमध्ये प्रचंड गैरसमज व अज्ञान आहे हेही लक्षात आले. त्यानंतर या विषयाची प्रचंड व्याप्ती व गैरप्रकार पाहता या विषयात केवळ काही पत्रं देऊन किंवा तोंडी चर्चा करून सुधारणा होणार नाहीत हे लक्षात घेऊन शासनाने वरिष्ठ पातळीवर याची दखल घेऊन, यात सुधारणा कराव्यात म्हणून हा सविस्तर अहवाल तयार केला आहे. या संपूर्ण प्रक्रियेत सुरुवातीपासून सिस्कॉमचे अध्यक्ष श्री. राजेंद्र धारणकर तसेच इतर संचालक, काही महाविद्यालयांचे प्राचार्य, पालक, माजी शिक्षण अधिकारी यांचे मार्गदर्शन व मदत मिळाली. हा अहवाल 'सिस्कॉम'च्या माध्यमातून तयार केला असून तो मा. शिक्षण सचिव व मा. शिक्षण आयुक्त तसेच मा. शिक्षण संचालक यांना सादर करण्यात आला आहे. या अहवालाचा हा अंशभाग...

**राज्यातील** काही शिक्षणसंस्थांत प्रवेशोत्सुक विद्यार्थ्यांकडून देणगी घेऊन प्रवेश देणे, अधिक गुणवत्ता असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारून कमी गुणवत्ता असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देणे, प्रवेश देताना अयोग्य मार्गांचा अवलंब करणे हे प्रकार होत असल्याने; शिक्षणासाठीची प्रवेश पद्धती ही पारदर्शी असावी, याकरिता मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी फोरम फॉर फेअरनेस इन एज्युकेशन मुंबई यांच्या याचिका क्र.४७५/९७ वर दिनांक ५ मे १९९७ रोजी

दिलेल्या निर्णयात, शाळा/महाविद्यालयांतील सर्व स्तरांवरील प्रवेश हे केवळ गुणवत्तेच्या आधारे करण्याचे आदेश दिले. तसेच प्रवेश देताना कोणती दक्षता घ्यावयाची याबाबत निर्देश दिले. २६ जून १९९७ ची प्रवेश पद्धती ठरवताना ५ मे १९९७, ४ जून १९९७, १२ जून १९९७ व १७ जून १९९७ च्या शासकीय आदेशांचा एकत्रित विचार करण्यात आला आहे.

वरील सर्व शासन निर्णयांचा अभ्यास केला असता, शासनाला अपेक्षित असलेले मुद्दे खालीलप्रमाणे-

○ २६ जून १९९७ च्या शासकीय आदेशानुसार, मा. उच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशानुसार राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांना, शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि विभागीय सर्व शिक्षण उपसंचालक आणि शिक्षणाधिकारी यांना इयत्ता अकरावीच्या वर्गात प्रवेश देण्याबाबत खालीलप्रमाणे कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

**१) अल्पसंख्यांक आरक्षणाबाबत :**

२६ जून १९९७ नुसार अल्पसंख्यांक समाजाच्या व्यवस्थापनातर्फे चालवल्या जातात, अशा शैक्षणिक संस्थांनी महाविद्यालयातील एकूण प्रवेश क्षमतेच्या ५०% जागा त्याच अल्पसंख्यांक समाजाच्या विद्यार्थ्यांमधून गुणवत्तेच्या आधारे भराव्यात असे म्हटले आहे. परंतु नंतर यात बदल होऊन इतर अल्पसंख्यांक समाजाच्या विद्यार्थ्यांना यातून गुणवत्तेच्या आधारे प्रवेश द्यावेत, असे सांगितले गेले. खाली नमूद केल्याप्रमाणे प्रवेश झाल्यानंतर खुल्या संवर्गातून भराव्यात.

* अल्पसंख्यांक कोट्यातील ५०% प्रवेश देताना २७ मे २००३ च्या शासनाने दिलेल्या पद्धतीचे पालन करणे, संबंधित व्यवस्थापनावर बंधनकारक राहील. अल्पसंख्यांकांनी चालवलेल्या शाळांबाबत मागासवर्गीय संवर्गाकरिताचे आरक्षण लागू राहणार नाही .

अ) मान्यताप्राप्त विनानुदानित व कायम विनाअनुदानित माध्यमिक व उच्चमाध्यामिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेशासाठी प्रतिवर्षी संबंधित व्यवस्थापन प्रवेशाचा निश्चित कालावधी व वेळापत्रक प्रवेशप्रक्रिया सुरू करण्यापूर्वी किमान १५ दिवस अगोदर जाहीर करावी.

ब) प्रवेशाचे अर्ज व असल्यास शाळेची माहिती पुस्तिका व्यवस्थापन संबंधित विद्यार्थी व पालकांना विनामूल्य उपलब्ध करून देतील.

क) वेळापत्रकाप्रमाणे प्राप्त झालेल्या अर्जांना पोचपावती देतील.

ड) प्राप्त झालेल्या अर्जांनुसार गुणवत्ता यादी तयार करून ठळकपणे फलकावर प्रसिद्ध करणे.

ई) वेळापत्रकानुसार, पारदर्शी पद्धतीनुसार व गुणवत्तेनुसार व्यवस्थापन प्रवेशप्रक्रिया पूर्ण करील.

**२) इनहाऊस आरक्षणाबाबत :**

एकाच संस्थेची माध्यमिक शाळा असेल व त्या शाळेला जोडून उच्चमाध्यामिक अकरावी व बारावीचे वर्ग एकाच आवारात असतील, तर अशा वेळी अकरावीच्या वर्गात २०% राखीव जागा संबंधित शाळेतून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी ठेवाव्यात. या जागा गुणवत्तेच्या आधारे भराव्यात.

(इनहाऊस कोट्यातील २०% प्रवेश देताना, केवळ याच पद्धतीचे पालन करण्याचे संबंधित व्यवस्थापनावर बंधनकारक राहील, याचा उल्लेख शासनाने २७ मे २००३ च्या आदेशामध्ये करायला हवा होता. - सिस्कॉम)

**३) व्यवस्थापन आरक्षणाबाबत :**

१३ जून १९८९ च्या शासकीय आदेशानुसार ५% जागा या व्यवस्थापनांनी स्वेच्छेने भरण्याची परवानगी चालू राहील, परंतु २६ जून १९९७ पासून हे प्रवेशदेखील गुणवत्तेच्या आधारेच करावेत.

○ २७ मे २००३ नुसार मंत्रिमंडळ उपसमितीने केलेल्या शिफारशी व शासनाने त्यावर घेतलेल्या निर्णयांनुसार राज्य शासनाने माध्यमिक व उच्चमाध्यामिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयासाठी वेळोवेळी विहीत केलेली प्रवेश पद्धती, व्यवस्थापन

कोटा, अल्पसंख्यांकांचे अधिकार, शैक्षणिक शुल्क, शैक्षणिक सवलती इ. तरतुदींचा एकत्रित विचार करून; यांबाबत पुढील कारवाई करण्यात यावी असा शासनाने निर्णय घेतला आहे.

अ) मान्यताप्राप्त विनानुदानित व कायम विनानुदानित माध्यमिक व उच्चमाध्यामिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांतील प्रवेशासाठी प्रतिवर्षी संबंधित व्यवस्थापन प्रवेशाचा निश्चित कालावधी व वेळापत्रक प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी किमान १५ दिवस अगोदर जाहीर करावी.

ब) प्रवेशाचे अर्ज व असल्यास शाळेची माहिति पुस्तिका व्यवस्थापन संबंधित विद्यार्थी व पालकांना विनामूल्य उपलब्ध करून देतील.

क) वेळापत्रकाप्रमाणे प्राप्त झालेल्या अर्जांना पोचपावती देतील.

ड) प्राप्त झालेल्या अर्जानुसार गुणवत्तायादी तयार करून ठळकपणे फलकावर प्रसिद्ध करणे.

इ) वेळापत्रकानुसार, पारदर्शी पद्धतीनुसार व गुणवत्तेनुसार व्यवस्थापन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करील.

**४) बदली आरक्षणाबाबत :**

बदली होऊन आलेले राज्य, केंद्र शासनाचे कर्मचारी; शासकीय संरक्षण विभागातील कर्मचारी; आजी-माजी सैनिकांचे पाल्य; स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य, अपघातात सापडलेले विद्यार्थी; यांच्याकरिता ५% टक्के जागा राखीव ठेवाव्यात. २६ जून १९९७ पर्यंत या जागा शासकीय स्तरावर राखून ठेवण्यात येत होत्या; परंतु २६ जून १९९७ पासून हे प्रवेश महाविद्यालयीन स्तरावर उपलब्ध अर्जांतून गुणवत्तेनुसार देण्याचे आदेश देण्यात आले व रिक्त जागांसंबंधित शिक्षण उपसंचालक / शिक्षणाधिकारी यांच्याकडे प्रत्यार्पित कराव्यात. २५ मार्च २०१० च्या शासकीय आदेशानुसार यातील प्रवेशाबाबतचे स्पष्टीकरण दिले आहे.

**अ) बदली होऊन आलेले कर्मचारी :**

या संवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांची बदली १ ऑक्टोबर किंवा त्यानंतर अकरावीची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर झालेली असावी; म्हणजेच मागील वर्षाची प्रवेशप्रक्रिया संपल्यानंतर तसेच बदली होऊन आलेल्या विद्यार्थ्याने पुणे पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्राबाहेरून दहावीची परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी, याबाबत कर्मचाऱ्यांचे बदली आदेश व बदलीच्या ठिकाणी रुजू झाल्याचे आदेश प्रवेशाच्या वेळी सादर करावेत.

**ब) आजी /माजी सैनिकांचे पाल्य-**

१) आजी सैनिक : सेवेत असल्याचा दाखला.

२) माजी सैनिक : जिल्हा सैनिक बोर्डाचे प्रमाणपत्र /सेवामुक्तीचा दाखला.

**क) स्वातंत्र सैनिकांचे पाल्य :-**

- स्वातंत्र्यसैनिकांवर अवलंबून असलेल्या व स्वातंत्रसैनिकांनी नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीचे पाल्य म्हणून आरक्षणाचा लाभ घेताना जिल्हाधिकाऱ्याचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.
- ५% राखीव प्रवेशासाठी केलेल्या अर्जासोबत आवश्यक कागदपत्र जोडलेले असल्याशिवाय तो प्रवेश ग्राह्य समजला जाणार नाही.

यात १० जुलै १९९७ मध्ये बदल करण्यात आला आहे.

१) माध्यमिक शालान्त/समतुल्य परीक्षेच्या गुणपत्रिकेची प्रत.

२) जे विद्यार्थी महाराष्ट्र राज्याबाहेरून, परदेशातून कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेशासाठी येतील, त्यांच्या कागदपत्रांची पूर्ण तपासणी करून कनिष्ठ महाविद्यालयात यादीनुसार प्रवेश द्यावा व नंतरच विभागीय मंडळाकडे कनिष्ठ महाविद्यालयाच्या योग्यता प्रमाणपत्रासाठी अर्ज व कागदपत्रे पाठवावीत.

३) शाळा सोडलेल्या दाखल्याच्या प्रमाणित प्रतीवर अर्जदार मागासलेल्या जातीचा असल्याचा निर्देश असल्यास, ते प्रमाणपत्र ग्राह्य धरून विद्यार्थ्यांस प्रवेश द्यावा. मागासलेल्या जातीचा असल्याबद्दल

सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत एका महिन्यात संबंधितांकडे सादर करणे, बंधनकारक राहील.

४) ५% राखीव जागांमधील त्या-त्या संवर्गासाठी पुरावे म्हणून आवश्यक प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत.

**५) अपंग आरक्षणाबाबत :**

❍ २६ जून १९९७ नुसार रिक्त जागा संबंधित शिक्षण उपसंचालक/शिक्षणाधिकारी यांच्याकडे प्रत्यार्पित कराव्यात.

❍ २३ जून १९९९ मध्ये यात बदल करून खासगी क्षेत्रांतील बदली झालेले कर्मचारी व शारीरिकदृष्ट्या अपंग कोट्याबाबत व्यक्तीचा (डिसलेक्सिया, डिसकल्कुलीया, डिस्ग्राफिया, स्पँस्टिक) समावेश करण्यात आला होता.

❍ २७एप्रिल २००१ नुसार अपंग मुलांना विशेष शाळामंधून शिक्षण देण्यापेक्षा नियमित शाळांतून एकात्मिक शिक्षण दिल्यास ते अधिक हितकारक आहे. अपंग व्यक्तींना समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग अधिनियम १९९५ लागू केला आहे. यात प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमध्ये ३% जागा राखून ठेवण्यात येत आहेत.

❍ २५ मार्च २०१० च्या शासकीय आदेशानुसार ५% तून अपंग व्यक्ती वगळून, त्यांच्यासाठी ३% वेगळे आरक्षण देण्यात आले आहे.

अ) किमान ४०% अपंगत्व असल्याबाबतचे जिल्हा शल्य-चिकित्सक/अधिष्ठाता यांचे प्रमाणपत्र.

ब) अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांनी सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जोडणे आवशक आहे.

**६) कला व क्रीडा आरक्षणाबाबत :**

५% जागा, कला व क्रीडा यासाठी राखीव, पैकी २% कलाक्षेत्रांतील विद्यार्थांसाठी असल्याचे नमूद होते, परंतु त्यातून कोणाला प्रवेश देता येईल; याचा सुस्पष्ट उल्लेख नव्हता.

अ) २% कला :

२६ जून २००८, २५ मार्च २०१० व २३ मे २०१४ च्या शासकीय आदेशानुसार संगीत, नृत्य व नाट्य क्षेत्रांत प्रावीण्य प्रमाणपत्र मिळवणारे तसेच सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या मार्फत आयोजित राज्य नाट्य, बालनाट्य, व्यावसायिक नाट्य स्पर्धेत पारितोषिक मिळवलेले; राज्य, केंद्र अथवा आंतर-राष्ट्रीय स्तरावर चित्रपट पुरस्कार मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

❍ २५ मार्च २०१० च्या शासकीय आदेशानुसार आखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय या संस्थेच्यावतीने संगीत व नृत्य कला प्रकारासाठी घेण्यात येणारी परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी, बालनाट्य स्पर्धेत अभिनयाचे पारितोषिक प्राप्त केलेले विद्यार्थी यांचा समावेश करण्यात आला.

❍ तसेच कला व क्रीडा क्षेत्रांत जागांच्या प्रमाणात पुरेसे विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास रिक्त जागेअंतर्गत परिवर्तनाने भरण्याची मुभा राहील. अंतर्गत परिवर्तनाने जागा भरूनही जागा शिल्लक राहिल्यास त्या खुल्या संवर्गातून भरण्यात येतील.

**ब) ३% क्रीडा**

क्रीडा क्षेत्रांत प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी होत्या. कालानुरूप यात बदल करण्यात आला आहे.

❍ ३% क्रीडा क्षेत्रांतील विद्यार्थ्यांसाठी २५ मार्च २०१० व २६ जून २००८ नुसार क्रीडा क्षेत्रांत प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबरच,

१) भारतीय शालेय खेळ महासंघ व खेळ प्राधिकरण द्वारा-

अ : स्पर्धेतील पदक विजेते खेळाडू

ब : राष्ट्रीय/राज्य स्पर्धेत सहभागी खेळाडू

२) इंडियन ऑलिम्पिक असोसिएशन व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनद्वारा मान्यताप्राप्त संघटनेने आयोजित केलेल्या-

अ : राज्यस्तर स्पर्धेतील पदक विजेते खेळाडू

ब : राष्ट्रीय/ राज्य स्पर्धेत सहभागी खेळाडू

खेळाडूंना राखीव जागांवर प्रवेश देताना खेळातील उच्च अर्हताप्राप्त असणाऱ्या खेळाडूंना प्राधान्य देण्यात यावे.

❍ परंतु यांत प्रवेशाबाबतची पद्धती २६ जून १९९७ नुसारच आहे; म्हणजे यासाठी विभागीय उपसंचालक यांनी प्रवेशप्रक्रिया सुरू होण्यापूर्वीच वरील आरक्षणानुसार किती विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकेल, ते ठरवून द्यावे व त्याची माहिती फलकावर लावून प्राप्त झालेल्या अर्जांची गुणवत्ता यादी तयार करून, त्यानुसार प्रवेश द्यावे व रिक्त जागा संबंधित शिक्षण उपसंचालक यांच्याकडे प्रत्यार्पित कराव्यात.

❍ शाळा/कॉलेजमध्ये या जागा इतर प्रवर्गातून भरल्या जातात. प्रस्तुत बाब शासनाच्या निदर्शनास आल्यास, याबाबत संबंधित शिक्षणाधिकारी/शिक्षण निरीक्षक व विभागीय शिक्षण उपसंचालक यांना व्यक्तीश: जबाबदार धरण्यात येईल व त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

**वैधानिक आरक्षण :**

२६ जून १९९७ च्या आदेशानुसार राखीव जागेसाठी अर्ज करू इच्छिणाऱ्या मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्याने आपल्या प्रवेश अर्जावर राखीव जागेसाठी अर्ज, असा स्पष्ट उल्लेख करावा; तसेच उदाहरणार्थ ५ % राखीव जागांवरील प्रवेशासाठी अर्ज केल्यास, ५ % राखीव प्रवेश असा स्पष्ट उल्लेख करावा. राखीव जागांवर प्रवेश देताना अर्ज केलेल्या मागासवर्गीय उमेदवारांना गुणवत्तेनुसार काटेकोरपणे परस्पर प्रवेश द्यावा.

❍ त्याचप्रमाणे राखीव जागेसाठी केलेल्या अर्जात उल्लेख केलेले प्रमाणपत्र जोडलेले नसल्यास अर्ज अस्वीकृत होतील.

कोणत्याही एखाद्या वर्गातील पुरेसे विद्यार्थी उपलब्ध न झाल्यामुळे जागा रिकाम्या राहिल्या, तर त्या अन्य मागासलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन भराव्यात. त्यामुळे विहित मर्यादेपेक्षा जास्त प्रवेश झाल्यास हरकत राहणार नाही, त्यानंतरही जागा रिक्त राहिल्यास विनाराखीव समजण्यात याव्यात व त्या खुल्या संवर्गातून भरण्यात याव्यात.

२५ मार्च २०१० पर्यंत वेळोवेळी विशेष आरक्षणात वाढ होत, खुल्या प्रवर्गासाठी ३०% जागा शिल्लक राहात होत्या. २३ मे २०१४ च्या शासकीय आदेशानुसार अकरावीची ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया करताना सामाजिक व विशेष आरक्षणाचा (आजी/ माजी सैनिकांच्या पत्नी / पाल्य, स्वातंत्र्य सैनिक/ पाल्य, बदलीने आलेल्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचे पाल्य यांना ५%, कला व सांस्कृतिक २%, क्रीडा ३%, शारीरिकदृष्ट्या अपंग ३%) विचार करताना, शासनाच्या प्रचलित आरक्षणाच्या धोरणानुसार सामाजिक आरक्षणाच्या संख्येतून समांतर आरक्षण देऊन करावे. या शासकीय निर्णयामुळे खुल्या प्रवर्गासाठी ३६.५% जागा उपलब्ध होतात.

२६ जून १९९७ नुसार माध्यमिक शालान्त परीक्षेत जास्तीत-जास्त ७५० पैकी मिळालेले एकूण गुण, हीच गुणवत्ता ठरवण्याची एकमात्र कसोटी असावी. समगुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी कोणास प्रवेश द्यावा; हे ठरवण्याचा प्रसंग आल्यास, ज्या विद्यार्थ्याची राहण्याची जागा अधिक जवळ असेल, त्याला प्राधान्य द्यावे.

**सर्वोत्तम ५ योजना**

❍ २५ फेब्रुवारी २०१० मध्ये यात बदल करून सर्वोत्तम ५ योजना लागू करण्यात आली.

१) यासाठी एकाचवेळी सर्व अनिवार्य विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

२) यासाठी एकाच वेळी सर्व अनिवार्य विषय घेऊन उत्तीर्ण होणारे पुन:परीक्षार्थी .

३) सर्व विषयांचे गुण श्रेणी गुणपत्रिकेत दर्शविले जातील.

४) गुणांची टक्केवारी दर्शविताना श्रेणी विषया-

व्यतिरिक्त सहा अनिवार्य विषयांपैकी सर्वोत्तम गुणांच्या पाच विषयांची टक्केवारी दर्शविण्यात यईल.

२६ जून १९९७ पर्यंत प्रवेशप्रक्रिया शाळा, महाविद्यालय स्तरावर होत होत्या. २६ जून १९९७ पासून संगणकाचा वापर करून केंद्रीय प्रवेशास परवानगी दिली होती. त्यात २८ मे २००९च्या शासकीय आदेशानुसार २००९-१० या शैक्षणिक वर्षापासून मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील, मुंबई महानगर विकास प्राधिकरण क्षेत्रातील मान्यताप्राप्त उच्च माध्यामिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालायातील इ.अकरावीचे प्रवेश ऑनलाईन पद्धतीने करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यानुसार इ. अकरावीच्या प्रवेशाबाबत उपरोक्त क्षेत्रात ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया २००९-२०१० या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येत आहे. या शासन निर्णयातील तरतुदीव्यतिरिक्त इतर कोणत्याही पद्धतीने इ. अकरावीचे प्रवेश करता येणार नाही.

मुंबईच्या धर्तीवर २०१४-१५पासून पुण्यात ऑनलाईन पद्धतीने प्रवेशप्रक्रिया राबवण्याचे निर्देश दिले आहेत. ही प्रवेशप्रक्रिया २६ जून १९९७ तील शासकीय आदेशानुसार आहे. वाढते शहरीकरण, बदलत्या काळाची गरज विचारात घेता; ऑनलाईन पद्धतीने प्रवेशप्रक्रिया राबविणे गरजेचे आहे.

ज्या पालकांना, विद्यार्थ्यांना प्रवेश देताना त्यांच्यावर अन्याय झाला आहे असे वाटत असेल; त्यांनी संबंधित शाळा, महाविद्यालयाची गुणवत्ता यादी मिळवण्यासाठी संबंधित शाळा, महाविद्यालय, शिक्षण उपसंचालक, माध्यमिक शिक्षण अधिकारी यांच्याकडे अर्ज करावा, यासाठी संबंधित विद्यार्थी-पालकाने एका पूर्ण पाठपोठ पानासाठी ५ रु. इतके शुल्क घेऊन तत्काळ उपलब्ध करून द्यावी. वरीलप्रमाणे संस्थांनी कारवाई न केल्यास तो याचिका क्र.४७५/९७ मध्ये मा. उच्च न्यायालय, दिनांक ५ मे१९९७ रोजी दिलेल्या शासकीय आदेशनुसार मा. उच्च न्यायालयाचा अवमान होईल.

○ मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ५ मे १९९७ रोजी याचिका क्रं.४७५/९७ वर दिलेल्या निर्णयानुसार शाळा/महाविद्यालयातील सर्व स्तरांवरील प्रवेश हे केवळ गुणवत्तेच्या आधारेच देण्यात यावेत. प्रवेश देताना देणगी घेतल्यास संबंधितांवर महाराष्ट्र शैक्षणिक संस्था अधिनियम १९८७ नुसार दंडनीय गुन्हा अन्वये कारवाई करण्यात यावी. प्रवेश देताना देणगी घेतल्याबाबतची एखादी विशिष्ट तक्रार विभागीय शिक्षण उपसंचालक/अधिकारी यांच्या कार्यालयास प्राप्त झाल्यास, त्याबाबत संबंधित शिक्षण उपसंचालक/माध्यमिक शिक्षण अधिकारी यांनी जातीने तत्काळ चौकशी करावी व या चौकशीत तथ्य असल्याचे आढळल्यास १९८७ च्या अधिनियामान्वये त्यांच्याविरुद्ध कडक कारवाई करण्यात यावी व त्याप्रमाणे अहवाल शिक्षण संचालकांकडे १५ दिवसांत पाठवण्यात यावा.

### २६ जून १९९७ च्या शासकीय आदेशानुसार- प्रवेशाची कार्यपद्धती

मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी, राज्यातील काही शिक्षणसंस्थांत प्रवेश इच्छुक विद्यार्थांकडून देणगी घेऊन प्रवेश देणे, अधिक गुणवत्ता असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारून, कमी गुणवत्ता असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देणे, प्रवेश देताना अयोग्य मार्गांचा अवलंब करणे, असे प्रकार होत असल्याने, शिक्षणासाठीची प्रवेशपद्धती ही पारदर्शी असावी, याकरिता फोरम फॉर फेअरनेस इन एज्युकेशन मुंबई यांच्या याचिका क्रं.४७५/९७ वर दिनांक ५ मे १९९७ रोजी दिलेल्या निर्णयात, शाळा/महाविद्यालयातील सर्व स्तरावरील प्रवेश हे केवळ गुणवत्तेच्या आधारे करण्याचे आदेश दिले व प्रवेश देताना कोणती दक्षता घ्यावयाची याबाबत निर्देश दिले. २६ जून १९९७ ची प्रवेश पद्धती ठरवताना ५ मे १९९७, ४ जून १९९७, १२ जून १९९७ व १७ जून १९९७ च्या शासकीय

आदेशांचा एकत्रित विचार करण्यात आला आहे.

१) ५ मे १९९७ रोजी देलेल्या आदेशानुसार उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्रवेश हे केवळ गुणवत्तेच्या आधार देण्यात यावेत.

२) दहावीचा निकाल जाहीर झाल्यापासून कामकाजाच्या तीन दिवसांपर्यंत अर्ज द्यावेत. उपलब्ध जागेपेक्षा अर्ज कमी असल्यास चौथ्या दिवशी काम सुरू ठेवावे.

३) ५% शासकीय कर्मचारी व बदली कर्मचाऱ्यांचे प्रवेश उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाने त्यांच्या स्तरावर प्रवेशप्रक्रिया सुरू होण्यापूर्वीच गुणवत्तेनुसार द्यावेत आणि रिक्त राहिलेल्या जागा संबंधित शिक्षण उपसंचालक/शिक्षण अधिकारी यांच्याकडे प्रत्यार्पित कराव्यात

४) वरीलप्रमाणे कला व क्रीडा जागांवरील काही जागा रिक्त राहिल्यास, तसेच इतर रिक्त राहिल्यास त्या जागा संबंधित शिक्षण उपसंचालक/शिक्षणाधिकारी यांच्याकडे प्रत्यार्पित कराव्यात.

५) २३ मे २००३ मध्ये सुधारणा करून ५% व्यवस्थापन कोट्यातील प्रवेश हे, प्रवेशप्रक्रिया सुरू होण्यापूर्वी १५ दिवस अगोदर कार्यक्रमपत्रिका तयार करून या जागा गुणवत्तेनुसार भराव्यात.

६) २३ मे २००३ नुसार अल्पसंख्यांकांचे प्रवेश, प्रवेशप्रक्रिया सुरू होण्यापूर्वी १५ दिवस अगोदर कार्यक्रमपत्रिका तयार करून या जागा गुणवत्तेनुसार भराव्यात.

७) २६ जून १९९७ च्या शासन आदेशानुसार पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशयादी तयार करून सूचना फलकावर दर्शनी भागावर लावण्यात यावी. प्रवेशयादी जाहीर झाल्यापासून कामकाजाच्या तीन दिवसात प्रवेशयादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा. त्यांपैकी काही विद्यार्थ्यांनी या ठरलेल्या काळात प्रवेश घेतला नाही, तर प्रतिक्षा यादीतील तेवढ्या विद्यार्थ्यांना गुणानुक्रमे प्रवेश देण्यात यावा. प्रतीक्षा यादीत वरचा क्रमांक असलेल्या विद्यार्थ्यांने जर विहित केलेली फी भरून प्रवेश घेतला नाही, तर तो त्याचे प्राधान्य गमावेल. एखाद्या संस्थेत प्रतीक्षा यादी संपल्यावरही खुल्या जागा शिल्लक राहिल्या, तर अशा उपलब्ध जागा विहीत मुदतीत अर्ज केलेल्या अर्जांना गुणानुक्रमे प्रवेश देऊन भराव्यात.

पुणे शहरासाठी इ. अकरावी प्रवेशाकरिता शैक्षणिक वर्ष १९९६-९७ पासून शासनाने विहित केलेल्या तरतुदीला अधीन राहून गुणवत्तेनुसारच प्रवेश देण्यात येत असल्यामुळे, पुणे शहरासाठी इ ११वी प्रवेशाकरिता केंद्रिय प्रवेशपद्धती यापुढेही चालू ठेवण्यात यावी. मात्र, प्रवेश देताना या शासन निर्णयातील तरतुदींच्या अधीन राहून प्रवेश दिले जावेत. यात कोठेही प्रवेश उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाने त्यांच्या स्तरांवर देण्याबाबत उल्लेख केलेला नाही.

२८ मे २००९ मध्येही ११ वीच्या प्रवेशाबाबत उपरोक्त क्षेत्रात ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया सन २००९-२०१० या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येत आहे. या शासन निर्णयातील तरतुदीव्यतिरिक्त इतर कोणत्याही पद्धतीने इ. अकरावीचे प्रवेश करता येणार नाहीत. महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशन लिमिटेड हे तांत्रिक बाजू सांभाळणार आहेत. ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया अर्ज कसा भरायचा, वेगवेगळ्या स्तरावरील जबाबदाऱ्या करार व कार्यक्रम पत्रिकाचा उल्लेख आहे. त्यानुसार जुलैच्या शेवटी कनिष्ठ महाविद्यालाशी संपर्क साधण्याचे व प्रवेश घेण्याचे निर्देश दिले आहेत.

**शासन निर्णय व अंमलबजावणीतील त्रुटी**

४ जून १९९७ व १२ जून १९९७ चा समावेश करून २६ जून १९९७ चा एकत्रित नवा शासकीय आदेश तयार केला आहे. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत स्पष्ट कल्पना देऊन, ती प्रवेशप्रक्रिया राबवण्याबाबत कार्यक्रमपत्रिका तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यात वेळोवळी बदल करण्यात आले व

स्पष्टीकरणही देण्यात आले, तरी आणखी काही मुद्यांबाबत स्पष्टीकरण यात असावे असे वाटते.

१) भारताच्या राज्यघटनेत आर्टिकल १६ मध्ये वैधानिक आरक्षण हे कोणत्याही परिस्थितीत ५०% पेक्षा जास्त नसावे असे असतानाही सध्या ते ५२% आहे.

२) S. Satypriya v/s State of -P SCC 1996 d -nilkumar Gupta v/s State of UP SCC 1995 निकालानुसारनुसार वाढणारे विशेष आरक्षण हे वैधानिक आरक्षणातून समांतर कमी करण्याबाबतचे आदेश सुप्रीम कोर्टाच्या वरील निकालानुसार देण्यात आले आहे. या निर्णयानुसार एकूण ४८० जागा असलेल्या कॉलेजमध्ये खालीलप्रमाणे प्रवर्गानुसार जागा उपलब्ध होतील.

३) २६ जून १९९७च्या शासन निर्णयानुसार वैधानिक/सामाजिक आरक्षणासाठी पुरेसे विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास रिक्त राहिलेल्या जागा खुल्या वर्गातून भरण्यात याव्यात, असे निर्देश देण्यात आले आहेत. त्या निर्देशानुसार वैधानिक/सामाजिक आरक्षणाच्या उपलब्ध जागेपेक्षा अधिक विद्यार्थी/ अर्ज आल्यासच या विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार खुल्या वर्गातून प्रवेश द्यावा, अन्यथा उपलब्ध जागांपेक्षा कमी अर्ज असल्यास या वर्गातील विद्यार्थ्यांना खुल्या वर्गातून प्रवेश देण्याची आवश्यकता नसल्याने त्यांना खुल्या वर्गातून प्रवेश देऊ नयेत.

४) वरील शासकीय आदेशांचा अभ्यास करताना, वैधानिक/सामाजिक आरक्षणाच्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता जाहीर करताना, ती खुल्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेएवढी असू नये; असा कुठेही उल्लेख नाही. त्यानुसार आरक्षित जागेवरील प्रवेशा-व्यतिरिक्त इतर सर्व नियम सर्व विद्यार्थ्यांसाठी सारखेच असावेत (पूर्वी खुल्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या एवढे गुण मिळवणारे विद्यार्थी कमी होते, परंतु २०१४-१५ च्या आकडेवारीवरून परिस्थिती बदललेली असल्याचे लक्षात येईल.)

५) मा. राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांच्या २३ मे २०१४ च्या आदेशानुसार विशेष आरक्षणाचा (विशेष बदली आरक्षण ५%, कला व संकृती २%, क्रीडा ३%, शारीरिकदृष्ट्या अपंग ३%) विचार करता शासनाच्या प्रचलित आरक्षणाच्या धोरणानुसार सामाजिक आरक्षणाच्या संख्येतून समांतर आरक्षण देऊन करावे, परंतु यात व्यवस्थापन कोट्याचाही समावेश करण्यात यावा. कारण २६ जून १९९७ च्या शासकीय आदेशानुसार वरील सर्व कोट्यात वैधानिक आरक्षणातील विद्यार्थ्याने अर्ज केल्यास त्यांच्या आरक्षणाच्या निर्देशानुसार प्रवेश देण्याचे आदेश दिले आहेत.

६) महाराष्ट्र राज्यपाल यांचे २३ मे २०१४ च्या आदेशानुसार विशेष आरक्षणाचा (विशेष बदली आरक्षण ५%, कला व संकृती २%, क्रीडा ३%, शारीरिकदृष्ट्या अपंग ३%) विचार करता शासनच्या प्रचलित आरक्षणाच्या धोरणानुसार सामाजिक आरक्षणाच्या संख्येतून समांतर आरक्षण देऊन करावे, असे होते, परंतु, प्रत्यक्षात वैधानिक आरक्षणातील विद्यार्थ्यांना, प्रवेश अर्ज केलेला नसतानादेखील विशेष आरक्षणातून प्रवेश दिले गेले आहेत, त्यामुळे वैधानिक आरक्षणाच्या जागा वाढल्या आहेत.

७) माहिती अधिकारात माहिती जर दिली नाही, तर तो याचिका क्रं.४७५/९७ तील निकालानुसार उच्च न्यायालयाचा अवमान ठरेल. परंतु त्याचबरोबर या बाबतीत कडक /दंडात्मक कारवाईचाही उल्लेख असावा; कारण माहिती देण्यात टाळाटाळ, दिरंगाई व सत्य माहिती दडवण्याचा प्रकार वारंवार घडताना दिसतो.

८) जर व्यवस्थापन स्तरावर भरले जाणारे ५०% अल्पसंख्यांक, २०% इनहाउस, ५% कला व क्रीडा, ५% व्यवस्थापन, ५% विशेष आरक्षण या जागा उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाने त्यांच्या

स्तरांवर पवेश प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी भरून रिक्त जागासंबंधित शिक्षण उपसंचालक/शिक्षण अधिकारी यांच्याकडे प्रत्यर्पित कराव्यात, असे निर्देश असताना-देखील प्रत्यक्षात तसे होत नाही, त्याबाबत कडक / दंडात्मक कारवाई करण्याचाही उल्लेख असावा.

९) २०% इनहाउस कोट्याबाबतही उच्य माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्याल त्यांच्या स्तरावर पवेश- प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी भरून रिक्त जागेसंबंधित शिक्षण उपसंचालक / शिक्षण अधिकारी यांच्याकडे प्रत्यर्पित कराव्यात असे निर्देश द्यायला हवे

१०) मागासवर्गीयांना प्रवेश देताना, त्याचे गुण खुल्यावर्गाएवढे असल्यास त्याला खुल्यावर्गातून प्रवेश दिला जातो परंतु त्याचबरोबर मागासवर्गीयांना साठी असणाऱ्या योजनांचा ही फायदा दिला जाताना दिसतो याबाबत स्पष्टता असावी.

११) दरवर्षी संपूर्ण प्रवेश प्रक्रियेचे परीक्षण (Audit) प्रवेश समिती बाह्य, स्वतंत्र संस्थेमार्फत व्हावे. यामध्ये प्रवेश समितीने निश्चित केलेले प्रवेश व महाविद्यालयाने प्रत्यक्षात केलेले प्रवेश या बाबीचा प्राधान्याने समावेश असावा.

१२) २७ मे २००३ च्या शासकीय आदेशानुसार व्यवस्थापन कोटा भरण्याबाबत कार्यपद्धती व प्रक्रिया दिली आहे, तरी व्यवस्थापन कोटा मुख्य प्रवेशप्रक्रिया सुरू होण्यापूर्वीच भरण्याबाबतचे तसेच प्रवेशप्रक्रिये-दरम्यान किंवा त्यानंतर यात प्रवेश करता येणार नसल्याचे स्पष्ट निर्देश द्यावे

१३) २६ जून १९९७ च्या शासकीय आदेशानुसार राखीव जागेसाठी अर्ज करू इच्छिणाऱ्या मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्याने आपल्या प्रवेश अर्जावर राखीव जागेसाठी अर्ज, असा स्पष्ट उल्लेख करावा, तसेच उदाहरणार्थ ५ % राखीव जागांवरील प्रवेशासाठी अर्ज केल्यास, ५ % राखीव प्रवेश असा स्पष्ट उल्लेख करावा. राखीव जागांवर प्रवेश देताना अर्ज केलेल्या मागासवर्गीय उमेदवारांना गुणवत्तेनुसार काटेकोरपणे परस्पर प्रवेश द्यावा. विशेष बदली आरक्षण, कला व संकृती, क्रीडा, शारीरिकदृष्ट्या अपंग, वैधानिक/सामाजिक आरक्षण हे वेगवेगळे आरक्षण आहे. एकाच वेळी एका विद्यार्थ्याला दोन आरक्षणांचा लाभ घेता येणार नसल्याचा स्पष्ट उल्लेख असावा.

**आरक्षण (कोटा) प्रकार**

**१) वैधानिक (सामाजिक) आरक्षण-**

सामाजिक, शैक्षणिक, आर्थिकदृष्टचा मागासलेल्या घटकांनाही; शिक्षणात व नोकरीच्या संधी मिळाव्यात, म्हणून आरक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे. शासनाने त्या त्या समाजाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण ठरवून दिले आहे. शैक्षणिक प्रवेशाच्या संदर्भात, त्या त्या समाजासाठी असलेल्या राखीव जागांच्या संख्येनुसार व गुणवत्तेनुसार प्रवेश देण्याचे शासकीय आदेश आहेत.

सुप्रीम कोर्टाने इंदिरा सावनी यांच्या केसमध्ये भारताच्या राज्यघटनेतील आर्टिकल १६ नुसार वैधानिक/सामाजिक आरक्षण हे कोणत्याही परिस्थितीत ५०% पेक्षा जास्त नसावे, असा आदेश दिलेला आहे; असे असतानाही सध्या ते ५२% आहे.

**२) अल्पसंख्यांकांच्या शैक्षणिक संस्थांचे आरक्षण -**

राज्यघटनेत अल्पसंख्यांकांच्या हितासाठी शैक्षणिक संस्थाना विशेष सवलती दिलेल्या असून, या संस्थांमध्ये ५०% जागा अल्पसंख्यांकासाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

**३) इन हाउस कोटा-**

ज्या माध्यमिक शाळांना जोडून उच्च माध्यमिक महाविद्यालये आहेत, अशा उच्च माध्यमिक महाविद्यालयांत २०% जागा गुणवत्तेनुसार त्या माध्यमिक शाळेतील विद्यर्थ्यांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

**४) क्रीडा राखीव-**

खेळाडूंना क्रीडा प्रकारात प्रोत्साहन मिळावे,

यासाठी जिल्हा, राज्य व आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभागी होऊन, पारितोषिक विजेत्या विद्यार्थ्यांसाठी ३% जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.

**५) कला व संस्कृती राखीव-**

विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा, प्रोत्साहन मिळावे; या दृष्टिकोनातून अशा विद्यार्थ्यांसाठी २% जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.

**६) व्यवस्थापन कोटा -**

व्यवस्थापन स्तरावर गुणवत्तेनुसार ५% जागा स्वेच्छेने भरण्याची परवानगी शासनाने २६ जून १९९७ नुसार देण्यात आली आहे.

**७) अपंग राखीव -**

अपंग विद्यार्थ्यांसाठी ३% जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.

**८) विशेष राखीव -**

बदली होऊन आलेले राज्य, केंद्र शासनाचे कर्मचारी, शासकीय संरक्षण विभागातील कर्मचारी, आजी-माजी सैनिकांचे पाल्य, स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य, अपघातात सापडलेले विद्यार्थी यांच्याकरिता ५% टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

२५ मार्च २०१० च्या शासकीय आदेशनुसार यातील प्रवेशाबाबतचे स्पष्टीकरण दिले आहे.

**९) खुला वर्ग -**

वरील १ ते ८ प्रकारांत न बसणारे सर्व विद्यार्थी हे खुल्या वर्गात येतात.

१३ जून १९८९ च्या जी. आर. मध्ये व्यवस्थापन कोटा ५%, क्रीडा ३%, कला २%, तर २५ मार्च २०१० च्या जी. आर. नुसार विशेष आरक्षण ५% अशा राखीव जागा वाढत गेल्या, परंतु हे आरक्षण कोणत्या प्रकारातून कमी करावयाचे, याचा स्पष्ट उल्लेख नसल्याने हे सर्व आरक्षण खुल्या वर्गातून कमी करण्यात आले. वैधानिक/सामाजिक आरक्षण ५०% हून ५२% वर वाढत गेले, इतर राखीव जागा केवळ खुल्या वर्गातून कमी केल्याने खुल्या वर्गासाठी केवळ ३०% जागा शिल्लक राहिल्या आहेत.

२३ मे २०१४ च्या शासन आदेशानुसार विशेष आरक्षण (कला २%, क्रीडा ३%, अपंग ३%, बदली ५% एकूण १३%) हे सामाजिक आरक्षणातून समांतर कमी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, परंतु प्रत्यक्षात तसे झालेले नाही.

❍ मुळात इयत्ता ११ वी प्रवेश संदर्भात विचार करता, वैधानिक/सामाजिक व विशेष आरक्षण उपलब्ध जागा व प्रत्यक्षात येणारे अर्ज यामध्ये मोठी तफावत दिसते, त्यामुळे अनेक महाविद्यालये या आरक्षित जागा भरताना शासन आदेशांचे सोयीचे अर्थ काढून मनमानी पद्धतीने प्रवेश देतात, त्यामुळे गुणवत्ता डावलली जाते व मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहारही होतात.

**प्रवेश प्रक्रिया २०१४-१५**
**कार्यक्रम पत्रिका**

❍ १० फेब्रुवरी २०१४ उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयानी अनुदानित, विना-अनुदानित उपलब्ध जागा, चालू असलेले विभाग, बंद केलेले विभाग, माध्यम, विहित असलेले विषय, इनहाउस कोटा, अल्पसंख्यांक महाविद्यालय असल्यास त्याचे प्रमाणपत्र याची माहिती ऑनलाईन भरून देणे.

❍१९ जून ते २३ जून प्रवेश अर्जविक्री ऑनलाईन भरावे.

❍ १९ जून ते २३ जून उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयानी त्यांचे स्तरावर इनहाउस कोटा, अल्पसंख्यांक, व्यवस्थापन कोटा, प्रवेशप्रक्रिया करून भरलेल्या जागा ऑनलाईन पद्धतीने संगणकीय एजन्सीला कळविणे.

❍ दिनांक १५ जुलै पासून इ. अकरावी प्रत्यक्ष अध्यापनाचे काम सुरू करणे.

❍ इ. अकरावी ऑनलाईन प्रवेश दि.१४ जुलै२०१४ रोजी पूर्ण झाल्यानंतर प्रवेश समितेचे कामकाज पूर्ण होत आहे. कनिष्ठ महाविद्यालयात रिक्त

राहिलेल्या जागा खालील वेळापत्रकानुसार व सूचनेनुसार आपल्या स्तरावर प्रवेश करण्यात याव्या.

❍ ज्या विद्यार्थ्यांना प्रवेशअर्ज भरता आला नाही, बाहेरून बदली होऊन आलेले, मिळालेला प्रवेश विहित मुदतीत घेतला नाही व एटीकेटीच्या विद्यार्थ्यांसाठी.

१५ ते १७ जुलै सकाळी ११ ते ५ पर्यंत कनिष्ठ महाविद्यालयाने प्रवेश अर्ज स्वीकारणे.

१८ व १९ जुलै प्राप्त प्रवेशअर्जाची गुणवत्ता यादी करणे.

२१ जुलै सकाळी ११ ते ५ पर्यंत गुणवत्ता यादी जाहीर करणे.

२२ ते २४ जुलै सकाळी १० ते ४ पर्यंत गुणवत्ता यादी- नुसार रिक्त जागांवर विद्यार्थ्यांना प्रवेश देणे.

❍ इ. अकरावी ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया पूर्ण झालेली आहे. प्रवेशपासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेशप्रक्रिया व समुपदेशन फेरी गुणवत्तेनुसार दि. ३१ जुलै २०१४ पासून आबासाहेब गरवारे महाविद्यालयात राबवण्यात येत आहे.

❍ ६ ऑगस्ट रोजी महाविद्यालयाच्या रिक्त जागांचा तपशील जाहीर करणे.

❍ ७ ऑगस्टपासून कनिष्ठ महाविद्यालयात रिक्त राहिलेल्या जागा आपल्या स्तरावर प्रवेश करावे.

### प्रवेश प्रक्रियेतील त्रुटी

### प्राथमिक त्रुटी-

१) प्रवेशप्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविण्याचा उद्देश वेळ, पैसा, श्रम वाचवणे, हा होता; परंतु प्रत्यक्षात हा उद्देश पूर्ण झालेला दिसत नाही.

❍ एकूण उच्च माध्य. महाविद्यालय २०५, सर्व महाविद्यालये मिळून एकूण ४९५ विभाग, प्रत्येक विभागाचे प्रत्येकी ३ कर्मचारी, एकूण संख्या १४८५, आलेल्या अर्जानुसार विद्यार्थी/पालक (विद्यार्थी १५६८० + पालक १५६८० = ३१३६०). प्रत्येक विद्यार्थ्याने २-३ उच्च माध्य. महाविद्यालयात अर्ज दिले, त्यामुळे प्रवेशप्रक्रिया ८ दिवस चालली, म्हणजेच एकूण ३२८४५ व्यक्ती, २०५ प्राचार्य, कामाचे ८ दिवस, समुपदेशन फेरीचे ५ दिवस, कर्मचारी + विद्यार्थी + पालक, एवढे मोठे मनुष्यबळ, त्यांचे कामाचे तास, पैसा, ऑन लाईन व्यतिरिक्त लागणे ही गंभीरपणे विचार करण्याची बाब आहे.

२) या प्रवेशप्रक्रियेची माहिती, निर्देश, सूचना देण्यास सुरुवात १८ जानेवारी २०१४ पासून करण्यात आली तरी ती यशस्वीपणे पार पडलेली दिसत नाही.

३) वेळोवेळी घेतलेल्या सभा या प्राध्यापक व प्राचार्यांबरोबर घेतल्या गेल्या परंतु प्रत्यक्ष प्रवेश करणारे कर्मचारी वेगळे असतात, त्यांना या सभांमध्ये समाविष्ट केले जात नाही.

४) यातच शिक्षण उपसंचालक यांनी वेळोवेळी काढलेल्या आदेशांमध्ये सुस्पष्टता नसल्याने, त्याचे सोयीने गैरअर्थ काढून व त्यातून पळवाटा काढण्यात आल्या, त्याचे यथायोग्य पालन करण्यात आले नाही.

६) प्रत्येक यादीत अन-रिपोर्टेडचे प्रमाण वाढलेले दिसते, याचे कारण काय आहे?

अ) १५ जुलै २०१४ पासून उर्वरित प्रवेश महाविद्यालय स्तरावर होणार असल्याचे दुसऱ्या यादी-नंतरच जाहीर केले होते त्याचा दुष्परिणाम प्रक्रियेवर झाला.

ब) आतापर्यंत वेगवेगळया व्यवस्था बाह्य व्यक्तींकडून मोठ्या प्रमाणात प्रवेश होत होते व होत आहेत, याची माउथ पब्लिसिटी ही आतापर्यंतच्या केंद्रीय प्रवेशाच्या प्रसिद्धी पेक्षा जास्त प्रभावी ठरली आहे. आपल्याला पाहिजे त्या ठिकाणी प्रवेश मिळेल, याची खात्री विद्यार्थ्यांना होती. म्हणूनच हजारोंच्या संख्येने विद्यार्थी अनरिपोर्टेड राहिले, अशी चर्चा आहे.

क) गुणवत्ता डावलून प्रवेश देण्यात, उपसंचालक कार्यालयातील पदाधिकारी सामील असल्याशिवाय हे शक्य होऊच शकत नाही.

७) इतक्या मोठ्या प्रमाणात विद्यार्थी अन-

रिपोर्टेड राहिले, तरी या वस्तुस्थितीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे दिसते विद्यार्थ्यांच्या भवितव्यापेक्षा उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय, उपसंचालक कार्यालयातील अधिकारी यांचाच विचार केल्याचे जाणवते.

८) वस्तुत: १४ जुलैचे प्रवेश संपल्यानंतर ऑन-लाईन प्रवेशाचे कामकाज संपले, १५ जुलैपासून ऑफलाईन प्रवेश चालू होते. २४ जुलै दु.४ वाजता ऑफलाईन प्रवेशप्रक्रिया पूर्ण झाली, ३१ जुलै ते २ ऑगस्ट समुपदेशन फेरीचे कामकाज झाले. परंतु १४ जुलै, २४ जुलै आणि २ ऑगस्टच्या प्रत्येक टप्पा संपल्यानंतर शिक्षण उपसंचालक ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया पूर्ण झाली असे जाहीर करीत होते. मग नेमकी ऑन लाईन प्रवेश प्रक्रिया संपली कधी? ७ ऑगस्टपासून कनिष्ठ महाविद्यालयात रिक्त राहिलेल्या जागा आपल्या स्तरावर प्रवेश करावे असे शिक्षण उप-संचालकांनी सांगितले.

९) प्रवेशाची चौथी फेरी ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज भरता आला नाही, बाहेरून बदली होऊन आलेले, विहित मुदतीत मिळालेला प्रवेश घेतला नाही, ज्या विद्यार्थ्यांना मिळालेल्या प्रवेशात काही अडचणी आहेत, जसे चुकीचे माध्यम, चुकीचे विभाग, दूरचे प्रवेश, एटीकेटीचे विद्यार्थी यांचे अर्ज घेऊन, जर गुणवत्तेनुसार ऑनलाईन पद्धतीनेच प्रवेश दिले असते आणि या नंतर एकही प्रवेश होणार नसल्याचे जाहीर केले असते तर...

अ) विद्यार्थी अनरिपोर्टेड राहूच शकले नसते : त्यांना ऑनलाईन प्रक्रियेतूनच प्रवेश घेणे अनिवार्य ठरले असते. परंतु, महाविद्यालये व उपसंचालक कार्यालयातील पदाधिकारी यांनी दिलेल्या आश्वासनामुळे विद्यार्थी अनरिपोर्टेड राहिले, मिळालेला प्रवेश घेतला नाही. या विद्यार्थ्यांनी ऑन लाईन प्रवेशप्रक्रियेचा फज्जा उडवला.

ब) गुणवत्ता डावलून, नियमबाह्य, बेकायदेशीर होणाऱ्या प्रवेशांवर मर्यादा येण्यास सुरुवात झाली असती.

क) अकरावीच्या प्रवेशात या वर्षी देखील तसे अनेक प्रवेश नियम बाह्य झाले. या प्रवेशाचा बाजार झाल्याची पालकांमध्ये मोठी चर्चा आहे.

वरील ९ प्रमाणे कार्यवाही केली असती, तर ऑन-लाईन प्रवेशप्रक्रिया डावलून प्रवेश घेतलेल्या सर्वांनाच एका प्रकारे धडा मिळाला असता. परंतु आता ऑन-लाईन प्रवेशप्रक्रिये व्यतिरिक्तही प्रवेश मिळतात यावर शिक्का मोर्तब झाले आहे. ऑनलाईन प्रवेशप्रक्रियेचे हे एक प्रकारे अपयशच आहे.

**प्रत्यक्ष प्रवेशप्रक्रियेतील त्रुटी**

१) संपूर्ण प्रवेशप्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबवण्याचे निर्देश असताना फक्त तीन फेऱ्या ऑनलाईन, पुढील फेऱ्या ऑफलाईन, समुपदेशन फेरी अशा वेगवेगळ्या पद्धतीने प्रक्रिया राबवली, त्यामुळे मोठ्या प्रमाणात गैरप्रकारांना चालना मिळाली.

२) कोट्यातील एकूण उपलब्ध जागा १८१५५ असताना प्रवेश मात्र ६३१८ झाले, त्यापैकी ६००० प्रवेश प्रवेशप्रक्रियेपूर्वी झाले, व ३१८ प्रवेशप्रक्रीये दरम्यान झाले.

३) एकूण उपलब्ध जागा ६७६६५ व प्रत्यक्षात आलेले अर्ज ६०८२५ असताना, तिसऱ्या यादीत ४१४ जागा का वाढवून देण्यात आल्या? वाढवून देण्यात आलेल्या जागा पुढीलप्रमाणे-

४) एकूण उपलब्ध जागा ६७६६५ व आलेले अर्ज ६०८२५, एकाच वेळी प्रवेश देत येत असताना टप्याटप्याने प्रवेश का देण्यात आले? आणि त्यातही ३०५२ विद्यार्थ्यांना प्रवेशच दिला नाही. कमी टक्केवारी असणाऱ्यांना प्रवेश समिती प्रवेश देणार नसेल, तर त्यांनी या प्रक्रियेत भाग का घ्यावा?

५) पहिल्या यादीत ४८९३७ पैकी १३१२६ म्हणजे २७%, दुसऱ्या यादीत ४६९४ पैकी २३५३ म्हणजे ५०%, तिसऱ्या यादीत ४१४२ पैकी ३०२४

म्हणजे ७५%, विद्यार्थी अनरिपोर्टटेड होते. उपसंचालकांनी दुसऱ्या व तिसऱ्या यादीतील प्रवेश दाखवताना बेटरमेन्ट व नव्या यादीतील प्रवेश एकत्रित दाखवून दिशाभूल केली आहे. पुढील तक्त्यावरून ही बाब लक्षात येईल.

६) प्रवेश समिती कटऑफच्या खाली प्रवेश देत नाही, परंतु, कॉलेज स्तरावरील प्रवेश झाल्यानंतर कटऑफ आणखी खाली येतो, हे खालील माहितीवरून लक्षात येईल.

७) २३ मे २००४च्या महाराष्ट्र राज्यपालाच्या आदेशानुसार सामाजिक व विशेष आरक्षणाचा (बदली कर्मचारी ५%, कला २%, क्रीडा ३%, अपंग ३%) विचार करताना शासनाच्या प्रचलित आरक्षणाच्या धोरणानुसार सामाजिक आरक्षणाच्या संख्येतून समांतर आरक्षण देऊन करावे, या आदेशांचा गैरअर्थ काढला गेला, यात उदाहरणादाखल तीनच महाविद्यालयांनी दिलेले प्रवेश दाखवले आहेत.

८) २३ मे २०१४च्या शासन आदेशाचा गैर अर्थ काढण्यात आला व वरील जागांसाठी अर्ज केलेले नसतानाही, विशेष आरक्षणात प्रवेश देण्यात आले आहेत. संबंधित महाविद्यालयाकडून त्या आरक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या प्रमाणपत्राची पडताळणीही केलेली नाही, केवळ प्रवेश समिती कडून आलेले प्रवेश म्हणून प्रवेश देण्यात आले. यात सिंबायोसिस कॉलेजने मात्र प्रमाणपत्रा शिवाय प्रवेश दिला नसल्याचे आढळले.

९) केवळ महाविद्यालयाच्या खुल्या वर्गातील कटऑफमध्ये बसतो, म्हणून वैधानिक आरक्षणातील विद्यार्थ्याला खुल्या वर्गातून प्रवेश दिला.

१०) यात दोन महाविद्यालयामध्ये वैधानिक आरक्षणातील विद्यार्थ्यांना खुल्या वर्गातून प्रवेश दिलेले दिसतात.

११) शासकीय आदेशानुसार प्रवेशप्रक्रियेपूर्वी व्यवस्थापन स्तरावर कोटे भरण्याचे आदेश आहेत, परंतु त्याची अंमलबजावणी योग्य झालेली दिसत नाही. शिक्षण उपसंचालकांनी काढलेल्या परिपत्रकातील भाषा; भरू शकता, समर्पित करू शकता, अशा प्रकारची संदिग्ध वाक्यरचना (जाणूनबुजून?) असल्याने, त्याचा गैरफायदा उठवण्यात आला. तसेच, प्रत्येक प्रवेशप्रक्रियेत कोट्यात क्षमतेपेक्षा अधिक प्रवेश करण्यात येऊ नये, असे सांगण्यात येत होते. याचाच दुसरा अर्थ महाविद्यालयांना त्यांच्या सोयीने कोटे कधीही भरण्याची परवानगी दिली आहे.

ऑनलाईन ५७%, कोट्यात झालेले ९%, ऑफ लाईन २२%, समुपदेशन फेरी १ % अधिक रिक्त दाखवलेल्या ४% प्रवेश पाहता उर्वरित ७% (४७५५ जागा) प्रवेश कोणते झाले, हे स्पष्ट होत नाही.

१३) शिक्षक उपसंचालक यांनी दिलेल्या आदेशात संदिग्ध भाषा असल्यामुळे, त्यातून पळवाटा निघू शकतात व त्यामुळेच महाविद्यालये, शिक्षक उपसंचालकांचे आदेश पाळत नसल्याचे वेळोवेळी स्पष्ट झालेले आहे.

१४) शिक्षण उपसंचालक कार्यालयाने ५ ऑगस्ट २०१४ रोजी जाहीर केलेल्या रिक्त जागांच्या यादीत खालील कॉलेजात जागा शिल्लक दिसत नाहीत, परंतु ऑगस्टला कॉलेजने दिलेल्या माहितीनुसार खालीलप्रमाणे जागा रिक्त होत्या, तसेच आजही या जागा रिक्त आहेत.

१५) कॉलेज स्तरावर प्रवेश दिल्यानंतर ६०% देखील प्रवेश देण्यात आले. परंतु प्रवेश समितीने ३०५२ विद्यार्थ्यांना केवळ कमी टक्केवारीमुळे प्रवेश दिले नाहीत. जर कटऑफ खाली येऊन प्रवेश समितीने प्रवेश दिले असते, तर ऑनलाईन अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय झाला नसता.

१६) यात माहिती अधिकारात मिळालेल्या माहिती- नुसार एका महाविद्यालयातील प्रत्यक्ष झालेल्या प्रवेशाची आकडेवारी.

२३ मे २०१४च्या शासकीय आदेशाचा अर्थ एक

तर विशेष आरक्षणाच्या १३% जागांपैकी खुल्या संवर्गातील जागा ६.५% ने वाढल्या पाहिजेत. किंवा विशेष आरक्षणाच्या १३% जागा वजा करून उर्वरित जागांमधून (सद्य:स्थितीनुसार) वैधानिक/सामाजिक आरक्षण ५२%, व्यवस्थापन कोटा ५%, खुलासंवर्ग ४३% याप्रमाणे अपेक्षित होत्या.

खालील तक्त्यानुसार खुल्या वर्गासाठी १८० जागा व २६ जून १९९७, २६ जून २००८, २५ मार्च २०१०च्या शासकीय आदेशानुसार १८० + ५१=२३१ इतके प्रवेश खुल्या वर्गातून देण्यासाठी उपलब्ध व्हायला हव्या होत्या, परंतु प्रत्यक्षात तसे झाले नाही.

वैधानिक /सामाजिक आरक्षण व विशेष आरक्षण वेगवेगळे आहे, त्यामुळे एका वेळी एका विद्यार्थ्याला एकाच आरक्षणाचा फायदा मिळायला हवा असताना ५ विद्यार्थ्यांना दोन्ही आरक्षणाचे फायदे दिले आहेत.

२३ मे २०१४ च्या शासकीय आदेशानुसार वैधानिक/सामाजिक आरक्षण ६.५% वाढले असून, खुल्या वर्गाच्या जागा कमी झाल्या असल्याचे दिसते. हे एका महाविद्यालयाच्या खालील तक्त्यावरून लक्षात येईल.

**२०१३-१४ व २०१४-२०१५ मध्ये झालेल्या प्रवेशा बाबतचे निष्कर्ष :**

१) प्रवेश समिती महाविद्यालयाचे कटऑफ कसे ठरवते ही बाब पालकांसाठी गुलदस्त्यात असलेला विषय आहे, परंतु प्रवेश समिती कटऑफच्या खाली प्रवेश देत नाही. २०१३-१४ मध्ये २० जुलैलाच जागा रिक्त नव्हत्या, तर २०१४-१५ मध्ये मोठ्या प्रमाणात जागा रिक्त असताना, ३०५२ विद्यार्थ्यांना कमी टक्केवारीमुळे प्रवेश दिला नाही; परंतु महाविद्यालयीन स्तरावर प्रवेश देताना मात्र, ४३% गुण प्राप्त असलेल्या विद्यार्थ्यालादेखील प्रवेश मिळतो.

२) व्यवस्थापन कोटा प्रवेशप्रक्रियेदरम्यान किंवा नंतर भरल्यामुळे घेतलेले प्रवेश मोठ्या प्रमाणात रद्द होताना दिसतात व त्यामुळे गैरप्रवेशाचा मार्ग मोकळा होतो. २०१४-१५- एका महाविद्यालयात ऑनलाईन प्रवेशाच्या तिसऱ्या फेरीनंतर रिक्त जागा ३४ + व्यवस्थापन कोटा २४ = रिक्त जागा ५८. परंतु ऑफलाईन प्रवेश ६० होऊनही रिक्त जागा १६ = ७६ म्हणजे ऑनलाईन प्रवेश रद्द केलेले विद्यार्थी १८ दिसतात, ही अत्यंत गंभीर बाब आहे.

३) कोटे प्रवेशप्रक्रिया सुरू होण्यापूर्वी न भरल्यामुळे, घेतलेले प्रवेश मोठ्या प्रमाणात रद्द होतात. पालक/ विद्यार्थ्यांना हव्या असणाऱ्या ठिकाणी प्रवेश मिळवण्यासाठी गैर मार्गाचा अवलंब करावा लागतो, कारण पालक महाविद्यालयात गेल्यास त्याला प्रवेश मिळत नाही, त्यामुळे व्यवस्थाबाह्य लोकांचा हस्तक्षेप वाढतो.

४) कोटे प्रवेशप्रक्रिया सुरू होण्यापूर्वी न भरल्यामुळे, प्रवेश घेणे/ रद्द करणे सतत होत राहिल्याने, ही प्रवेशप्रक्रिया दोन महिने चाललेली दिसते.

५) २०१४-१५ मध्ये प्रवेश क्षमतेनुसार प्रथम प्रवेश यादी पाठवल्याने, दुसऱ्या यादीत रिक्त जागेनुसार विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळाली. दुसऱ्या यादीतील प्रवेश संपल्यानंतर तिसऱ्या यादीत नवीन विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळाली.

२०१३-१४ मध्ये प्रथम यादीतच प्रवेश क्षमतेपेक्षा १५ ते २०% प्रवेश अधिक प्रवेश पाठवले, पहिल्या यादीतील प्रवेशप्रक्रिया २० जुलै रोजी संपली. रिक्त जागांचा आढावा न घेताच, १७ जुलैला पहिली व दुसरी प्रतीक्षा यादी देण्यात आली.

अनावश्यक फी प्रत्येकाला समजेल व त्यानुसार विद्यार्थी/पालकांना प्रवेशाचा निर्णय घेणे सोयीचे होईल. भविष्यात फीवरून तक्रारी निर्माण होणार नाहीत.

महाविद्यालयास इनहाऊस कोटा असल्यास, एकूण प्रवेश क्षमतेच्या २०% जागा इनहाऊस कोट्याच्या, स्पेशल कोटा १३%, व्यवस्थापन कोटा ५%, सामाजिक आरक्षणाच्या जागा कमी होऊन, उर्वरित

जागा ओपनसाठी राहातील.

महाविद्यालय अल्पसंख्याक दर्जाचे असल्यास, एकूण प्रवेश क्षमतेच्या ५०% जागा त्या विद्यार्थांसाठी राहतील. स्पेशल कोटा १३%, व्यवस्थापन कोटा ५%, तसेच या ठिकाणी वैधानिक /सामाजिक आरक्षण लागू नसल्याने, ओपन जागा १२% जागा राहतील.

तक्रारींची शहानिशा झाल्यानंतर केलेल्या तक्रारींचे उत्तर समितीमार्फत संगणक प्रणालीद्वारे मिळेल, तसेच दिलेल्या ई-मेलवर एस.एम.एस.ने कळवले जाईल व तिसऱ्या गुणवत्ता यादीत प्रवेश बदलून मिळेल.

तिसरी गुणवत्ता यादी म्हणजेच राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी बेटरमेंट असेल. बेटरमेंटमध्ये मिळालेला प्रवेश महाविद्यालयाच्या कोडसह आपण दिलेल्या मेलवर व एस.एम.एस.ने कळविण्यात येईल. यात विद्यार्थ्याने प्रवेश घेण्याची पद्धत दुसऱ्या यादीतील प्रवेशानुसारच असेल.

तिसऱ्या गुणवत्ता यादीतील प्रवेश संपल्या नंतर विभाग व माध्यमा नुसार रिक्त जागा जाहीर होतील.

Admission confirm एस.एम.एस आल्यानंतर विद्यार्थ्याने संगणक प्रणालीतून पुढील प्रोसेस पूर्ण करावी. प्रोसेस पूर्ण झाल्यानंतर त्याला फी रिसीट दिसेल, स्क्रीनवर दिलेल्या सूचनेनुसार फी जमा करावी. फी जमा केलेल्या रिसीटची एक प्रत व प्रवेश अर्जाची छापील एक प्रत महाविद्यालयात देऊन त्याची पोच घ्यावी.

प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याची फी भरायची राहिल्यास महाविद्यालयाकडून फी जमा करण्यासाठी सलग चार दिवस विद्यार्थ्याने दिलेल्या मेलवर व एस.एम.एस.ने Reminder जाईल. जर यात विद्यार्थ्याने फी भरली नाही किवा फी भरण्याबाबत महाविद्यालयाशी संपर्क साधला नाही, तर आपला प्रवेश रद्द होऊ शकतो, याची दक्षता घ्यावी.

ए.टी.के. टी.चे विद्यार्थी व काही कारणाने प्रवेश घेऊ न शकलेले विद्यार्थी, बाहेर गावाहून आलेले नवीन विद्यार्थी, अपघातात सापडलेले विद्यार्थी यांचे प्रवेशदेखील वरील पद्धतीनेच होतील

जर काही कारणाने विद्यार्थ्याला विभाग किवा माध्यम बदलायचे असल्यास त्याने आपल्या अर्जाचा कोड टाकून बदलाबाबत Request संगणक प्रणालीच्या माध्यमातून पाठवावी. प्रवेश समितीकडून त्यानुसार रिक्त जागा स्क्रीनवर दिसतील. त्या रिक्त जागेनुसार पर्याय निवडावा.

जर मिळालेल्या प्रवेशाबाबत आपण समाधानी नसल्यास, आपल्या अर्जाचा कोड टाकून बदलाबाबत Request (शक्यतो ए.बी.सी. महाविद्यालय मिळावे) पाठवावी. प्रवेश समिती बेटरमेंटचे विद्यार्थी संपल्यानंतर जर जागा रिक्त राहिल्यास विद्यार्थ्याला त्याने दिलेल्या ई-मेलवर, एस.एम.एस.ने कळवले जाईल, परंतु अशी शक्यता नाहीच्या बरोबर असेल.

इतर राज्यातून किंवा इतर देशातून नवीन आलेले विद्यार्थीदेखील वरील पद्धतीनेच प्रवेश घेतील. यातील प्रवेश क्षमता व प्रवेशासाठी आलेले अर्ज २०१४-१५ नुसार आहेत. कोट्यासाठीच्या जागा या २३ मे २०१४ च्या महाराष्ट्र राज्यपालांच्या आदेशांनुसार आहेत. प्रवेश रद्द करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये, इनहाऊस कोटा, अल्पसंख्यांक कोट्यातीलच विद्यार्थी असण्याची शक्यता अधिक असणार आहे, परंतु त्या जागा पुन्हा खुल्या वर्गातून बेटरमेंटसाठी उपलब्ध होतील. कोट्यातील प्रवेश हे अंदाजे टाकलेले आहेत, असे केल्याने कोणत्याही विद्यार्थ्यावर केवळ कमी टक्केवारीमुळे अन्याय होणार नाही.

**२०१५-१६ प्रवेश प्रक्रियेतील महत्त्वाचे मुद्दे व होणारे फायदे**

**शासकीय स्तरावर होणारी कामे -**

विद्यार्थ्यांची आवश्यक सर्व माहितीची तयारी आठवीपासूनच करावी. त्यांना क्रीडा, कलामध्ये मिळालेल्या प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत शाळेने स्वतः

जवळ ठेवावी. म्हणजे ही माहिती शाळेमार्फत परस्पर एस.एस.सी. बोर्डाला मिळेल. अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेत हीच माहिती एस.एस.सी. बोर्डाकडून परस्पर महाविद्यालयाकडे जाईल.

या दहावीत असणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला प्रवेश अर्जाचा पहिला भाग भरणे बंधनकारक असल्यामुळे, शालेय स्तरापर्यंतची सर्व माहितीवरील प्रमाणे अकरावीच्या प्रवेशासाठी उपलब्ध होईल.

ज्या विद्यार्थ्याला अकरावीत प्रवेश घ्यायचा आहे, त्याला या प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी लॉग इन आयडी व पासवर्ड असेल.

अर्जाचा पहिला भाग भरणे बंधनकारक असल्यामुळे, किती विद्यार्थ्यांनी कोणत्या विभागासाठी, माध्यमासाठी, कोट्यासाठी अर्ज केले आहेत, हे प्रवेश प्रक्रिया सुरू होण्यापूर्वीच स्पष्ट होईल.

संपूर्ण पोर्टलचे अधिकार व ताबा शासनाकडे असेल. त्यामुळे शासनाच्या वेळोवेळी बदललेल्या धोरणानुसार, निर्णयानुसार पोर्टलवरील माहितीत बदल करू शकतील. कुठल्याही प्रकारचा शासकीय आदेशात बदल केल्यास त्याची कारणे, शासकीय निर्णय किंवा समितीचे ठराव इत्यादी सर्व माहिती यासोबत वेबसाईट वर दर्शवण्यात येईल.

किती विद्यार्थ्यांनी कोणत्या विभागासाठी, माध्यमासाठी, कोट्यासाठी अर्ज केले आहेत हे प्रवेश प्रक्रिया सुरू होण्यापूर्वीच स्पष्ट झाल्याने उपलब्ध जागांपेक्षा अधिक मागणी असल्यास, संबंधीत विभाग व माध्यमानुसार कॉलेजला जागा वाढवून देणे; गरजेनुसार एखाद्या कॉलेजची, तुकडीची वाढ करणे किंवा पुरेसे विद्यार्थी उपलब्ध होत नसल्यामुळे, तुकडी रद्द करणे, अशा माहितीत (डेटा) बदल करणे, सहज शक्य होईल. अशी बदललेली नवीन माहिती बदलाचा दिनांक व वेळ निश्चित करून दाखवली जाईल.

अशा प्रकारे सर्व माहिती कायमस्वरूपी उपलब्ध असल्याने शिक्षणाबाबत कोणतेही निर्णय घेण्यासाठी, ही वेबसाईट खूप महत्त्वाची ठरेल. या पद्धतीने प्रवेशप्रक्रिया राबवल्याने पट-पडताळणी, शिक्षक मान्यता, शिक्षकेतर कर्मचारी मान्यता, तुकडी मान्यता इत्यादी महत्त्वाची; पण वेळखाऊ प्रक्रिया आपोआपच पूर्ण होईल, त्यासाठी वेगळी यंत्रणा, मनुष्यबळ वापरण्याची गरज पडणार नाही.

दहावीत असणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला प्रवेश अर्जाचा पहिला भाग भरणे, बंधनकारक असल्यामुळे विद्यार्थ्याने डिप्लोमाला किंवा अन्य अभासक्रमाला प्रवेश घेतला तर दहावीनंतर किती विद्यार्थी या विभागाबरोबरच डिप्लोमाला किवा अन्य कोणत्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला त्याची माहिती उपलब्ध राहील.

जर ही वेबसाईट सर्व विद्यापीठांशी याच कोडनुसार जोडली, तर बारावीनंतर किती विद्यार्थ्यांनी इंजिनिअरिंग, मेडिकलची, सी. ए. ची किंवा इतर प्रवेशपरीक्षा दिली आहे? त्यापैकी किती विद्यार्थी पास झाले? किती विद्यार्थी डिप्लोमा करून इंजिनिअरींगला गेले? त्यापैकी पासआउट होऊन महाविद्यालयातून किती विद्यार्थ्यांना प्लेसमेंट मिळाली? अशी व इतर अनेक प्रकारची महत्त्वाची सर्व माहिती उपलब्ध होईल. त्यामुळे शासनाला या बाबतीत धोरणे ठरवणे सोपे जाईल.

या पद्धतीने प्रवेशपद्धती राबवल्यास सर्व माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील कर्मचारी, प्राचार्य, विद्यार्थी, पालक यांचा बहुमूल्य वेळ, पैसा व श्रम वाचणार आहे.

**यातील इतर महत्त्वाचे मुद्दे**

वेबसाईट युजर फ्रेन्डली असेल, त्यात हेल्प असेल. काही ठरावीक महत्त्वाचे शब्द, चिन्ह, चित्र यावर क्लिक केल्यास त्याची अधिक माहिती, व्याख्या, त्या संदर्भातील शासकीय आदेश इत्यादींची माहिती असेल. ज्या विद्यार्थ्याला प्रवेश घ्यायचा आहे, त्याला सहभागी होण्यासाठी लॉग इन आयडी व पासवर्ड

असेल.

शासनाचे वेळोवेळी बदललेल्या धोरणानुसार, निर्णयानुसार पोर्टलवरील माहितीत बदल करू शकतील, उदा., उपलब्ध जागांपेक्षा अधिक मागणी असल्यास कॉलेजला जागा वाढवून देणे, एखाद्या कॉलेजच्या वर्गाची, तुकडीची वाढ करणे किंवा रद्द करणे, अशा माहितीत (डेटा) बदल करणे इत्यादी. परंतु अशा प्रकारचे बदल झाल्यानंतरही पूर्वीची माहिती/रिपोर्ट हे कायमस्वरूपी उपलब्ध राहतील. बदललेली नवीन माहिती/बदलाचा दिनांक व वेळ दर्शवून दाखवता येईल. अशा प्रकारचा कुठल्याही प्रकारचा बदल केल्यास त्याची कारणे, शासकीय निर्णय किंवा समितीचे ठराव दिल्याने, प्रवेशात पारदर्शकता येईल. ही सर्व माहिती कायमस्वरूपी सर्वांसाठी खुली असेल.

या पद्धतीने प्रवेशप्रक्रिया राबवल्याने भ्रष्टाचार व गैरप्रकारांस आळा बसेल.

ऑनलाईन प्रवेशप्रक्रियेसाठी लागणारी संगणक प्रणाली परिपूर्ण, वापरण्यासाठी अतिशय सुटसुटीत, सहज सोपी, असावी. त्यामध्ये कोणत्याही प्रकारच्या उणिवा, त्रुटी, दोष असता कामा नये.

प्रवेशप्रक्रियेच्या सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत विद्यार्थी वगळता, कोणताही मानवी हस्तक्षेप करण्याची गरज भासणार नसल्याने गैरप्रकारास आळा बसेल.

यात शेवटपर्यंत ऑनलाईन पद्धतीने प्रवेश होणार असल्याने, बेकायदेशीर नियमबाह्य व गुणवत्ता डावलून होणाऱ्या प्रवेशासारख्या गैरप्रकारास आळा बसेल.

ऑनलाईन प्रवेशप्रक्रियेसाठी एकच परिपूर्ण पोर्टल असेल; अल्पसंख्यांक, इनहाउस, व्यवस्थापन, बदली कर्मचारी, खेळ, कला व अपंग कोट्यातील सर्व प्रवेश हे याच वेबसाईटवरून ऑनलाईन पद्धतीने कॉलेज स्तरावर प्रवेशप्रक्रिया सुरू होण्यापूर्वी घोषित केलेल्या वेळापत्रकानुसार होतील. या प्रवेशाच्या प्रक्रियेनंतर राहिलेल्या सर्व रिक्त जागा संगणक प्रणालीच्या आपोआपच खुल्या जागांमध्ये प्रत्यार्पित (शासन निर्णयनुसार) होतील

इयत्ता अकरावीसाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे बंधनकारक असल्याने, २८ मे २००९च्या शासन- निर्णयानुसार ऑनलाईन व्यतिरिक्त इतर कोणत्याही पद्धती प्रवेश करता येणार नसल्याने आरक्षित, अनारक्षित सर्वप्रकारचे प्रवेश हे फक्त ऑनलाईन पद्धतीनेच होतील. यापुढे प्रवेश मिळवू इच्छिणाऱ्या शेवटच्या विद्यार्थ्यालाही याच वेबसाईटवरूनच प्रवेश मिळेल, त्या विद्यार्थ्याने कुठेही प्रवेश घेतल्यास त्याची माहिती प्रवेश समितीकडे व वेबसाईटवर असल्याने कोणत्याही विभागात, माध्यमात झालेले प्रवेश कायमस्वरूपी वेबसाईटवर दिसतील. विद्यार्थी/पालक यांची प्रवेशाबाबत काही तक्रार उदा. प्रवेश अर्जातील बदल/दुरुस्ती, विभाग बदल, माध्यम बदल किंवा अन्य कोणतीही बाब ही ऑनलाईनच होईल.

अल्पसंख्यांक संस्थेसाठी असणाऱ्या ५०% जागांपैकी जर काही जागा रिक्त राहिल्या व त्या जागा प्रत्यार्पित करण्यास तयार नसल्यास त्या जागेवर संस्थेला अल्पसंख्यांक विद्यार्थ्याशिवाय इतर कोणत्याही विद्यार्थ्यास प्रवेश देता येणार नाही, तसेच या कोट्यात नंतर होणारे प्रवेशही ऑनलाईन व्यतिरिक्त करता येणार नाहीत.

कोणताही अधिकारी २-३ वर्षापेक्षा एकाच पदावर, स्थानावर कार्यरत नसावा.

प्रवेशप्रक्रिये दरम्यान येणाऱ्या तक्रारींचा अभ्यास करावा व गरजेनुसार वेळोवेळी बदल व्हावे.

प्रवेशप्रक्रिया सुरू होण्यापूर्वी प्राचार्य/मुख्याध्यापकांबरोबर सभा घेताना, संगणक शिक्षक व प्रत्यक्ष प्रवेशप्रक्रिया राबवणारे कर्मचारी यांनाही सहभागी करून घ्यावे व प्रशिक्षण द्यावे.

संगणक शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रवेशअर्ज कसा भरावा हे अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून प्रोजेक्ट देऊन त्यातील चुका झाल्यास त्या दाखवून, दुरुस्त करून

घ्याव्यात व सराव करून घ्यावा.

विशेष आरक्षणातील प्रवेश निश्चित करण्यापूर्वी त्याबाबत आवश्यक असणाऱ्या प्रमाण- पत्राची तपासणी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांकडून करून घ्यावी. संबंधित अधिकाऱ्याने या प्रमाणपत्राची तपासणी केल्याबद्दलची नोंद आपल्या कोडसह ऑन लाईन करावी. सदर प्रमाणपत्राच्या वैधतेची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्याची राहील.

संपूर्ण प्रवेशप्रक्रियेचे परीक्षण (AUDIT) करण्यात यावे, सदर परीक्षणात दाखवण्यात आलेल्या त्रुटी, दोष त्वरित दूर करावेत, या प्रक्रियेत अनियमितता, गैरप्रकार घडल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात यावी.

इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेसाठी पाठविण्यात येणारी विद्यार्थ्यांची माहिती या प्रवेशप्रक्रियेतील उपलब्ध माहितीतूनच पाठवावी. महाविद्यालय स्तरावर या प्रवेशप्रक्रियेबाह्य परस्पर घेतलेले प्रवेश अनधिकृत ठरवून, त्यांना इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेला अपात्र ठरवावे.

इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेसाठी फॉर्म नं. १७ भरणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या, महाविद्यालयास ठरवून दिलेल्या संख्येपेक्षा अधिक नसल्याची खात्री करण्यात यावी.

**

# संस्था-परिचय

## नॅशनल बुक ट्रस्ट (NBT) - पुस्तकांची जादूभरी दुनिया !

नॅशनल बुक ट्रस्ट (NBT) ही भारत सरकारने १९५७ साली स्थापन केलेली संस्था आहे. इंग्रजी, हिंदी आणि इतर भारतीय भाषांमध्ये भारतीय साहित्य माफक किमतीत सामान्य वाचकांसाठी उपलब्ध व्हावे यासाठी ही संस्था पुस्तकांचे प्रकाशन करते. पुस्तक प्रदर्शने, पुस्तकांविषयी चर्चासत्रे यातून वाचनसंस्कृतीसाठी राष्ट्रीय स्तरावर काम करणारी ही संस्था आहे. लहान मुले, विद्यार्थी, युवावर्ग,वाचक अशा सर्वांना वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी देशभरात पुस्तक प्रदर्शने या संस्थेद्वारे आयोजित केली जातात, त्याचबरोबर घरपोच पुस्तकेही उपलब्ध करून दिली जातात. भारतातली बहुविध संस्कृती, भाषा, लोकांची आवड लक्षात घेता विविध प्रकारचे साहित्य प्रकाशित केले जाते. ही संस्था नवोदित लेखकांना, प्रकाशकांना आणि अनुवादकांनाही पुस्तके प्रकाशित करण्यासाठी आर्थिक साहाय्य ही करते.

The National Centre for Children's Literature (NCCL) या नावाने १९९३ पासून ही संस्था मुलांसाठी पुस्तकांचा प्रसार करते. प्रकाशन व्यवसायात प्रशिक्षित प्रकाशक यावेत यासाठी NBT द्वारा दरवर्षी दिल्ली येथे प्रकाशनाचे प्रशिक्षण दिले जाते. मोबाईल वाहनांच्या माध्यमातून पुस्तके देशातल्या दुर्गम, ग्रामीण भागात पोहचवण्याचही महत्त्वाचं काम NBT करते. साहित्य जनमानसांपर्यंत पोहचवण्यात NBT चे योगदान खूप महत्त्वाचे आहे.एक चांगली बाब म्हणजे वाचकांसाठी 'बुक क्लब' ही योजनाही येथे आहे. तेव्हा अधिक माहितीसाठी http://www.nbtindia.gov.in/ यावर नक्की भेट द्या.

**- सदानंद तेलके**

कविता

# हिंसा
आणि
# माझा मुलगा

तुकाराम खिल्लारे

मुलाला एकदा विमान बनवून दिलं
माझं पाहून त्यानंही एक केलं
खेळता खेळता म्हणाला
चला पप्पा
विमानाची टक्कराटक्करी खेळू
मुलाला किराणा दुकानावर नेलं
तर त्याचं लक्ष
बाजूच्याच दुकानाकडं
म्हणाला पप्पा चला बंदूक घेऊ
मुलाला गावाच्या जत्रेत फिरवलं
घोडागाडी, रेलगाडी
खूप फिरून झालं
निघता निघता म्हणाला
चला पप्पा तलवार घेऊ
मुलाकडं पाहून
काळजाचं पाणी पाणी होतं
अंगणातल्या वेलीचं
फूल पाहायचं सोडून
फुलपाखरू धरायला धावतं
कोणती ही संस्कृती
घडवते आहे माझ्या मुलाला
कसा खुदकन हसतो
दगड लागताच चिमणीला...

# या ‘ओझ्याचे’ करायचे काय ?

फारूक एस. काझी

घंटा होते
बांधाबांधावरून लेकरं
शाळेकडे धावताना
‘स्कूल चले हम....’
छान गाणं वाजायचं... दूरदर्शनवर !
वाटायचं किती मजेत आहेत पोरं...!!

पण दुसऱ्याच क्षणी वाटून गेलं
या पोरांची दप्तरं ??
इतकी हलकी हलकी कशी???
कारण हल्ली तर प्रत्येक पाठीवर
नवीन जाडजूड पाठ दिसते.
झुकलेले खांदे
तुकलेली मान दिसते.

शिक्षणात ‘शिकणं’ विसरून गेलं
फक्त नि फक्त ‘बादली भरणं’ आलं
दप्तरांना नवनव्या बुकांचं
बोजड आजारपण जडलं.
शिकणं-शिकणं म्हणता म्हणता
‘शिकणं’च बिचारं हरवून गेलं.

दप्तरातल्या चिंचा, बोरं, कैऱ्या
भोवरे, गोट्या, भिरभिरं गेलं
नोटबुक, वर्कबुक, प्रोजेक्ट बुक
कहाबाहीं साचतच गेलं.
दप्तर नावाचा दोस्त जाऊन
गुलामीचं नवीन साधन बनत गेलं.

सुटका हवीय ‘ओझ्यापासून’
केवळ वह्या-पुस्तकांच्या नव्हे तर,
‘माहिती’ नावाच्या ‘व्हायरस’पासून
जो मेंदूत ‘माणूसपण’ टिकू देत नाही...
यंत्र बनून सोडतो.
बालपणाच्या कोवळ्या रोपांचं
‘बोन्साय’ करून टाकतो.



नव्या दिशा

**फारूक एस. काझी**

# मुक्तलेखन ... एक अनुभव...!!

**मुक्त**लेखनासाठी खरं तर कोणताही विषय चालतो. तोच अनुभवातला असेल, तर आणखी मजा येते. लेखनात खरीखुरी अनुभूती उतरते. ही मजा काही औरच! भाषा प्रवाही असते; ती कधी संवाद, तर कधी माध्यमभाषेच्या स्वरूपात व्यक्त होत असते. संवादभाषेचा प्रभाव मुलांच्या बोलण्यात व लेखनात सतत जाणवत असतो. याचा अर्थ मुलाचं शुद्धलेखन वाईट आहे, असा होत नाही. उच्चार तसेच लेखन या नियमानेही मुलं लिहितात. ग्रामीण भागात काम करताना हा नित्य अनुभव येतो. याचा अर्थ मुलांना भाषा येत नाही असा होत नाही. उलट आजकाल मराठी साहित्यातसुद्धा माध्यमभाषेचा अतिरेक न करता, संवादभाषांचा वापर वाढलाय. प्राथमिक स्तरावरील पाठ्यपुस्तकांतही हाच पॅटर्न स्वीकारलाय, ही विशेष अभिनंदनीय बाब आहे.

मुलं विचार कसा करतात? वातावरणाचा, एकंदरीत परिसराचा त्यांच्यावर कितपत प्रभाव असतो? हे समजून घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. मूल स्वत:ची एक



भाषाशैली घेऊन येतं. आपण तिला नियमात बांधण्याचा प्रयत्न केला, तर मूल लिहायला 'सहजपणे' तयार होत नाही, हे अनुभवाअंती मी जाणलय. 'मुक्तलेखनात' अशी बंधने असूच नयेत. हळूहळू त्यांना त्या शब्दांच्या 'नियमबद्ध लेखनाकडे' घेऊन जावं. अन्यथा मुलं व शिक्षक यांच्यात एक (भाषिक) दरी तयार होते, जी बऱ्याचदा मुलांच्या शिकण्यात अडसर ठरते. मूल मनाने शिक्षकाच्या जवळ जातच नाही, त्यामुळे 'सहज लेखनाचा' (अन संवादाचाही) एक पूल बांधावाच लागतो.

'मग मुलांना नियम शिकवायचे नाहीत का?' असंही कुणीतरी म्हणेल. खरंय ! पण या सर्वांचं सार असं नाही होत की, 'मुलांना नियम शिकवूच नयेत.' उलट नियमांचा बाऊ न करता... सहजपणे ते कसे समजेल हे पाहावे. ग्रामीण भागात काम करताना अनेक मर्यादा येतात. बहुतांश मुले अत्यंत गरीब परिस्थितीतून येतात; त्यामुळे पालकांना मुलांशी बोलायला, चर्चा करायला, - गप्पा मारायला वेळ नसतो. काही सुशिक्षित कुटुंबांतही मुलांना या संधी मिळत नाहीत. पाहुण्यांशी फारसं बोलू दिलं जात नाही. या सर्वांमुळे मुलांचे भाषिक विश्व मर्यादितच राहते. त्यामुळे मुलांना नवीन शब्द लवकर आकलन होत नाहीत. पाठ्यपुस्तकातील 'माध्यमभाषा' ही मुलांच्या जीवनविश्वाचा भाग नसल्याने असेल की .... मुलं त्या भाषेशी एकरूप होताना दिसत नाहीत. महाराष्ट्रातील भाषा- वैविध्याला त्यात स्थान देणंही तसं अवघड असलं, तरी साधी सोपी आकलन सुलभ होईल, अशी भाषा वापरता येईल (प्राथमिक स्तरावर तरी); तसेच ओढून-ताणून पांडित्य असलेली भाषा जाणीवपूर्वक टाळता येईल. इंग्रजी शब्दाऐवजी मराठीच शब्द आला पाहिजे, या अट्टाहासापायी जटील मराठी शब्द नकोत. आज मराठीत म्हणून इंग्रजी शब्दच सांगावा लागतो. उदा., इंजिनिअर म्हणजे अभियंता हे मराठी नाव सांगूनही पटत नाहीत किंवा समजत नाही. मला वाटतं काही हरकत नसावी; असं झालं तर पाठ्यपुस्तकंही एक उत्कृष्ट बालसाहित्य ठरेल.

मुक्तलेखनात आम्ही एक विषय घेऊन लेखन घेतलं. खरं तर विषय तसा मुलांचा नावडता, पण यावर मुलं कसं लिहितात हे पाहायचं होतं आणि मुलांनी खरोखर खूप विविध तऱ्हेचे अनुभव मांडले, खूप वेगळी भाषाशैली वापरली. ते इथे जसेच्या तसे देतोय. काही शब्द हे शुद्धलेखनाच्या दृष्टीने 'पूर्णत:' चुकीचे आहेत,

मात्र मुलांचं जीवनविश्व व तेथील भाषा यांचा विचार केला, तर ती चूक चूक नाही. हे समजून घेणं गरजेचं. इथे महत्त्वाचे आहेत ते मुलांचे विचार, विषयांचं आकलन व विचार मांडणीची पद्धती.... खाली आमच्या शाळेतील तिसरीच्या मुलांनी 'परीक्षेचा दिवस' या विषयावर मांडलेले विचार मांडतोय. मुलं अनुभव मांडताना किती स्पष्ट व नेमकेपणाने मांडतात, तसेच वर्गात मी मुक्त वातावरण ठेवण्यात यशस्वी झालोय की नाही, याचं मूल्यमापनही अगदी सहजपणानं करतात; याकडे केवळ लेखक (सामान्य) म्हणून पाहू नका. कारण हे लेखन सामान्य नाहीच. कारण एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून... एक मूल काय मांडतं.... ते जास्त महत्त्वाचं असतं.... !! माझ्यासाठी ते बहुमोल आहे.

> मी परीक्षेच्या दिवशी पैकीच्या पैकी मार्क मिळवीन. मला पेपराच्या दिवशी प्रश्न पडला की मी पास होते कि नापास.... मी परीक्षेला खूप वाचणार व मार्क मिळवणार. - विद्या

> आम्ही सगळेजन परीक्षेचा दिवशी खूप आनंदात होतो. आम्ही इंग्रजी, मराठीचा पेपर घेतला, आम्हाला परीक्षा मध्ये कमी मार्क पडले. - सागर

> आम्ही परीक्षेच्या दिवशी खूप घाबरलो. पण आम्हाला एक माहित नवते की परीक्षा सोपी की आवगड होती. पण आम्हाला पेकीच्या पेकी मार्क पडली मग आम्हाला खूप मज्जा आली. - साक्षी

> मी परीक्षे दिवशी घाबरलो होतो. मला परीक्षात पहिला नंबर काढायचा आहे. मला परीक्षात हरायचं नाही, मला अभ्यास करायचाय. - ऋषिकेश

> मी परीक्षेच्या दिवशी खूप खुश असते. परीक्षेच्या दिवशी मी अक्षर खूप छान काढते. परीक्षेचा दिवस हा माझा आवडता दिवस. मी परीक्षेच्या दिवशी खूप आनंदाने पेपर लिहिते. - प्रीती

> मी परीक्षेच्या दिवशी खुप खुशीत असतो. मी अक्षर बाद काढतो. मी पेपर सोडवताना एका मुलाचा पेन बंद झाला होता. माझा पेन तिला दिला. मी पेपर सोडवताना एका मुलीला लिहिता येत नवतं मग मी तिला लेखनाला मदत केली. - उद्धव

हे अनुभव वाचत असताना मुलांचा परीक्षेविषयीचा दृष्टिकोन कळतो. भीती, मजा या संमिश्र भावना अनुभवाला येतात. लिखाणात आढळणारा संवाद-भाषेचा प्रभाव जाणवतोच, पण सोबत अभिव्यक्त होण्याची एक खास लकब जाणवते. आम्ही माध्यम- भाषेकडे जातोय. हळूहळू हे घडेल, पण त्यासाठी भाषेचा ओघ थांबवून नाही चालणार. हा ओघ असाच वाहत राहिला, तर प्रवाह वाढेल. लिहितं होणं महत्त्वाचं आहे. मुक्तपणे अभिव्यक्त होणंही गरजेचं. मुलांशी बोलत असताना असं जाणवतं की, त्यांना बरंच काही मांडायचं असतं. आपण फक्त संधी मिळवून द्यायची.

भाषा शिक्षणात मराठी हा विषय विषय म्हणून न शिकता; तो भाषा म्हणून शिकणं किती महत्त्वाचं आहे, याचा प्रत्यय येईल. मूल घराची भाषा घेऊन येतं, तेव्हा माध्यमभाषेच्या अट्टाहासापायी मुलांच्या शिकण्याची उर्मीच मरून जाते. भाषाशिक्षण हे जीवनोपयोगी असतं, हे आपण प्रथमत: मान्य केलं तर फारसे प्रश्न उरतच नाहीत.

निमित्त मुक्तलेखनाचे, मात्र भाषाशिक्षणाचे अनेक पैलू इथे उलगडत गेले. शेवटी फक्त एवढंच.... मुक्तपणातच खऱ्या शिक्षणाची बीजं रुजलेली आहेत. मुक्तलेखन हा त्याचा एक छोटासा नमुना.

कला-संस्कृती




# चौकटीत न मावणारा ‘लोकमान्य’

**डॉ. वैखरी वैद्य**

‘दुर्दम्य’ कादंबरी वाचली तेव्हापासूनच लोकमान्यांच्या चरित्राविषयी, कार्याविषयी कुतूहल वाटू लागले होते. त्यामुळे ‘लोकमान्य’ हा चित्रपट पाहायचाच असे मनाशी ठरवले होते. मात्र चित्रपट पाहताना, पाहून झाल्यावर काहीतरी महत्त्वाचे हातातून सुटले आहे. सुटत आहे, हे जाणवत राहाते; चित्रपटाविषयी एक असमाधानाची, अतृप्तीची, अपूर्णतेची भावना मनात राहाते, याचे कारण म्हणजे, लोकमान्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व होय. केवळ दोन तासांच्या मर्यादित अवकाशात बसणारा हा विषय नव्हेच. परंतु त्यातही दिग्दर्शकांनी प्रसंग जर नेमकेपणाने निवडले असते; तर ही जाणीव खूप कमी झाली असती, असे वाटत राहाते.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना महात्मा गांधी गुरुस्थानी मानत होते. तत्कालीन राजकारणाला चालना देण्याचे; इतकेच नव्हे तर भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाला चालना देण्याचे सर्व श्रेय त्यांनाच द्यावे लागेल. शंभर वर्षांपूर्वी आजच्या सुधारणा

सुचवणारा अद्वितीय द्रष्टा म्हणून त्यांची ओळख भारतीय इतिहासात आहे. केवळ राजकारणीच नव्हे; तर थोर शिक्षणतज्ज्ञ, विचारवंत, झुंजार पत्रकार, गणतीय, खगोलशास्त्रज्ञ, शिक्षक, संस्कृतचे गाढे अभ्यासक, गीतारहस्य लिहून गीतेवर टीका करणारे साक्षेपी समीक्षक, स्वातंत्र्यसेनानी अशा अनेक भूमिका ते प्रत्यक्षात जगले. हे त्यांचे सगळे आयुष्य २/३ तासाच्या कलाकृतीत बांधणे हे अशक्यच. त्यातील काही धागे अपरिहार्यपणे सुटे राहाणे स्वाभाविकच; पण जे धागे घेतले आहेत त्यांची वीण घट्ट असावी, अशी प्रेक्षकांची माफक अपेक्षाही 'लोकमान्य' पूर्ण करू शकत नाही.

मात्र लोकमान्य टिळकांना त्या काळात करावा लागणारा संघर्ष, हा आजच्या काळातही करणे कसे अपरिहार्य आहे, पूर्वी तो ब्रिटिश सत्तेविरुद्ध करावा लागत होता आज तो स्वकीयांबरोबर - आपल्याच माणसांबरोबर करावा लागत आहे. माणसे बदलतात; पण प्रवृत्तभ तीच राहाते. सत्तासंघर्ष आणि राजकारण यांत समान सूत्र असते, हेच या चित्रपटाच्या माध्यमातून दिग्दर्शकाला सांगायचे असावे. त्यामुळे लोकमान्यावरील चरित्रपट बघायला जाणाऱ्या प्रेक्षकांची तो निराशा करत असला, तरी त्याला एक वेगळी दृष्टी देण्यास तो नक्कीच यशस्वी होतो. थोडक्यात, चित्रपटाचा विचारझोत हा लोकमान्यांच्या चरित्रापेक्षाही सद्यकालीन तरुण पिढीवर आहे. जो तरुण भोगवादात, चंगळवादात, अडकून पडला आहे; शिक्षण घेऊन परदेशात गलेलठ्ठ पगाराची नोकरी मिळवण्यात त्याला इतिकर्तव्यता वाटते, त्याचे पालक त्याच्या या विचाराला खतपाणी घालतात. 'ठेवलंच काय या गचाळ इंडियात' असा त्यांचा सूर असतो. त्यांच्या विचाराला वेगळे वळण देण्याचा हा प्रयत्न आहे.

या चित्रपटातील मकरंद (चिन्मय मांडलेकर) एक तरुण पत्रकार. लोकमान्यांच्या आवाजातील एका ध्वनिफितीचे जाहीर श्रवण असलेल्या कार्यक्रमाचे 'कव्हरेज' करण्यासाठी त्याला पाठवण्यात येते आणि ती ध्वनीफीत त्याच्या निद्रिस्त मनाला जागं करते. लोकमान्यांविषयी अधिकाधिक माहिती मिळवण्यास तो प्रवृत्त होतो आणि त्यांच्या विचारांचा त्याच्यावर प्रभाव पडतो. त्या काळाशी आणि आजच्या परिस्थितीशी तुलना करता त्याला काही 'सत्य' गवसतात. त्या अनुषंगाने टिळकांचा जीवनपटही उलगडत जातो. अशी या चित्रपटाची कथा आहे. मात्र एकंदरीतच प्रसंगांची निवड चुकल्यामुळे एकसंघ परिणाम साधण्याच्या दृष्टीने तो उणा वाटतो. अनेक ठिगळं जोडलेली गोधडी शिवल्यासारखीच चित्रपटाची अवस्था होते.

लोकमान्यांच्या भूमिकेतील सुबोध भावे मात्र मनावर छाप सोडून जातो. तोही भूमिका अक्षरश: जगला आहे. बालगंधर्व म्हणून उभी असलेली त्याची छाप सोडून लोकमान्यांची प्रतिमा उभी करण्याची अवघड जबाबदारी त्याच्यावर होती, परंतु त्याने ती चोख पार पाडली आहे. विशेषत: टिळकांची भाषा अतिशय दमदारपणे त्याने उद्‌गत केली आहे, त्यामुळे ती परिणामकारक ठरते.

मात्र टिळकांव्यतिरिक्त आगरकर, रानडे आणि महात्मा गांधी हीदेखील महान व्यक्तिमत्त्वे, थोर स्वातंत्र्यसेनानी, विचारवंत व द्रष्टे समाजसुधारक होते, याची जाणीव ठेवायला हवी होती. या व्यक्तिमत्त्वांवर चित्रपटातून अन्याय झाला आहे. आगरकर व टिळकात तात्त्विक मतभेद होते याचा अर्थ हा नाही की आगरकरांचे हेतू संशयास्पद होते. चित्रपटात सुधारकांना ब्रिटिश धार्जिणे म्हणून दाखवले आहे, येथे हा चित्रपट सपशेल फसला आहे. एकाच दृश्यासाठी मा. गांधींना (त्याचप्रमाणे विवेकानंदांना) आणून काय साधले आहे, हेच समजत नाही, केवळ टिळकांना अहिंसेचे तत्त्वज्ञान मान्य नव्हते हेच सांगायचे होते, का हा लोकानुभवाचा प्रसंग होता, याचा उलगडा होत नाही.

सर्व पात्रांची वेषभूषा मात्र दाद देण्याजोगी झाली आहे. त्यासाठी विक्रम गायकवाड (मेकअप) आणि महेश शेर (वेषभूषा) यांचे अभिनंदन ! चित्रपटातील एक गीत (गणपतीची आरती) लोकप्रिय झाले आहेच. एकंदरीत लोकमान्य टिळकांवरील चरित्रपट न म्हणता, सद्य:काळात टिळकांचे विचार तरुण पिढीच्या समोर ठेवण्याचा हेतूने ठेवण्यासाठी जर चित्रपटाची निर्मिती झाली असेल, तर हा चित्रपट यशस्वी झाला आहे असे म्हणावे लागेल.

**

उपक्रमशील शाळा

## प्रसाद सावंत

# प्रकल्पातून उलगडले 'मैत्री'चे अंतरंग

## मराठी विद्यानिकेतनमध्ये 'मैत्री' प्रकल्पाचे आयोजन

'मैत्री' हा शब्द उच्चारला की आपल्यासमोर येतो, तो आपला जीवलग मित्र. कधी तो बालपणीचा सवंगडी असतो, कधी तो शाळेतला दोस्त असतो. आयुष्याच्या प्रत्येक वळणावर आपल्याला साथ करतो; तो खरा आपला मित्र, ही झाली मैत्रीची व्याख्या. पण, या व्याख्येच्या खोलात जाऊन आपण पाहिले, तर आपल्याला मदत करणारा निसर्गातील प्रत्येक घटक हा आपला मित्र असतो. तो कधी प्रत्यक्ष आपली मदत करतो, तर कधी अप्रत्यक्ष... आणि हेच मैत्रीचे पदर उलगडून पाहण्यासाठी, आम्ही प्रकल्पासाठी विषय निवडला 'मैत्री.'

या प्रकल्पाअंतर्गत मनुष्यप्राणी सोडून निसर्गत: जे इतर घटक असतात, ज्यामुळे आपलं जगणं सुसह्य, आनंदित होतं, अशा माध्यमांशी मैत्री करण्याचे ठरले. यासाठी पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी विषय होता 'प्राणी व पक्ष्यांशी मैत्री'. या विषयाअंतर्गत प्राणी व पक्ष्यांशी मैत्री करणे म्हणजे काय? ती आपण कशी करू शकतो? यावर विद्यार्थ्यांनी काम केले. यामध्ये,

* प्राण्यांना व पक्ष्यांना कोंडून न ठेवणे.
* उन्हाळ्याच्या दिवसात गच्चीमध्ये, टेरेसवर पाणी व अन्न ठेवणे.



* प्राण्यांची शिकार करून त्यांच्या अवयवांपासून बनविलेली वस्तू न वापरणे.

* कृत्रिम घरटी तयार करून ती घरांना व झाडांना बांधणे.

यासारख्या अनेक गोष्टी विद्यार्थी शिकले व प्रात्यक्षिकही करून पाहिले.

इयत्ता दुसरीसाठी 'कलेशी मैत्री' हा विषय निवडला.

या विषयाअंतर्गत चित्रकला, हस्तकला, विणकाम, मातीकाम, रांगोळी-मेहंदी काढणे यांसारख्या कला आत्मसात करण्याचा प्रयत्न झाला. विद्यार्थ्यांना ज्या कलेविषयी आवड आहे, त्या कलेविषयी त्यांनी अधिकाधिक माहिती घेणे व छंद म्हणून ही कला जपणे यासाठी त्यांच्याबरोबर काम घेण्यात आले.

इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांसाठी 'वाद्यांशी मैत्री' हा विषय होता.

या विषयाअंतर्गत विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या वाद्यांचे प्रकार, त्यांची रचना, ते वाद्य वाजविणाऱ्या प्रसिद्ध व्यक्ती, त्याचबरोबर वाद्यांच्या साहाय्याने केली जाणारी समूहनृत्ये यांविषयी माहिती घेतली. तिसरीच्या विद्यार्थ्यांचा लेझिम या वाद्याचा गट तयार करण्यात आला. त्याचे प्रात्यक्षिकही मुलांनी सादर केले.

इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी 'यंत्रांशी मैत्री' केली.

या अंतर्गत वेगवेगळ्या यंत्रांच्या संरचना, त्यांचे कार्य, टाकाऊ वस्तुंमधून टिकाऊ वस्तू, वैज्ञानिक खेळणी बनविणे, यंत्रांच्या उत्क्रांतीचा प्रवास, शोध आणि संशोधक, पारंपरिक ऊर्जास्रोतांचा वापर करून यंत्र बनविणे यांविषयी माहिती घेतली व काही यंत्रे बनवूनही पाहिली.

एकंदरीत, या संपूर्ण प्रकल्पामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या भोवतालच्या परिसरातील अनेक घटकांशी मैत्री केली. याचाच एक भाग म्हणून या विषयांना अनुसरून गाणी, नाटके व प्रात्यक्षिकांचा कार्यक्रमही सादर केला. बेळगाव परिसरातील काही कलाप्रेमी व्यक्तींनाही मुलांच्या भेटीसाठी बोलविण्यात आले. विद्यार्थ्यांना जीवनाभिमुख, समाजोपयोगी शिक्षण मिळण्यासाठी, नेहमीच्या कामातून थोडासा विरंगुळा मिळण्यासाठी, छंद म्हणून या 'मैत्रीचा' उपयोग नक्की होईल. असे आम्हाला वाटते.

**

सुजाण पालकत्वासाठी

भाग्यश्री चौथाई

# मुलांना ‘मोठ्ठे’ करण्याची घाई का?

जून महिन्यात नवीन शालेय वर्ष सुरू झाले की नवीन वर्ग, नवीन मित्र-मैत्रिणी, नवीन शिक्षिका... या सर्वांबरोबर कधी पाळणाघरही नवे व अर्थातच वाढलेला अभ्यासक्रम. या सर्व गोष्टींना जुळवून घेण्यासाठी काही काळ जावा लागतो. काही मुले बदललेल्या या सांध्याला लगेच जुळवून घेतात, तर काहींना मात्र जरासा वेळ लागतो.

आर्य, वय वर्षे चार, गोल चेहऱ्याचा, मोठ्या डोळ्यांचा एकदम धिटुकला मुलगा, पहिल्या वर्षी शाळेत छान रमला. गाणी, गोष्टी, वेगवेगळे खेळ व आवडत्या ताई; यामध्ये वर्ष कसे अगदी आनंदात गेले.

यंदा आर्य पुढील वर्गात आला व काही दिवसांमध्येच त्याला शाळा नावडू लागली. रोज सकाळी शाळेत जाताना रडारडी व नकार. कधी पोट दुखते, तर कधी आई हवी म्हणून.

आर्या लाघवी व संवेदनशील, त्याचबरोबर प्रचंड बडबडी. यंदा ती पहिलीत गेली. तिला आता शाळा आवडत नाही. खरे तर गेली तीन वर्षे शाळा तिच्या

सवयीची, पण आता शाळेत जायचे नाही असा तिचा रोजचा हट्ट.

आर्य, आर्या यांची वागणूक पाहिली तर त्यामागील कारण नक्कीच लक्षात येते.

वरच्या वयोगटातील अभ्यास वाढला. पुरेशी शारीरिक व मानसिक क्षमता अजून निर्माण न झाल्याने आर्यसाठी तो अभ्यासक्रम अवघड वाटू लागला. त्यातच वर्गशिक्षिकेने केलेली लिखाणाची सक्ती.

आर्या प्रचंड बोलकी. तिचा व तिच्या मैत्रिणीचा शाळेच्या किंवा शिक्षिकेच्या सोयीसाठी म्हणून वर्ग वेगळा करण्यात आले. कारण दोघींच्या सतत गप्पा-गोष्टी चालत असत. दोघी जवळ-जवळ राहणाऱ्या मैत्रिणी. वर्षभर एकत्र रुजलेली रोपटी व्यवस्थापनाच्या सोयीसाठी अलग झाल्याने संवेदनशील आर्याचा प्रश्न निर्माण झाला. आपण मोठी माणसेसुद्धा नाही का नवीन जागा, माणसे यांच्यामध्ये वावरतो. कोणी जवळचा किंवा ओळखीचा चेहरा दिसला की सुखावतो. हाच मुद्दा आर्याच्या बाबतीत दिसून आला.




तज्ज्ञांच्या मतानुसार मुलाला 'सोशल' करण्यात अर्थात 'मोठ्ठे' करण्यात आपली जास्त घाई होत आहे.

बालशाळेत मूल रमावे, रुळावे म्हणून त्या अगोदर पाळणाघर, त्यानंतर पहिलीची तयारी; म्हणून मग बालशाळेतील वाढलेला अभ्यासक्रम.

मुलाला सुरुवातीचे शिक्षण विविध अनुभवांतून मिळायला हवे. अगदी सहजतेने, हसत-खेळत, नकळत घडायला हवे.

अर्थात बालशाळेतील अभ्यासक्रम त्यानुसार आखायला हवा. याचबरोबरीने प्रत्येक मुलाचा वाढीचा व विकासाचा वेग वेगवेगळा असतो, हे लक्षात घेऊन त्यानुसार त्याच्या गरजेप्रमाणे तेवढा वेळ त्याला मिळायलाच हवा.

लिखाणासाठी मुलाचे बोटाचे स्नायू तयार होणे हे गरजेचे असते. याचबरोबरीने डोळे व बोटे यांचा समन्वय (Co-ordination) आवश्यक असतो.

खेदाने असे म्हणावेसे वाटते की, बहुतेक शाळांमध्ये मुलाची प्रगती तो किती, कसा लिहितो यावरच ठरविली जाते.

चार वर्षांचे मूल a,b,c,d, लिहित नाही, अशी शाळेतून तक्रार आली की, मग पालक अस्वस्थ होतात. घरी सुरू होतो मग धाकधपटशा, अभ्यासाची व लिखाणाची सक्ती होते, ट्यूशन लावली जाते. पालकांची अवास्तव काळजी व अस्वस्थता नकळत मुलापर्यंत पोहोचते व समस्या अजूनच वाढते. शिक्षणतज्ज्ञ श्री. रमेश पानसे

सरांच्या मतानुसार इंग्रजी माध्यमाच्या शाळा अशा अत्याचाराच्या बाबतीत फार पुढे असतात. (या संदर्भात एप्रिल २०१४ मधील सरांचा लेख वाचावा.)

तज्ज्ञांच्या मतानुसार पाच वर्षांचे मूल व्यवस्थित त्रिकोण काढू शकते. त्यापुढे इंग्रजी लिपीतील A या अक्षराचा श्रीगणेशा मुलाच्या वयाच्या पाच वर्षांनंतर व्हायला हवा.

मुलाने लिहावे, यासाठी त्याला मनातून वाटले पाहिजे, त्यासाठी त्याची शारीरिक व मानसिक क्षमता विकसित व्हायला हवी. मगच ते मूल आनंदाने, आत्मविश्वासाने व सहजतेने लिहू शकेल; हे ध्यानात घ्या. मुलाच्या सभोवती पूरक, संपन्न वातावरण तयार करणे हे चांगल्या शिक्षकाचे काम.

ताराबाई मोडक, गिजुभाई बधेका, मॉंटेसरी मॅडम अशा विविध शैक्षणिक तज्ज्ञांनी विविध उपक्रमांतून मुलाचा सर्वांगीण विकास साधता येतो; जसे मातीकाम, रंगकाम, कातरकाम, चित्रकला, हस्तकला, शिवणकाम, चिकटकाम, ठोकळे खेळणे, भातुकली, गाणी, गोष्टी याच बरोबरीने मैदानी खेळ; जसे पळणे, उड्या मारणे, विविध हालचाली, कवायती अशा अनेक कृतींतून मुलाचे स्नायू तयार होत असतात व यातून त्याची बौद्धिक वाढ होत असते. हे सर्व अनुभव त्याला पुढील संपूर्ण शिक्षणासाठी उपयुक्त ठरतात.

परंतु, आज मुलाला अती स्मार्ट बनविण्याच्या नादात आपण त्याला कॉम्प्युटर हाताळायला देतो. मोबाईल व लॅपटॉप तो सुंदर रीतीने वापरतो म्हणून त्याचे कौतुक करतो, त्याला प्रोत्साहन देतो. ही माध्यमे हाताळताना मूल स्वत:ची क्रियाशीलता विसरून जाते. ते दुसऱ्याने बनविलेले कार्यक्रम फक्त चालवायला व वापरायला शिकते.

याचबरोबरीने आपण मुलाला गिरवायला A-Z लावतो, पाढे घोकायला लावतो, न कळणारे इंग्रजी शब्द पाठ करायला व लिहायला लावतो. अवास्तव शिस्तीच्या नावाखाली शिट्टीच्या आवाजाहुकूम ओळीत उभे राहायला शिकविता, इतर विविध गोष्टी



त्याला लगेच आल्या पाहिजेत; अशी अपेक्षा करतो.

Thank you, sorry, sharing वगैरेचा अर्थ त्याला नीट न समजावता, या सर्वांची सक्ती करतो. त्याला हे सर्व जमलेच पाहिजे व मुलाने हे सर्व केलेच पाहिजे; अशी अपेक्षा करतो.

सगळं कसं हवं अगदी आखीव, रेखीव व एकदम शिस्तीनं.

या सर्व शिक्षणामागील प्रक्रिया आपण विसरून जातो. आपल्याला घाई असते एकदम final product ची.

खरंच, का करतो आपण हे सारं?

आपल्या लहानग्यांना 'मोठ्ठं' करण्याची घाई का करत आहोत आपण?

बिच्चारी मुलं प्रवाहात पोहायचे म्हणून मग निमूटपणे बिनातक्रार सर्व काही करत असतात. आपल्याला वाटते व्वा, किती स्मार्ट मुलं आहेत ही. पण यातील धोका वेळीच ओळखा.

मुलांची निरागसता जपा. फुलाला फुलण्याची, उमलण्याची नैसर्गिक संधी द्या.

योग्य वेळी छोट्याशा रोपट्याला आवश्यक पाणी व खत मिळाले की, त्याचा भक्कम डेरेदार वृक्ष आपसूक होतो, हे ध्यानात घ्या.

आपणच, पालक व शाळा या दोहोंनी याचा विचार करायला हवा. **



# वृत्त विश्व

## विश्ववृत्त

**स्मार्टफोनमुळे लहान मुलांची झोप टळते.**

मियामी - टॅबलेट अथवा स्मार्ट फोन वापरणाऱ्या मुलांची झोप; ही उपकरणे न वापरणाऱ्या मुलांपेक्षा कमी असते, हे एका अध्ययनाअंती समोर आले आहे. अमेरिकेत झालेल्या या संशोधनात २००० शाळकरी मुलांचे निरीक्षण करण्यात आले. यानुसार टीव्हीपेक्षा स्मार्ट फोन किंवा टॅबलेटसारख्या छोट्या स्क्रीनमुळे मुलांच्या झोपेवर परिणाम झाल्याचे दिसून आले आहे. स्मॉल स्क्रीन वापरणाऱ्या मुलांची झोप सुमारे २१ मिनिटे टळते, तर बेडरूममध्ये टीव्ही असलेल्या मुलांची झोप १८ मिनिटे टळते, असा दावा शास्त्रज्ञांनी केली आहे. अपुऱ्या झोपेमुळे अनेक शारीरिक व मानसिक समस्या निर्माण होऊ शकतात, असे मत वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींनी केले आहे.

**मेंदूच्या कर्करोगावर विंचवाच्या विषाद्वारे खात्रीशीर उपचार**

सिएटल - माणसाच्या मेंदूच्या कॅन्सरचा इलाज करण्यात विंचवाचे विष मदत करू शकते. उंदरासहित काही जनावरांवर त्याचे यशस्वी परीक्षण करण्यात आले आहे. आता माणसांवर त्याचे परीक्षण करण्याची परवानगी मिळाली आहे. सिएटल येथील फ्रेड हचिन्सन कर्करोग संशोधन केंद्राचे डॉक्टर जिम ओल्सन यांनी ही माहिती दिली. ओल्सन हे मुलांचे कर्करोगतज्ज्ञ आहेत. डॉ. ओल्सन यांनी दिलेल्या माहितीनुसार त्यांनी एक नवे तंत्रज्ञान विकसित केले आहे. त्याद्वारे मेंदूच्या कर्करोगग्रस्त कोशिकांची सहज ओळख पटवून, त्यांना हटवले जाऊ शकेल या तंत्रज्ञानात विंचवांची धोकादायक आणि विषारी प्रजाती डेथस्टॉकरच्या डंखातून निघणाऱ्या बिलाचा उपयोग करण्यात आला आहे. या विषापासून तयार होणाऱ्या औषधाचे नाव ‘ट्यूमरपेंट’ असे आहे.

## राष्ट्रवृत्त

**संस्कृत विषयाची परीक्षा नाही : केंद्र सरकार**

केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला दिलेल्या निर्णयानुसार या वर्षी तृतीय भाषा म्हणून जर्मन विषय सोडून, संस्कृत विषय घेणाऱ्या केंद्रिय विद्यालयातील विद्यार्थ्यांची परीक्षा घेणार नाही. कायदे सल्लागार मुकुल रोहतगी यांनी सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती अनिल र. दवे यांना सांगितले की, केंद्रसरकारने हा निर्णय घेतला यामागे विद्यार्थ्यांवरील ताण कमी करण्याचा उद्देश आहे. साहामाही नंतर हा बदल तातडीने केलेला आहे. आतापर्यंत अनिवार्य असणारा जर्मन विषयही वैकल्पिक करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या विषयासंदर्भात केंद्रिय विद्यालयाच्या पालकांनी सर्वोच्च न्यायालयात विनंती अर्ज दाखल केला असून, यावर लवकरच निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी म्हटले आहे.

**बिहारमधील मदरशामध्ये विद्यार्थिनींच्या प्रवेशावर बंदी**

नालंदा येथील मुस्लिम धार्मिक पाठशाळा - मदरशामध्ये मुलींना बसवण्याची वेगळी व्यवस्था नाही, या कारणासाठी प्रवेशावर बंदी घालण्यात आली आहे. मदरशाचे अझीझ यांनी ही बंदी आणली असून, केवळ नवीन प्रवेशावरच नव्हे; तर मदरशामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनींनीही यापुढे मदरशात येऊ नये, असे

त्यांनी सांगितले आहे. आतापर्यंत १०० पेक्षाही अधिक शाळा चालवत असलेली ही संस्था- सोब्रा वक्फ इस्टेट कम्युनिटी आतापर्यंत विद्यार्थ्यांना सायकली, पुस्तके, गणवेश इ. देण्यासाठी प्रसिद्ध होती. परंतु ती आता या प्रवेशबंदीच्या कारणामुळे चर्चेत आली आहे.

# राज्यवृत्त

**मूल्यशिक्षणाची दैना**

शासकीय नियमानुसार शाळेच्या वेळापत्रकात अनिवार्य असणारा मूल्यशिक्षणाचा तास - बऱ्याच शाळेत विशेषत: इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये 'ऑफ' तास म्हणून दिला जातो. बहुतेक शाळांमध्ये राष्ट्रगीत झाले की नेहमीचे तास सुरू होतात. नियमित विषयांच्या वेळापत्रकाचे गणित सांभाळताना शाळांनी परिपाठ हद्दपार करणे पसंत केले आहे. नव्या अभ्यासक्रम आराखड्यानुसार मूल्यशिक्षणाचा तास शाळा भरताना सुरुवातीचा असावा, अशी सूचना शासनाने दिली होती. बऱ्याचशा मराठी माध्यमाच्या शाळांमधून परिपाठाच्या स्वरूपात तो घेतला जातो. राष्ट्रगीत, प्रतिज्ञा याबरोबर संविधानाच्या प्रास्ताविकाचे वाचन या परिपाठात करण्यात यावे; असा आदेशही शासनाने गेल्या वर्षी काढला होता. त्याचप्रमाणे शाळा सुटताना 'वंदे मातरम्' म्हणण्यात यावे अशाही सूचना दिल्या होत्या. मात्र, बहुतेक शाळांनी हा परिपाठाचा उपक्रम बंद करून टाकला आहे. यामध्ये इंग्रजी शाळा आघाडीवर आहेत. मराठी माध्यमाच्या शाळांतही या तासाला काय शिकवावे, याविषयी संदिग्धतेची भूमिका आहे.


कै. मधुराबाई पिता तात्या जाधव यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मधुरा प्रतिष्ठान नडदुर्ग संचलित

ग्राममंगल पद्धतीचे **'आनंदघर'** (शास्त्रीय बालशिक्षण केंद्र)

२ ते ५ वर्षांच्या मुला-मुलींना प्रवेश. संपूर्ण अनुभवातून हसतखेळत शिक्षण. निसर्गाच्या सान्निध्यात राहून शिक्षण. दफ्तराचे ओझे नाही, पायात बूट नाही, गळ्यात टाय नाही. वैयक्तिक लक्ष देऊन शिकवणारी (तळमळीने) शाळा !!

**नियोजित :** १) वृद्ध आई-वडील, काका-काकू, मामा-मामी, नाना-नानी यांना स्वत:च्याच घरी राहिल्याचा (जुन्याकाळातील) अनुभव देणारे 'अंतरंग' वृद्धाचे आपले घर. २) आयुष्याचे सुंदर स्वप्न पाहून लग्न झालेली पण दैवाने सौभाग्य हिरावून घेतली गेलेली, आपलीच मुलगी, बहीण वहिनी यांच्यासाठी नव्याने स्वत:च्या पायावर उभे राहण्याची जिद्द -यासाठीचे 'जिद्द केंद्र'. ३) एकांतात राहू इच्छिणाऱ्या वय वर्षे६ च्या पुढील स्त्री-पुरुषांसाठीचे साधना केंद्र.

**वैशिष्ट्ये :**

१) पाच एकरांचे, प्रदूषणमुक्त व पर्यावरण संवर्धन क्षेत्र २) २०० फळझाडांचे वृक्ष, ६० कडुनिंबाचे वृक्ष ३) स्वच्छ व सुंदर हायवेपासून (जुना नं. ६ नवीन ६५) काही पावलांवर (पुणे-हैद्राबाद) ४) तीर्थ क्षेत्रे तुळजापूर, अक्कलकोट, गाणगापूर रस्त्यावर.

संस्थापक अध्यक्ष : **किरण जाधव**

सेवानिवृत्त मंडळ अधिकारी, मधुरा प्रतिष्ठान, रामनगर खंडोबा रोड, (स.न. २६३) नळदुर्ग, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद (मराठवाडा). संपर्क : ९४२२४६४२४७, ९४२२३५८०३०, ९४२२९३५३४७, ९४२३३७९५४७

# ग्राममंगलचा वर्धापनदिन उत्साहात साजरा



दिनांक १९ डिसेंबर २०१४ रोजी ग्राममंगल संस्थेचा बत्तीसावा वर्धापनदिन ऐना येथे उत्साहात साजरा करण्यात आला. दिनांक १९ रोजी पालघर जिल्ह्यातील माहिम शिक्षण संस्थेच्या इंग्लिश माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थी ऐना येथे आले होते. या विद्यार्थ्यांना व शिक्षकांना आपल्या मुक्तशाळेतील विद्यार्थ्यांनी लहान गटांमध्ये शैक्षणिक साधने समजावून दिली. दुपारी या सर्व पाहुण्यांना इंग्रजी, मराठी, हिंदी या तीन भाषांतील तीन कार्यक्रम सादर करण्यात आले. राममोहन शाळेतील माजी विद्यार्थी संघटनेच्या अधिकाऱ्यांबरोबर ग्राममंगलचे विश्वस्त श्री. अजित मंडलिक उपस्थित होते.

दिनांक २० डिसेंबर २०१४ रोजी ऐना येथे ग्राममंगलचे ऐना, विक्रमगड विभागातील सर्व कार्यकर्ते, सचिव, इन्फोसिस मधून आलेली मंडळी व सिंगापूर येथून आलेले श्री.विनोद देसाई व त्यांचे कुटुंब यांनी भेट दिली. मुक्तशाळेच्या विद्यार्थ्यांनी जवळ जवळ अडीच तास विविध कार्यक्रम सादर केले. यातील बरेच कार्यक्रम त्यांच्या रोजच्या शालेय उपक्रमांचाच भाग होता. तर काही कार्यक्रम केवळ तीन दिवसांच्या सरावात बसविलेले होते हे विशेष.

# एक रिकामी चौकट

गंपूदादा

**एका सकाळी ८.३० वाजता फोन आला, ''गंपूदादा तुम्ही लगेच घरी येऊ शकाल का?''**

मी थोडा अस्वस्थ झालो कारण फोनवर बोलणारी व्यक्ती रडत होती. थोडी चौकशी केल्यानंतर कळलं, घरातील वडिलांचा मृत्यू झाला होता. घरातील सर्वांनाच हा मोठा धक्का होता. मी भरभर आवरून त्यांच्या घरी पोहोचलो. माझ्या घरापासून त्यांच्या घरापर्यंत पोहोचेपर्यंत अनेक विचार मनात थैमान घालत होते. कारण सायकॉलॉजिस्ट म्हणून माझ्यावरही असा पहिलाच प्रसंग होता. त्यांच्या घरी पोहोचलो, त्यावेळेस घरातून तुरळक लोक पोहोचली होती. मी जाऊन शांतपणे बसलो. परिस्थिती बिकट होती, गेलेली व्यक्ती तरुण वयाची होती. त्यांचा लहान मुलगा जो शाळेत होता, त्याचं वय ७ वर्षे होतं. मला फोन करणारी व्यक्ती मुलाची आत्त्या होती. मी त्यांच्याशी बोललो. मला सगळ्यांसाठीच सपोर्ट सिस्टिम उभी करायची होती. सर्वसाधारणपणे 'अशा वेळी जाऊन काय बोलायचं?' असा बिकट प्रश्न असतो. मी आत्त्याबाईंना म्हणालो, ''मुलगा शाळेतून कधी येणार आहे? आणि त्याला त्याविषयी काय काय माहिती आहे?'' आत्त्यबाईंच्या सांगण्यानुसार मुलाला बाबा हॉस्पिटलमध्ये ॲडमिट आहेत आणि ते काही दिवसांनी परत येणार आहेत, इतकंच माहीत होतं. 'मृत्यू' ही संकल्पना त्याला जीवनात पहिल्यांदा कळणार होती. मुलगा या आधीही माझ्याकडे येऊन गेला होता. अत्यंत हुशार, संवेदनशील आणि वडिलांशी घनिष्ट नातं असलेला मुलगा.

शेवटचं दर्शन घेण्यासाठी, सगळी रडारड, या सगळ्या वातावरणात आत्ता त्याला घरी आणायचं नाही. मुलगा शाळेनंतर पाळणाघरात जात होता. त्या पाळणाघराचा पत्ता घेतला, आत्त्याबाई पाळणाघरातील मावशींशी बोलल्या. मी संध्याकाळी ४ वाजता मुलाला, माझ्या क्लिनिकवर त्याच्या वडिलांचा मृत्यू समजावून सांगण्यासाठी घेऊन जाणार होतो. घरातील मंडळींना थोडंफार स्थिर करत मी त्यांच्या घराबाहेर पडलो. आत्तापर्यंत घेतलेले सगळे शिक्षण आणि हा प्रसंग यांची तुलना करता, आत्ताचा प्रसंग जास्त शिकविणारा होता. कुठलाही भावनिक उद्रेक न होऊ देता, वडिलांचा मृत्यू त्या लहान चिमुरड्याने सहज स्वीकारावा; यासाठी मी प्रयत्न करणार होतो. या मधल्या काळात, मी विचार करत होतो, काय बरं सांगावं त्याला? कसं बरं सांगता येईल मला? ठीक होईल ना सगळं?

सगळ्या प्रश्नांना मी एकच उत्तर देत होतो, ''हो, हो, सगळं.'' चार वाजता पाळणाघरात पोहोचलो. सात वर्षांचा मुलगा स्वप्नील (नाव बदललं आहे) त्याच्या मित्रांबरोबर छान खेळत

होता. माझ्याकडे पाहून हसला, ''तू इकडे कसा?'' माझ्यासाठीचा हा प्रश्न आगंतुक होता. मला कळेच ना काय उत्तर द्यावं. एका निरागस प्रश्नाला खोटं उत्तर तरी कसं द्यावं. पण खरं तर, खोटं बोलण्याचं काही कारणचं नव्हतं. मी त्याला म्हणालो, ''तुला घेऊन आपण क्लिनिकवर जाणार आहोत.'' तो म्हणाला, ''बाबाला, इथंच ॲडमिट केलंय, मी त्याला सांगून येऊ?'' त्याच्या या प्रश्नाने खरं तर मी अस्वस्थ झालो. पण मी त्याला म्हटलं, ''आपण आधी खेळायला जाऊ या.'' क्लिनिकमध्ये गेल्यावर आम्ही सुमारे तासभर खेळलो आणि मग सुरुवात केली. त्याआधी एक विचार मनात येऊन गेला. खरं तर दुःख आपल्याला प्रत्यक्ष कळत नाही; तोपर्यंत आनंदाने जागा व्यापलेली असते. मग दुःख कळल्यावर, दुःख ती जागा व्यापते; म्हणजे मग आनंद संपतो का? तर नाही, तो फक्त लुप्त होतो. दुःखाचा डॉमिनन्स (Dominance) वाढतो. म्हणजे खरं तर काहीच संपत नाही. तरीही जन्म-मृत्यू अंतिम आहे, हे भान उलगडत नाही. या विचारातील 'लुप्त होणं' ही संकल्पना माझ्या मदतीला आली. बाबाविषयीच्या गप्पा झाल्यावर लक्षात आलं, त्याचा बाबा त्याला आवडतो, कारण तो त्याला फिरायला नेतो, त्याच्याशी गप्पा मारतो, त्याच्याशी खेळतो आणि त्यांची खूप छान मैत्री आहे. मी त्याला म्हटलं, ''तुझा बाबा लुप्त झाला आहे आणि तो आता परत कधीच येणार नाही.'' आणि या वाक्यानंतर 'लुप्त' या शब्दाचा अर्थ म्हणजे 'मरण'; म्हणजे हरवणं, काहीतरी निघून जाणं कायमचं, हे सगळं त्याच्या प्रश्नांमधून तो समजावून घेत होता. त्यानंतर झालेला संवाद पुढीलप्रमाणे होता.

१) म्हणजे तो कुठे गेलाय का?
उत्तर : हो.
२) पण तो तर हॉस्पिटलमध्ये होता.
उत्तर : हो. पण त्याला खूपच बरं वाटत नव्हतं; म्हणून तो लुप्त झाला आणि आता तो परत कधीच भेटणार नाही.
३) मला पण नाही?
उत्तर : हो. कोणालाच भेटणार नाही.
४) म्हणजे तो देवबाप्पाकडे गेलाय का?
उत्तर : ते मला नाही माहीत, पण 'देवबाप्पाकडे जाणं' म्हणजे काय?



५) म्हणजे अरे गंपूदादा, चांगल्या माणसांना देवबाप्पा वरती बोलावून घेतो.
उत्तर : हो, बाबा खूप चांगला होता.
६) आई कुठे आहे?
उत्तर : घरी वाट पाहतेय तुझी.
७) चल मग घरी. आधीच नाही का सांगायचं ?

आम्ही घरी गेलो. एव्हाना सर्व आटोपलं होतं. पिठावरती दिवापण ठेवला गेला होता. तो आईला बिलगला, आई ओक्साबोक्शी रडायला लागली. मग तो अचानक तिच्या मिठीतून निघाला, त्याच्या शाळेतल्या डायरीवरचा फोटो हो माहितीये मला, आपण फोटो पाहायचा ना. पण आल्यावर'' आणि परत कुशीत शिरला. बहुधा त्याला मरण कळलं असावं. गोष्टी कळणं आणि स्वीकारता येणं यासाठी वेळ लागतो. मी आत्याबाईंना म्हटलं, ''त्याला कळलंय, स्वीकारायला वेळ लागेल, त्यासाठी आपण काही सेशन्स भेटणार आहोत.''

त्यांच्याघरातून बाहेर पडताना मी मागे वळून पाहिलं. धुसर दिसत होती प्रतिमा. हो! माझ्याही डोळ्यांत पाणी आलं होतं. ज्या गोष्टी अदृश्य होतात वा निघून जातात, त्या मृत मानल्या जातात. तथापि, मृत्यूच्या अटळतेविषयी व अंतिमतेविषयी सातव्या वर्षापर्यंत काहीच जाण नसते, असे 'वैकासिक मानसशास्त्र' म्हणते.

भेटू या, पुढच्या लेखात, नवीन केससहित..